# सहावा शिक्का

आपण एका क्षणासाठी आपली डोके झुकवू या.

2 प्रभू आम्ही पुन्हा सभेसाठी एकत्र जमत आहोत. आणि आम्ही सुरुवातीच्या दिवसांचा विचार करतो जेव्हा ते सर्व, प्रभूच्या आशीर्वादांसाठी शिलोह येथे एकत्र जमत असत. आणि आता, आजच्या रात्री आम्ही इथे तुझा शब्द ऐकण्यासाठी जमलो आहोत. आणि जसे आम्ही, वचनांतील ह्या भागाचा अभ्यास करत आहोत की कोकरा एकटाच होता जो शिक्के उघडू शकत होता, किंवा त्यांना सैल करू शकत होता. आणि आम्ही प्रार्थना करतो की आजच्या रात्री, जेव्हा आम्ही ह्या सहाव्या शिक्क्याचा विचार करीत आहोत, आम्ही प्रार्थना करतो, स्वर्गीय पित्या, की तो कोकरा आमच्यासाठी आजच्या रात्री ते उघडेल. की, आम्ही इथे ते समजण्यासाठी आहोत. आणि जेव्हा कोणीही मनुष्य पृथ्वीवर किंवा स्वर्गामध्ये, योग्य नव्हता, केवळ तो कोकरा योग्य असा सापडला. तर तो सर्व—पात्र असा येवो आणि आमच्यासाठी आजच्या रात्री शिक्का उघडो, की जेणेकरून आम्ही काळाच्या पडद्यामागे पाहू शकू. हे आम्हाला मदत करील, पित्या, आम्ही विश्वास करतो, कि ह्या महान काळोख्या, पापमय दिवसामध्ये ज्यामध्ये आम्ही राहत आहोत; हे आम्हाला मदत करील आणि आम्हाला धैर्य देईल. आम्ही आता विश्वास करतो कि तुझ्या दृष्टीमध्ये आमच्यासाठी दया आहे. आम्ही वचनाद्वारे, स्वतःला तुझ्याकडे सोपवून घेतो, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये, आमेन.

तुम्ही बसू शकता.

3 शुभ संध्याकाळ, मित्रांनो. इथे आजच्या रात्री पुन्हा एकदा, प्रभूच्या सेवेसाठी उपस्थित असणे, हे एक सौभाग्य आहे. मला थोडासा उशीर झाला. मी फक्त जात होतो... एका मनुष्याच्या मरण्याच्या आपतकालीन परिस्थितीमध्ये, तो ह्या मंडळीचा सदस्य आहे; किंवा त्याची आई इथे येते. आणि त्यांनी म्हटले, तो मुलगा तिथे त्याच क्षणी मरत होता. मग मी—मी तिथे खाली गेलो आणि पाहिले की एका—एका मरणप्राय मनुष्याची छाया त्या अंथरुणावर पडली होती, एक मनुष्य जवळजवळ माझ्या वयाचा. आणि अगदी काही क्षणांनंतर, मी एक मनुष्य त्याच्या पायावर उभा राहून, देवाला गौरव देताना पाहिला. आणि तरमग, देव, जर आपण आपली पापे कबूल करण्यास आणि जे योग्य ते करण्यास तयार असू, तर त्याची दया मागा, त्याला हाक मारा, देव ते आपल्याला देण्यासाठी इच्छित आहे आणि थांबला आहे.

4 आणि मला माहित आहे आजच्या रात्री इथे थोडे गरम आहे. आणि—आणि हे एक... नाही, मला वाटते उष्णता पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. आणि—आणि आपण...

5 काल रात्री, किंवा आज माझ्या लक्षात आले की, हा माझा सातवा दिवस आहे ह्या खोलीमध्ये जी विद्युत झोतांविरहित आहे, पाहा; मी तिथे अभ्यास करत, आणि देवाने हे शिक्के उघडावेत म्हणून प्रार्थना करीत होतो.

6 आणि तिथे कालच्या रात्री त्या समूहामध्ये खुपजण होते ज्यांनी प्रश्न लिहिले होते, ते विशेषकरून प्रश्न नव्हते, जवळजवळ तसेच होते. त्यांना रोग्यांसाठी प्रार्थना करण्याची सेवा हवी होती आणि ते एक दिवस जास्त थांबण्यास तयार होते कि जेणेकरून सोमवारी रोग्यांसाठी प्रार्थना करता यावी. त्यामुळे मी—मी—मी, मी खरोखर तसे करू शकत होतो

जर तशी—तशी लोकांची इच्छा होती की त्यांनी तसे करावे. तुम्ही ह्यावर विचार करा आणि जर तुम्हाला रोग्यांसाठी प्रार्थना करवून घ्यायची असेल तर तसे मला कळवा.

7 कारण मी हा संपूर्ण वेळ शिक्क्यांसाठी नेमलेला होता, आणि मला स्वतःला शिक्क्यांसाठी दूर ठेवले होते.

8 तर मग तुम्ही ह्यावर विचार करू शकता आणि त्यावर प्रार्थना करा आणि नंतर मला कळवा. आणि मग मी करीन, जर देवाची इच्छा असेल तर, मी करू शकतो. माझी पुढची नियोजित भेट अलबुकर, न्यू मॅक्सिको ह्या ठिकाणी आहे, जी अजून काही अवकाशानंतर आहे. आणि मला अरिजोना येथील परिषदेच्या तयारी संदर्भात, काही कामासाठी घरी जाणे आहे. आणि, म्हणून जर देवाची अशी इच्छा असेल! तर तुम्ही त्यावर प्रार्थना करा, आणि मी तसे करीन, आणि नंतर आपल्याला त्याविषयी अधिक समज मिळेल.

9 आणि मला आताच समजले. आता मी पाहतो…तुम्ही आजाराबद्दल बोलता, तिथे तो आहे, पाहा. मी इथे एका स्त्रीला बसलेले पाहतो. जर तिला काही मदत मिळाली नाही तर ती इथे थोडा वेळही राहणार नाही. तर, मग, पाहा, आपण—आपण केवळ प्रार्थना करू कि देव असे करील. त्यासाठीच तुम्ही इथे आहात, खूप लांबून आला आहात. तर, पाहा, पवित्र आत्म्याला सर्वकाही ठाऊक आहे, तुम्ही पाहा. तर तो…

10 पण, पाहा, मी ही वेळ शिक्क्यांसाठी देण्याचा प्रयत्न केला आहे, कारण आपण त्यासाठी ती निश्चित केली होती, तुम्ही पाहा. पण जर काही…

11 तसेपण, इथे कितीजण आजारी आहेत ज्यांच्यासाठी प्रार्थना करावी अशी इच्छा आहे? आपण इथे किती हात वर आहेत ते पाहूया. अरे बापरे! हमम! बरे, कितीजण असा विचार करतात की हे बरोबर आहे, देवाची इच्छा असेल तर, कि इथे थांबून तसे करावे, सोमवारी रात्री, केवळ आजाऱ्यांसाठी प्रार्थना करावी, सोमवारी रात्री आजाऱ्यांसाठी प्रार्थना सभा घ्यावी? बरे, जर देवाची इच्छा असेल तर मग आपण तसे करूया. पाहिले? आपण—आपण आजाऱ्यांसाठी बुधवारी, किंवा रविवारी रात्री, किंवा…सोमवारी रात्री प्रार्थना सभा ठेवू, आणि आजाऱ्यांसाठी प्रार्थना करू.

12 आता मी आशा करतो की त्यामुळे, मी ज्या समूहाबरोबर अरिजोना इथे जाणार आहे, त्यामध्ये हस्तक्षेप होणार नाही. भाऊ नॉर्मन, ते इथे कुठे आहेत काय? त्यामुळे तुमच्या नियोजनामध्ये कुठेही काही हस्तक्षेप होतोय काय, भाऊ नॉर्मन? [भाऊ जीन नॉर्मन म्हणतात, "नाही."—सम्पा.] भाऊ फ्रेड आणि तुम्ही दुसरे सर्वजण, हे ठीक आहे काय? [दुसरे म्हणतात, "ठीक आहे."] पाहा? ते ठीक आहे, ठीक आहे.

13 मग, जर देवाची इच्छा असेल तर, सोमवारी रात्री आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करू, एक रात्र पूर्णपणे वेगळी ठेवू, केवळ आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यासाठी. आता, त्यावेळी आपण शिक्के अजिबात बघणार नाही. जर प्रभू हे शिक्के उघडेल, तर सोमवारी रात्री आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करू.

14 आता, ओह, मी ह्यांच्याखाली प्रभूची सेवा करताना प्रचंड आनंद घेत आहे! काय तुम्हाला ह्यांमध्ये आनंद मिळाला, शिक्के उघडण्यामध्ये? [मंडळी म्हणते, "आमेन!"—सम्पा.]

15 आता, आपण आता पाचव्या शिक्क्यांतून बोलत आहोत, किंवा…सहाव्या शिक्क्यांतून. आणि ते खाली सहाव्या अध्यायातील 12व्या वचनापासून 17व्या वाचनापर्यंत आहे. हा मोठ्या शिक्क्यांपैकी एक आहे. बऱ्याच काही गोष्टी इथे घडत आहेत. आणि आता…

16 कालच्या रात्रीचा थोडासा आढावा सांगतो, एक प्रकारची उजळणी, प्रत्येक वेळी.

17 आणि, मला—मलाही काहीतरी सांगावयाचे आहे. मला त्या डब्यामध्ये, माझ्यासाठी खूप महत्वाच्या अशा चार पाच गोष्टी सापडल्या. मला सांगितले गेले की... आणि खरोखर मला माफी मागायची आहे. ध्वनिफीत चालू आहेत काय? ध्वनिफीत चालू आहे? मला माझ्या सेवक बंधूंची आणि इथे असलेल्या तुम्हा लोकांची माफी मागायची आहे. त्यांनी सांगितले, त्या रात्री जेव्हा मी एलियाबद्दल बोलत होतो, त्या समायाबद्दल जेव्हा...त्याला वाटले, तो एकटाच उरला आहे जो वर उचलला जाईल, किंवा तो एकटाच आहे जो वाचला जाईल. मी—मी सात हजारांऐवजी सातशे म्हणालो. काय हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "होय."—सम्पा.] बरे, मला खरोखर त्याबद्दल क्षमा असावी मित्रांनो. मला—मला—मला ते चांगल्या प्रकारे ठाऊक होते. ते केवळ वाचेचे पुटपुटने होते, कारण मला माहीत होते की ते सात हजार होते. मी केवळ ते बरोबर बोललो नाही. आणि याचा अर्थ आहे की...मला आनंद आहे की मी काय म्हणतो ह्यावर तुमचे लक्ष आहे. आणि तुम्ही पाहा, मग, ते...कारण ते सात हजार होते.

18 मला त्यावर दोन किंवा तीन टिपा मिळाल्या, ज्यात लिहिले होते, "भाऊ ब्रॅन्हम, मला वाटते तुम्ही चुकले." पुढे म्हटले, "ते सातशे ऐवजी सात हजार नव्हते काय?"

19 मला वाटले, "नक्कीच मी सातशे म्हटले नाही." पाहिले? ते, आणि नंतर मी...बिली...

20 आणि मग मी, पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे काय, मी अजून एक टिपण्णी उचलली. त्यात लिहिले होते, "भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही...मला वाटते तुम्ही सातशे म्हटले."

21 आणि एका व्यक्तीने म्हटले, "भाऊ ब्रॅन्हम तो एखादा आत्मिक दृष्टांत होता काय, की—की हे एका प्रतिरुपाच्या स्वरूपात आहे, आणि तुम्ही त्याचे प्रतिरूप साताबरोबर...?" ह्या गोष्टींचा जेव्हा तुम्ही विचार करू लागता तेव्हा त्या लोकांना धारेवर ठेवतात, पाहा. आणि हे पुरेसे आहे की ते मला धारेवर ठेवते.

22 आज जेव्हा हा शिक्का प्रगट करण्यात आला तेव्हा काहीतरी घडले, कि मला पूर्णपणे बाहेर अंगणात चालावे लागले, काही वेळासाठी बाहेर अंगणामध्ये. हे बरोबर आहे. त्याने जवळजवळ माझा श्वास माझ्यापासून घेतला. पाहिले? तर तुम्ही म्हणता, एक तणाव? अरे बापरे! पाहिले?

23 आणखी गोष्ट, पाहा, मी जे सांगत आहे, अगदी त्यावर तुम्ही पडून आहा. आणि मी तुम्हाला जे सांगतो त्याविषयी देव मला जबाबदार ठरवणार आहे. पाहिले? आणि म्हणून मला—मला, ह्या गोष्टींविषयी, अगदी पूर्णपणे खात्री असायला हवी, कारण हा एक—एक भयंकर समय आहे ज्यामध्ये आपण राहत आहोत, होय.

24 मी, सोमवारी रात्री आजाऱ्यांसाठी प्रार्थना सभा जी आपण सोमवारी रात्री घेणार आहोत, त्याविषयी विचार करत होतो. भाऊ नेविल त्यामुळे तुम्हाला कुठे हस्तक्षेप होईल काय? [भाऊ नेविल म्हणतात, "मुळीच नाही. मी अगदी इथेच असेन."—सम्पा.] हे ठीक आहे.

25 मौल्यवान भाऊ नेविल! मी तुम्हाला सांगतो, त्यांनी केवळ—केवळ एक बनविला, आणि मला वाटते, मग त्यांनी नमुना हरवला. हे एक...तो खरोखरच माझा एक जिवलग मित्र आहे, मी तुम्हाला सांगतो.

26 आता, ह्या प्रार्थनामंदिरामध्ये रविवारच्या बायबल अभ्यासासाठी खोल्या तयार आहेत आणि सर्वकाही सुव्यवस्थित केले आहे. आणि तुमच्यांतील काही लोकं, जे

जेफरसनविलेच्या आजूबाजूला आहेत, ज्यांना चर्चला यायचे आहे, तुमच्यासाठी एक चांगली जागा आहे, रविवारच्या अभ्यासासाठी खोल्यांसाहित.

27 आणि इथे भाऊ नेविल, निपुण प्रचारक, प्रौढांच्या शिकवणुकीसाठी, आणि एक खरे पाळक. आता मी हे, त्यांना पुष्पगुच्छ मिळावा म्हणून बोलत नाही, पण मी त्याऐवजी एक छोटे गुलाब त्यांना देईन, एका मोठ्या फुलांच्या माळेऐवजी, ते निघून गेल्यानंतर. आणि भाऊ—भाऊ नेविल, त्याला मी तेव्हापासून ओळखतो, जेव्हा तो केवळ एक किशोरवयीन मुलगा होता. आता, तो थोडासादेखील बदलला नाही. तो अजूनही, ओर्मन नेविल आहे, तसाच जसा तो पूर्वी होता.

28 मला आठवते भेट देत असण्याची. तेव्हाही त्यांच्याकडे पुरेशी द्या होती की त्यांनी मला त्यांच्या व्यासपीठावर बोलाविले जेव्हा ते खाली शहरामध्ये एक मेथडिस्ट प्रचारक होते. आणि तिथे एक चांगली मंडळी होती, खाली क्लार्क्सविले येथे, ते...मला वाटते त्याला हॉवर्ड पार्क असे म्हणतात, हॅरिसन अवेन्यू मेथडिस्ट चर्च. मला वाटते, तिथेच खाली त्यांनी तुम्हाला शोधले असेल, बहीण नेविल. तिथे खाली, कारण ती तिथे एक सभा...

29 मी पुन्हा माघारी आलो, आणि मी इथल्या मंडळीला सांगितले, मी म्हटले, “तो एक...तो चांगल्या मनुष्यांपैकी एक आहे! आणि येणाऱ्या काही दिवसांमध्ये मी त्याला प्रभू येशूच्या नावामध्ये बाप्तिस्मा देईन.” तसेच घडले.

30 इथे तो आहे. आणि आता तो माझा जिवलग आहे, अगदी माझ्या बाजूला. आणि एक आदरणीय, सन्माननीय मनुष्य! तो नेहमी माझ्या बाजूने उभा राहिला आहे...त्याला शक्य असेल तितक्या जवळ. जेव्हा कधी मी बोलतो, तो अगदी माझ्या जवळ असतो आणि माझ्या बरोबर असतो. जरी जेव्हा तो प्रथम आला, त्याला त्यावेळी संदेश फारसा कळाला नव्हता, पण त्याने त्यावर विश्वास केला आणि अगदी त्याच्याबरोबर राहिला. अशा भावासाठी आदर आणि सन्मान आहे. मी त्याच्याविषयी पुरेसे बोलू शकत नाही. आणि आता प्रभू त्याला आशिर्वादीत करो. ठीक आहे.

31 आता कालच्या संध्याकाळचे थोडेसे पूर्ववलोकन, पाचवा शिक्का फोडण्याबद्दल. आपण आजच्या रात्री पूर्णपणे मागे जाणार नाही, केवळ तितकेच मागे की आपल्याला पाचवा शिक्का मिळेल.

32 आता, आपल्याला कळते, की तिथे एक ख्रिस्तविरोधक स्वार होऊन आला आणि स्वतःला तीन प्रकारच्या बलांनी घायाळ केले. सर्वजण एका सामर्थ्याकडे गेले, आणि “मृत्यू” ह्या फिकट रंगाच्या घोड्यावर स्वार होऊन तळ नसलेल्या खड्ड्यातून, अधोलोकात गेले, जेथून ते आले होते. आणि मग आपल्याला दिसते की जेव्हा तो...

33 वचन म्हणते, “जेव्हा शत्रू वादळाप्रमाणे येतो, तेव्हा देवाचा आत्मा त्याच्याविरुद्ध आपला स्तर वाढवितो.” आणि आपण कालच्या रात्री, हे देवाच्या वचनामध्ये पूर्णपणे प्रगट होताना पाहिले, कारण तिथे चार प्राणी होते, ज्यांनी ह्या घोडेस्वाराला चार वेळा उत्तर दिले ज्या—ज्या वेळी तो स्वार होऊन आला त्या—त्या वेळी.

34 आणि त्याने प्रत्येक वेळी वेगवेगळ्या घोड्यावर स्वारी केली, एक सफेद घोडा, आणि मग एक लाल घोडा, आणि एक काळा घोडा, आणि मग एक फिकट रंगाचा घोडा. आणि आपण ते रंग पाहिले आणि ते काय होते आणि त्यांनी काय केले. मग ते अगदी बरोबर मंडळ्यांच्या युगामध्ये गेले, आणि अगदी बरोबर त्याने काय केले, अगदी पूर्णपणे.

35 त्यामुळे तुम्ही पाहा, जेव्हा देवाचे वचन एकत्र मिसळते, त्याचा अर्थ की ते बरोबर आहे, पाहा तुम्ही. होय. मी विश्वास करतो, जे काही देवाच्या वचनाबरोबर जुळते, ते नेहमी "आमेन" आहे. पाहिले?

36 आता, जसे एका व्यक्तीने म्हटले त्याला एक दृष्टांत मिळाला, आणि म्हटले की तो तसा होता. ओह, त्यांना माहित आहे की तो प्रभूने दिला कारण तो महान सामर्थ्याने आला. बरे, तो दृष्टांत कदाचित ठीक असेल. पण जर तो वचनाबरोबर नसेल, आणि वचनाच्या विरुद्ध असेल, तर तो बरोबर नाही. पाहिले?

37 आता, आता इथे कदाचित कोणी मर्मन भाऊ किंवा बहीण उपस्थित असेल. आणि काही असतील ज्यांना ह्या ध्वनिफिती मिळतील. आणि मला हे म्हणायचे नाही की... खूप चांगले लोक ज्यांना मी किंवा तुम्ही भेटलो असू, त्यांच्यापैकी एक म्हणजे मर्मन लोक आहेत; अगदी आल्हाददायक असे लोक. आणि मग त्यांचा संदेष्टा, जोसेफ स्मिथ, ज्याला मेथडिस्ट लोकांनी इथे इलिनॉइसमध्ये, त्यांच्या प्रवासामध्ये, मारले. आणि तर मग तो—तो महान पुरुष, आणि ते दृष्टांत, मी कोणत्याही प्रकारे संशय करीत नाही पण त्याला कोणता दृष्टांत मिळाला. मी विश्वास करतो की तो एक प्रामाणिक मनुष्य होता. पण तो दृष्टांत जो त्याला मिळाला तो वचनाच्या विरुद्ध होता. पहिले? त्यामुळे त्यांना तो जुळवण्यासाठी मर्मन बायबल करावे लागले. पाहिले?

38 बस्स माझ्यासाठी *तेवढेच* आहे. हे आहे. हेच कारण आहे, केवळ वचन. बस्स पुरे. पाहिले?

39 एकदा एक—एक—एक सेवक परदेशातून इथे आले, आणि ते...आणि मी त्यांना बाहेर एका कारमध्ये येताना पाहिले...एका—एका स्त्रीबरोबर. आणि ते एका सभेसाठी आले होते. आणि मला कळाले की, ते दोन किंवा तीन दिवस कारमध्ये प्रवास करून आले होते, केवळ तो आणि ती एकत्र, सभेला येण्यासाठी. आणि त्या स्त्रीचे लग्न झाले होते, तीन किंवा चार वेगवेगळ्या वेळी.

40 आणि ते सेवक हॉटेलच्या व्हरांडयात, जिथे मी उभा होतो, तिथे आले आणि धावत येऊन माझ्याशी हस्तांदोलन केले. आणि मी त्यांच्या हातात हात देऊन वर केला आणि त्यांच्याशी बोलत होतो. मी त्यांना विचारले, "जेव्हा तुम्ही मोकळे असाल तेव्हा मी तुमच्याशी माझ्या खोलीमध्ये थोडा वेळ बोलू शकेन काय?"

त्याने म्हटले, "नक्कीच भाऊ ब्रॅन्हम."

41 मी त्यांना खोलीकडे घेऊन गेलो. आणि मी त्या सेवकाला म्हटले, मी म्हणालो, "आदरणीय, महाशय, तू ह्या शहरामध्ये अनोळखी आहेस." मी म्हटले, "पण ह्या स्त्रीचे खूप नाव आहे." मी म्हटले, "आणि तुम्ही इतक्या दुरून *अमुक—अमुक* एका ठिकाणाहून, ह्या *अमुक—अमुक* ठिकाणी आलात?"

म्हणाला, "होय, महाशय."

42 आणि मी म्हणालो, "तुम्हाला भीती वाटत नाही काय की त्यामुळे...मी तुमच्यावर संशय करत नाही, पण तुम्हाला असे नाही का वाटत की, त्यामुळे तुमची सेवक म्हणून जी प्रतिमा आहे, त्यावर परिणाम होईल? तुम्हाला वाट नाही का की आपण त्यापेक्षा चांगले उदाहरण ठेवले पाहिजे?"

आणि त्यांनी म्हटले, "ओह, ती स्त्री एक संत आहे."

43 मी म्हटले, "मी—मी त्यावर काहीच शंका करत नाही." पण मी म्हटले, "पण, भावा, असे आहे की, प्रत्येक जण जे तिच्यावर पाहतात, ते संत नाहीयेत, पाहा, जे

कोणी तुम्ही काय करता हे पाहतात ते.” आणि मी म्हणालो, “मला वाटते तुमच्यासाठी हे चांगले आहे की तुम्ही थोडे सावध राहा. हा केवळ एका भावाकडून दुसऱ्या भावासाठी सल्ला आहे.” आणि ते म्हणाले…मी म्हणालो, “त्या स्त्रीचे आतापर्यंत चार किंवा पाच वेळा लग्न झाले आहे.”

आणि त्यांनी म्हटले, “होय, मला ते माहित आहे.” म्हटले, “तुम्हाला माहित आहे, मी—मी…”

44 मी म्हटले, “तुम्ही तसे तुमच्या घरच्या मंडळींमध्ये शिकविता काय, नाही ना?”

45 त्यावर त्यांनी म्हटले, “नाही. पण,” म्हटले, “तुम्हाला माहित आहे, भाऊ ब्रॅन्हम, मला त्याविषयी एक दृष्टांत आला.”

मी म्हटले, “बरे, ते ठीक आहे.” मी म्हटले…

46 त्यांनी म्हटले, “तुमची हरकत आहे काय?” म्हटले, “मला वाटते मी, तुमच्या त्या विषयीच्या शिकवणुकीवर, तुम्हाला थोडेसे सरळ करू शकतो.”

47 आणि मी म्हटले, “ठीक आहे.” आणि त्यांनी…मी म्हटले, “मला—मला—मला ते जाणण्यासाठी आनंद होईल, महाशय.”

48 आणि त्यांनी म्हटले, “बरे,” म्हटले, “तुम्हाला माहित आहे, ह्या दृष्टांतामध्ये,” त्यांनी म्हटले, “मी झोपलो होतो.”

आणि मी म्हटले, “होय.” मग, मला समजले, कि ते एक स्वप्न होते. पाहिले?

49 आणि त्यांनी म्हटले “माझी—माझी पत्नी,” म्हटले, “ती दुसऱ्या एका मनुष्यसोबत राहत होती,” आणि म्हटले, “आणि मला फसवत होती.” आणि म्हटले, “मग ती माझ्याकडे आली, आणि ती मला म्हणाली, ओह, जिवलगा, मला क्षमा कर, मला क्षमा कर!’ म्हणाली, ‘मला—मला—मला—मला दुःख होते कि मी असे केले. मी आतापासून एकनिष्ठ राहीन.’” म्हटले, “नक्कीच, मी तिच्यावर खूप प्रेम करतो, मी लगेच तिला क्षमा केली, म्हणालो, ‘ठीक आहे.’” आणि म्हटले, “मग…”

50 आणि म्हटले, “तुम्हाला माहित आहे काय? मग मी ह्या दृष्टांताचा अर्थ लावला.” म्हटले, “हीच ती स्त्री होती.” म्हटले, “नक्कीच, तिचे लग्न झाले आहे, आणि—आणि असे सर्व काही, आणि अशा अनेक वेळी.” आणि म्हटले, कि, “तिच्यासाठी हे ठीक आहे की तिने लग्न करावे, कारण प्रभू तिच्यावर खूप प्रेम करतो. तिला हव्या तितक्या वेळा ती लग्न करू शकते…”

51 मी म्हणालो, “तुमचा दृष्टांत खूप गोड होता, पण तो ह्या खडकाळ रस्त्यापासून वेगळ्या मार्गावर आहे.” मी म्हटले, “ते—ते चुकीचे आहे, पाहा. तुम्ही तसे करायला नको.” कि ज्यामुळे…पाहिले?

52 पण जेव्हा तुम्ही वचन पाहता, वचनाशी जुळवणूक करता, ज्यामुळे ते एक स्थिर सातत्यात एकत्र येते. वचने, जेव्हा हे एक इथपर्यंत येऊन थांबते, हे दुसरे इथे येते आणि त्याच्याशी जुळवणूक करते, आणि पूर्ण चित्र काढते.

53 जसे काही एखादे शब्दकोडे सोडविण्यासारखे. तुम्ही तो शब्द शोधता जो बरोबर जुळतो. दुसरे काहीच त्या ठिकाणी बसू शकत नाही. मग तुम्हाला संपूर्ण चित्र कळते.

54 आणि एकटाच आहे जो तसे करू शकतो, तो कोकरा आहे, आणि म्हणून आम्ही त्याच्याकडे पाहतो.

55 पण आपल्याला दिसते की जेव्हा हे, हा घोडेस्वार, तो एक घोडेस्वार होता जो ह्या घोड्यांवर स्वार झाला. आणि मग आपण त्याचा पाठलाग केला, पाहिले कि त्याने काय केले आणि सर्वकाही, आणि मागे मंडळ्यांच्या युगात पाहिले, अगदी तेच जे त्याने केले.

56 मग जेव्हा तो एका विशिष्ट पशुवर होऊन बाहेर गेला आणि काही गोष्ट केली, आपल्याला दिसते की तिथे त्याच्याशी लढण्यासाठी एक पाठविला गेला.

57 पहिल्या युगासाठी एक पाठविला, कोकरा...सिंह. तो वचन होता, जो नक्कीच ख्रिस्त होता.

58 त्याच्यानंतरचा बैल होता, काळोखाच्या युगामध्ये, जेव्हा—जेव्हा मंडळी संघटित झाली होती आणि तिने देवाच्या वचनाऐवजी, विशिष्ट शिकवण स्वीकारली होती.

59 आणि लक्षात घ्या, सर्व काही केवळ दोन गोष्टींवर आधारित आहे, एक, ख्रिस्तविरोधक; आणि दुसरी, ख्रिस्त.

60 हे आजही तसेच आहे. अर्धवट ख्रिस्ती असे काही नाही. दारुडा—सभ्य मनुष्य, काळे—पांढरे पक्षी;पापी—संत असे काही नाही. नाही. तुम्ही एकतर एक पापी आहा किंवा एक संत आहा. पाहिले? मधले असे तिथे काही नाही. तुम्ही एकतर नवीन जन्म पावलेले आहा किंवा नवीन जन्म पावलेले नाही. तुम्ही एकतर पवित्र आत्म्याने भरलेले आहा किंवा पवित्र आत्म्याने भरलेले नाही. पाहिले? आणि जर तुम्ही त्याने भरलेले असाल, तुमचे जीवन ते दर्शविते, ते बरोबर त्यामागे जाते, पाहिले? त्याविषयी कोणी कोणाला सांगण्याची गरज नाही. त्यांना ते दिसते, पाहा, कारण तो एक शिक्का आहे.

61 आता, आपल्याला दिसते की कशाप्रकारे ती श्वापदे प्रत्येक वेळी स्वार होऊन आली. एकाला, धार्मिक सत्ता आणि—आणि राजकीय सत्ता ह्यांना एकत्रित करण्यासाठी, राजकीय सत्तेसह त्याच्या कार्यावर पाठविले. आपल्याला दिसते, देवाने, ह्याला प्रतिबंध करण्यासाठी त्याचे सामर्थ्य पाठविले. आपण मागे गेलो आणि पाहिले की मंडळींचे युग कसे होते; तर आपल्याला दिसेल की ते अगदी त्याच प्रकारचे होते.

62 मग आपल्याला समजते कि, दुसरे एक युग आले, आणि त्यामध्ये शत्रूने धर्माच्या नावाने ख्रिस्तविरोधकाला पाठविले, ख्रिस्ताच्या नावाने, मंडळीच्या नावाने. होय महाशय. मंडळीच्या नावाखाली देखील ते बाहेर गेले. “हीच खरी मंडळी आहे”, असे त्याने म्हटले. पाहिले?

रशिया हे ख्रिस्तविरोधक नाही. ख्रिस्तविरोधक ते नाही.

63 ख्रिस्तविरोधक खऱ्या ख्रिस्तित्वाच्या इतक्या जवळ आहे, की, बायबल म्हणते, “ते, आगाऊ निवडणूक नसलेल्या प्रत्येकाला फसवील.” हे बरोबर आहे. बायबल म्हणते की, “शेवटच्या दिवसांत, सर्वजण, ज्यांची आगाऊ निवड झाली नाही, निवडलेले.” ते म्हणते, “निवडलेले, ज्यांची आगाऊच निवड झाली होती.” पाहिले? “ज्यांची नावे, कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात, जगाच्या स्थापनेपासून नाहीत, त्या प्रत्येकाला ते फसवील.”

64 जेव्हा कोकरा वधला गेला, नावे त्या पुस्तकावर घातली गेली. तो आजच्या रात्री पवित्रस्थानात उभा आहे, गौरवामध्ये, एक मध्यस्थ असा, आणि ज्यांची नावे त्या पुस्तकात आहेत, त्या प्रत्येक आत्म्यासाठी मध्यस्थी करीत आहे. आणि त्याच्याशिवाय ते नाव कोणालाच माहीत नाही. तोच आहे ज्याच्या हातात ते पुस्तक आहे, आणि त्याला माहित आहे. जेव्हा तो शेवटचा मध्ये येईल, तेव्हा त्याचे मध्यस्थीचे दिवस संपतील. मग तो पुढे येऊन, ज्याच्यासाठी त्याने मध्यस्थी केली, त्याची मागणी करील. आता

तो सोडवणाऱ्या जवळच्या कुटुंबियाची भूमिका बजावत आहे आणि मग येऊन त्याच्या स्वकीयांना घेईल. अरे बापरे!

65 ह्याने प्रत्येक ख्रिस्ति व्यक्तीला अशा अवस्थेत आणायला हवे की त्याने स्वत:ला शोधावे, आणि देवापुढे आपले हात जोडून, म्हणावे, "मला शुद्ध कर, हे प्रभू! माझ्या जीवनामध्ये पाहा, आणि—आणि मला माझे—माझे वाईट गुण दिसु दे. लवकरात लवकर, मला ते त्या मार्गातून बाहेर काढू दे." "कारण जर नीतिमान मोठ्या कष्टांनी वाचेल तर पापी आणि नास्तिक कुठे असतील?" हि तपासण्याची वेळ आहे.

66 आणि जर तुम्ही ते ठेवले, आणि तुमची इच्छा असेल...आणि हे वचन देण्याची. (आता, माझी इच्छा नाही, कि मला ह्यावर प्रश्न विचारावा, कारण ते मला दुसरीकडे वळविते, तुमचा प्रश्न लिहिताना. मला वाटते, प्रश्न तसेही सुटले आहेत.) हि वेळ चौकशीच्या निवाड्याची आहे. हे बरोबर आहे. आता, आपल्याला ते तुताऱ्याकडे जाताना दिसेल जेव्हा आपण त्याकडे येऊ, जेव्हा देव पुरविल, किंवा त्या वाट्या, आणि आपण चौकशीचा निवाडा ह्याचा शोध करू, जो मोठे अगदी मध्ये जाण्यापूर्वी. आणि—आणि आपण पाहतो की ते सत्य आहे. आणि ते तीन दूत ज्यांनी पृथ्वीला ताडले, तुम्हाला माहित आहे, ते ओरडले, "वाईट! वाईट! पण पृथ्वीचे रहिवासी वाईट होईल!"

आणि आपण एका भयंकर समयात राहत आहोत, एक समय जो...

67 तुम्ही पाहा, ह्या गोष्टी ज्या आपण आता अभ्यासात आहोत, त्या मंडळी गेल्यानंतर आहेत, पाहा, ह्या गोष्टी महासंकटाच्या काळात आहेत. आणि मला वाटते की हे प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या हृदयात पक्के बसू दे, की ही मंडळी महासंकटाच्या काळामध्ये राहणार नाही. तुम्ही, मंडळीला महासंकटात कुठेच ठेऊ शकत नाही. मी...तुम्ही तिथे मंडळी ठेऊ शकता पण वधूला नाही. पाहा, वधू अगोदरच गेलेली असेल.

68 कारण, पाहा, तिने एकही पाप केले नाही, एकही गोष्ट तिच्या विरुद्ध नाही. देवाच्या द्येने तिला पूर्णपणे आच्छादले आहे. आणि त्या ब्लिचने प्रत्येक पाप इतके दूर केले आहे, की त्याची आठवण देखील नाही; पवित्रतेशिवाय दुसरे काहीच नाही, परिपूर्णता, देवाच्या समक्षतेत. ओह, ह्याने वधूला गुडघ्यावर न्यायला हवे आणि देवाकडे रडायला हवे!

69 ह्या प्रस्ताविकामध्ये मी तुमचा जास्त वेळ घेत नसेल तर मला एक छोटीशी गोष्ट आठवते. मी...मी—मी असे एक उद्देशाने करतो, जोपर्यंत मला सुरुवात करण्यासाठी आत्म्याचा स्पर्श जाणवत नाही.

70 हि एक—एक पवित्र बाब आहे. पाहिले? पाहा, तेथील गोष्टी कोण जाणतो? देवाशिवाय कोणीच नाही. आणि ह्या दिवसापर्यंत त्या गोष्टी प्रगट करून बायबलमध्ये सिद्ध केल्या जाऊ नये अशा होत्या. हे अगदी बरोबर आहे. पाहिले? त्यांबद्दल—त्यांबद्दल अंदाज करण्यात आला होता, पण आता आपल्याला त्या बरोबर समजायला हव्या, प्रगट केलेले सत्य. पहिले? लक्षात घ्या.

71 आता, तिथे पश्चिमेकडे एक—एक छोटी मुलगी होती, ती—ती एका मनुष्याच्या प्रेमात होती...आणि तो मनुष्य तिच्या प्रेमात पडला होता. एका चिलखताच्या कंपनीतुन, गुरांचा विक्रेता म्हणून तो तिथे आला होता. आणि—आणि त्यांच्याकडे एक—एक महान...

72 मुख्य मालक एक दिवस आला, त्या मालकाचा मुलगा शिकागोमधून आला होता, आणि म्हणूनच त्यांनी नियमितची पाश्चिमात्य वेशभूषा केली होती. त्या—त्या तेथील मुली, त्यांनी पोशाख केला, त्यांच्यांतील प्रत्येकजण ह्या मुलाला आकर्षित करू पाहत

होत्या, कारण तो मुख्य मनुष्याचा मुलगा होता. आणि त्यामुळे त्यांनी त्यांचा पाश्चिमात्य पोशाख घातला होता.

73 आणि—आणि पश्चिम भागात ते तसे करतात. त्यांनी असे एक प्रकारचे नाटक केले होते. आणि भाऊ मॅगवायर, मला वाटते ते आता इथे आहेत, त्यांना, त्यांनी शहराच्या मध्यवर्ती भागात पकडले आणि त्यांना कैदेत टाकले कारण ते त्यांच्या पश्चिमी पोशाखाविणा होते. आणि त्यांना कांगारू न्यायालयामध्ये ठेवले, आणि त्यांना त्यासाठी दंड भरण्यास लावला, आणि त्यांना पश्चिमी पोशाख विकत घेण्यास लावले. आणि मी त्यांच्यांतील बाकीच्यांना सभोवती फिरताना पाहिले आहे, *अशी* मोठी बंदूक त्यांच्यावर अडकवलेली असते. ते तिकडचे स्थानिक आहेत. ते केवळ गतकाळांतील दिवसांप्रमाणे राहण्याचा प्रयत्न करत आहेत. पाहिले?

74 आणि मग केंटकीमध्ये, मागे रेंफ्रो सरोवरसभोवती वगैरे, ते येथील पूर्वेकडच्या गतकाळाप्रमाणे राहण्याचा प्रयत्न करतात. तुम्हाला जुन्या दिवसांत जाण्यास आवडते. काहीतरी आहे जे असे करण्यास लावते.

75 पण जेव्हा शुभवर्तमानामध्ये मागे मूळ ठिकाणी जाण्याची वेळ येते तेव्हा तुम्हाला करायला वाटत नाही. तुम्हाला काहीतरी आधुनिक हवे आहे, तुम्ही पाहा. असे दाखवितात की, पाहा, तुम्ही—तुम्ही…तिथे एक…

76 आणि काय आहे जे एका—एका मनुष्याला चुकीचे करण्यास लावते? काय आहे जे त्याला पिण्यास आणि तसेच पुढे चालण्यास लावते किंवा एखाद्या स्त्रीला चुकीचे करण्यास लावते? हे अशासाठी आहे की ती प्रयत्न करत आहे…तिच्यामध्ये काहीतरी आहे, जे तहानलेले आहे. त्याच्यामध्ये काहीतरी आहे जे तहानलेले आहे. आणि ते, ती पवित्र तहान जगांतील गोष्टींनी शमविण्याचा प्रयत्न करत आहेत. जेव्हा देव ते शमविणे असायला हवे. त्याने तुम्हाला तसेच बनविले आहे की तुम्हाला तहान लागावी. तेच कारण आहे की तुम्ही कशासाठीतरी तहानलेले आता. देवाने तुम्हाला तसे बनविले कि जेणेकरून तुम्ही ती पवित्र तहान त्याच्याकडे वळवाल. पाहिले? पण जेव्हा तुम्ही ती तहान शमविण्याचा प्रयत्न करिता…तसे करण्यास, कोणीही कसे धजू शकते! तुम्हाला तसे करण्याचा काहीच अधिकार नाही, की ती पवित्र तहान ज्यामुळे तुम्ही कशासाठीतरी तहानलेले असता, आणि मग ती तुम्ही जगाकडे वळविता, जगांतील गोष्टींनी ती शमविण्याचा प्रयत्न करीता. तुम्ही तसे करू शकत नाही. एकच गोष्ट आहे जी ती भागवू शकते, आणि ती म्हणजे देव स्वतः. आणि त्याने तुम्हाला तशाप्रकारे बनविले.

77 तर, ह्या—ह्या तरुण मुली तो नेहमीचा पश्चिमी पेहराव करून त्या—त्या मुलासाठी बाहेर आल्या. आणि त्यांच्यांतील प्रत्येकजणीला खात्री होती की त्यांना हा मुलगा मिळेल.

78 तिथे कुरणामध्ये त्यांची एक छोटी चुलत बहीण होती, आणि ती एक अनाथ होती, आणि त्यामुळे तिने ह्यांच्यासाठी सर्व कामे केली. कारण त्यांना त्यांच्या हातांची नखं व्यवस्थित करायची होती, तुम्हाला माहित आहे, आणि हात व्यवस्थित राहावे म्हणून ते थाळ्या धुवू शकत नव्हत्या. आणि सर्व खरे कठीण काम तिने केले होते.

79 आणि मग शेवटी, जेव्हा तो मुलगा आला, तेव्हा ते सर्व बाहेर गेले आणि जुन्या पश्चिमी रीतीप्रमाणे, त्याला घोड्याच्या टांग्यामध्ये आणले. आणि, त्यांच्या बदुकांतून आकाशात गोळ्या झाडत आणि तुम्हाला माहित आहे, अशा प्रकारे मिरवत ते आतमध्ये आले. आणि त्या रात्री त्यांनी महान असे नृत्य केले, जुन्या पद्धतीचे नृत्य, आणि सर्व गुराखी असे एकत्र जमून, मध्ये येत आणि नृत्य करीत, आणि असे सर्वकाही. आणि हा सर्व महोत्सव दोन किंवा तीन दिवस चालू होता.

80 मग, एका रात्री, हा मुलगा, थोडा वेळ...त्या नृत्यातून विश्राम घेण्यासाठी आणि ह्या मुलींपासून दूर होण्यासाठी, त्या जागेतून थोडा वेळ बाहेर आला. आणि त्याची नजर खाली जिथे गाड्यांचा वर्तुळाकार तळ होता तिथे गेली. तिथून ती मुलगी जात होती, थोडेसे जीर्ण कपडे परिधान केलेली अशी. आणि तिच्याकडे पाण्याने भरलेली बादली होती, ती प्लेट्स धूत होती. आणि त्याने विचार केला, “मी तिला पूर्वी कधीच पाहिले नाही. ती कोठून आली असेल?” म्हणून त्याने असे ठरविले की, त्या कामगारांच्या झोपण्याच्या घराजवळून सभोवताली जावे, आणि तिथे खाली जाऊन तिला भेटावे आणि परत यावे.

81 ती अनवाणी होती. ती थांबली. तिने आपले डोके खाली केले. तिने पाहिले तो कोण आहे आणि ती खूप लाजली. ती ह्या महान व्यक्तीला ओळखत होती. आणि ती, त्या दुसऱ्या मुलींची केवळ चुलत बहीण होती. त्यांचे वडील त्या चिलखत कंपनीत कामगारांचा मुख्य होता, त्यामुळे त्या...ती खालीच पाहत राहिली. तिला अनवाणी असल्याची लाज वाटत होती.

82 त्याने म्हटले, “तुझे नाव काय आहे?” तिने त्याला म्हटले, “तू तिथे आत का नाहीस...जिथे ते बाकीचे सर्वजण आहेत?” आणि तिने एक प्रकारे बहाणे केले.

83 आणि म्हणून त्यानंतरच्या रात्री, तो तिला बघण्यासाठी परत तिथे गेला. शेवटी... तो तिथे बसला होता. आणि ते सर्व तशाच प्रकारे सर्वकाही करत होते. तो—तो त्या गाड्या ठेवण्याच्या वर्तुळाकार तळाच्या कुंपणामध्ये बसून भांडी धुण्याचे पाणी बाहेर फेकत तिच्या येण्याची वाट पाहत होता. आणि त्याने तिला पाहिले. आणि तो तिला म्हणाला, तो म्हणाला, “माझा इथे येण्याचा खरा उद्देश तुला माहीत आहे काय?”

ती म्हणाली, “नाही, महाशय, मला माहित नाही.”

84 म्हणाला, “माझा इथे येण्याचा उद्देश माझ्यासाठी एक पत्नी शोधणे हा आहे.” तो म्हणाला, “मला तुझ्यामध्ये एक चारित्र्य दिसते जे त्यांच्यामध्ये नाही.” मी मंडळीचा विचार करत होतो, तुम्ही पाहा. म्हणाला, “तू माझ्याशी लग्न करशील काय?”

ती म्हणाली, “मी? मी? मी—मी असा विचार करू शकत नाही, मी.”

85 पाहा, तो मुख्य मालकाचा मुलगा होता. त्या देशांतील सर्व शेत मळे आणि सर्वकाही त्याच्या मालकीचे होते, तुम्ही पाहा. त्याने म्हटले, “होय.” म्हटले, “मला—मला पूर्ण शिकागोमध्ये एकही मिळाली नाही. मला—मला खरी पत्नी हवी आहे. मला चांगले चारित्र्य असलेली पत्नी हवी आहे. आणि जी गोष्ट मी शोधत आहे ती मला तुझ्यामध्ये दिसत आहे.” म्हणाला, “तू माझ्याशी लग्न करशील काय?”

ती म्हणाली, “बरे....” तिला खरोखर आश्चर्याचा धक्का बसला. आणि ती म्हणाली, “होय.”

86 आणि त्याने म्हटले, “बरे...” तिला म्हटले की तो परत येईल. म्हणाला, “आता, तू फक्त स्वत:ला तयार कर आणि आजपासून एका वर्षानंतर मी परत येईन. बरे...आणि मी तुला घेईन, आणि मी तुला येथून दूर घेऊन जाईन. तुला परत असे काम करायला लागणार नाही. मी तुला घेऊन जाईन. आणि मी शिकागोला जाईन, आणि मी तुझ्यासाठी एक घर बांधीन, असे की तू कधी पहिले नाहीस.”

87 ती म्हणाली, “माझ्याकडे कधीच स्वतःचे घर नव्हते. मी एक अनाथ आहे,” ती म्हणाली.

88 तो म्हणाला, “मी तुझ्यासाठी एक घर बांधीन, एक खरं घर.” म्हणाला, “मी परत येईन.”

89 त्याने संपूर्ण वर्षात तिच्याबद्दल माहिती ठेवली. तिला जमेल ते काम तिने केले, जेणेकरून ती, तिच्या एक डॉलर प्रतिदिन, किंवा जे काही वेतन तिला मिळत होते त्यांतून पुरेसे पैसे जमवू शकेल, स्वत:साठी लग्नाचा पोशाख खरेदी करता यावा म्हणून. मंडळीची अगदी परिपूर्ण प्रतिमा! पहिले? पाहिले? तिने तिचे वस्त्र तयार केले होते.

90 आणि, तुम्हाला माहित आहे, जेव्हा ती तो लग्नाचा पोशाख तिच्या चुलत बहिणींना दाखवत असे, तेव्हा त्या म्हणत, “गरीब, मूर्ख मुली तू का. तू असा विचार करतेस काय की त्याच्यासारखा मनुष्याला तुझ्यामध्ये थोडातरी रस असेल?”

91 ती म्हणाली, “पण त्याने मला वचन दिले आहे.” आमेन. म्हणाली, “त्याने वचन दिले आहे.” म्हणाली, “मी त्याच्या शब्दावर विश्वास करते.”

92 “ओह, त्याने केवळ तुझी टर्र उडविली असेल.” म्हणाल्या, “जर त्याला कोणाला निवडायचेच असते तर त्याने आमच्यांतील एकीची निवड केली असती.”

93 “होय.” म्हणाली, “पण त्याने मला वचन दिले आहे. मी त्याची वाट पाहत आहे.” आमेन. मी सुद्धा.

94 अशाप्रकारे वेळ हळूहळू पुढे गेली. शेवटी तो दिवस उजाडला, एका विशिष्ट तासाला तो तिथे येणार होता, म्हणून तिने ते वस्त्र परिधान केले. आणि तिने त्याच्याकडून काही ऐकलेसुद्धा नव्हते. परंतु तरीही तिला माहीत होते की तो तिथे येईल, आणि म्हणून तिने लग्नाचा पोशाख घातला, सर्व गोष्टी तयार ठेवल्या.

95 बरे, तेव्हा त्या खरोखरीच्या तिच्यावर खूप हसल्या. कारण मुख्य मालकाने त्या अधिकाऱ्याला, किंवा—किंवा…त्यांच्यांतील एकही मुलीने त्याच्याविषयी असे काही ऐकले नव्हते, त्यामुळे हे सर्व त्यांच्यासाठी खूप रहस्यमय होते. हे सुद्धा आहे. ते खरोखरच आहे.

96 पण ही मुलगी हे सगळं सहन करत होती, केवळ तो परत येईल ह्या त्याच्या वचनावर अवलंबून होती.

97 त्यामुळे, त्या सर्व हसू लागल्या आणि एकीमेकींच्या कमरेत हात घालून तिच्याभोवती नाचू लागल्या. म्हणाल्या, “हा!” तुम्हाला माहित आहे, अशा प्रकारे हसत, म्हणाल्या, “गरीब, अशी मूर्ख मुलगी!”

98 ती फक्त तिथे उभी राहिली, तिला थोडीही लाज वाटली नाही. तिने तिची फुले पकडली होती. आणि तिचे लग्नाचे वस्त्र व्यवस्थित केले होते; तिने संघर्ष केला होता, तुम्हाला माहित आहे. “त्याच्या वधूने स्वतःला तयार केले आहे.” पाहिले? ती, स्वतःची फुले पकडून उभी राहून वाट पाहत राहिली.

99 त्या म्हणाल्या, “आता, मी तुला सांगितले की ते खोटे होते. पाहिले, तो येणार नाही.”

म्हणाली, “माझ्याकडे अजून पाच मिनिटं आहेत.” म्हणाली, “तो इथे असेल.”

ओह, त्या फक्त हसत होत्या!

100 आणि अगदी काही क्षणामध्ये जशी त्या जुन्या घडाळ्यामध्ये पाच मिनिटं होऊन गेली, त्यांनी घोड्यांच्या धावण्याचा, आणि धूळ चाकांखाली फिरण्याचा आवाज ऐकला. तो जुना टांगा थांबला.

101 तिने त्यांच्यामधून निघून दरवाज्याकडे उडी मारली. आणि त्याने त्या घोडागाडींतून उडी मारली, आणि ती त्याच्या कवेत जाऊन पडली. तो म्हणाला, “प्रिये, आता सर्व

संपले आहे.” तिच्या छोट्या सांप्रदायिक चुलत बहिणींना बसवून बघत ठेवले. ती—ती शिकागोला तिच्या घरी निघून गेली.

102 तशाच प्रकारचे एक वचन आहे जे मला माहित आहे, “मी तुमच्यासाठी जागा तयार करण्यासाठी गेलो आहे; तुम्हाला घेण्यासाठी परत येत आहे.” ते कदाचित म्हणत असतील कि आपण वेडे आहोत. पण भावा, आता ह्यावेळी, जेव्हा हे शिक्के अशा प्रकारे, ह्या अद्भुत गोष्टीखाली, उघडत असताना, मला जवळजवळ त्या घडाळ्याचा आवाज येत आहे, जसे ते अनंतकाळामध्ये जात आहे. मी जवळजवळ पूर्णपणे त्या दूताला, त्या सातव्या दूताच्या संदेशाच्या शेवटी, तिथे उभे राहून असे म्हणताना पाहत आहे कि, “आता अजून वेळ राहिली नाही.” ह्यांतल्या एखाद्या दिवसात, ती छोटी, निष्ठावंत वधू, येशूच्या कवेमध्ये उडून जाईल, पित्याच्या घरामध्ये घेतली जाईल. आपण आता पुढे जात असताना, ह्या गोष्टींविषयी विचार करूया.

103 सिंहाची सेवकाई, म्हणजे वचन, हि लक्षात घ्या; तो बैल, ते कामगार आणि अर्पण, सुधारकांचा धुर्तपणा, आणि ते—ते गरुडाचे युग कसे येते, जे ह्या गोष्टी उचलून त्या प्रगट करण्यासाठी आणि त्या दाखविण्यासाठी आहे.

104 आता आपल्याला दिसते की, कालच्या रात्रीच्या सभेतदेखील, त्या शिक्क्यासोबत ते महान रहस्य उघडले, जे माझ्या अगोदरच्या समजुतीच्या अगदी विरोधी आहे. असे गृहीत धरले की ते बरोबर होते, मी नेहमी असा विचार केला की ते वेदीखालील आत्मे त्या पहिल्या खिस्ती रक्तसाक्ष्यांचे होते. पण काल रात्री जेव्हा प्रभू देवाने आपल्यासाठी तो शिक्का फोडला तेव्हा आपल्याला दिसले की हे अगदी अशक्य आहे. ते, ते नव्हते. ते वैभवात गेले होते, पलीकडच्या बाजूला, आणि तिथे ते होते. आपल्याला दिसते की ते यहुदी होते जे त्यावेळी येतील जिथे ते…

105 आता जे बोलावलेले, एकशे चव्वेचाळीस हजार, जे आपण आज रात्री आणि उद्या पाहणार आहोत. आणि—आणि, सहाव्या व सातव्या शिक्क्यांमध्ये, ते एकशे चव्वेचाळीस बोलावले आहेत.

106 आणि आपल्याला दिसते की ते रक्तसाक्षी होते जे मारले गेले होते, आणि तरीसुद्धा त्यांच्याकडे…त्यांच्या अंगात पांढरे झगे होते, पण त्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात होती. आणि त्यांच्यांतील प्रत्येकाला पांढरा झगा देण्यात आला होता. आणि आपण ते घेतले. आणि असे काहीच जगामध्ये नाही, मी विश्वास करीत नाही, पण तो यहुदी लोकांचा घोळका महासंकटाच्या अगोदरच्या काळात जाणार. जेव्हा ह्या शेवटल्या युद्धांच्या काळात सर्वजणांकडून त्यांचा द्वेष होणे आहे. आणि आइशमनने, त्यांच्यांतील लाखो लोकांना जर्मनीमध्ये मारले. तुम्ही आताच परिक्षेविषयी ऐकले. लाखो निष्पाप लोकं मारली गेली, केवळ ते यहुदी होते म्हणून, आणखी कोणतेच कारण नाही.

107 बायबल इथे म्हणते, की, “देवाच्या साक्षीसाठी त्यांना मारण्यात आले, देवाच्या वचनासाठी, आणि त्यांच्याकडे जी साक्ष होती त्यासाठी.” आता आपल्याला दिसते की वधू ही देवाचे वचन आणि येशू ख्रिस्ताची साक्ष होती. ह्यांच्याकडे येशू खिस्ताची साक्ष नव्हती.

108 आणि आपल्याला दिसते की बायबल म्हणते, की, “पूर्ण इस्राएल, ते पूर्वनियोजित इस्राएल, वाचले जाईल.” रोमकारांस पत्र 11. आता आपल्याला हे ठाऊक आहे. आणि तिथे आपण ते आत्मे पाहिले.

109 आता पाहा किती जवळ आहे. हे अगोदर का शक्य नव्हते? कारण ते अगोदर घडले नव्हते. आता तुम्ही ते पाहू शकता, तुम्ही पाहा. पाहा, तो महान पवित्र आत्मा, ह्या गोष्टी

त्या त्या युगात आणि समयात येताना पाहतो. आणि आता ते प्रगट केले जात आहे, आणि मग तुम्ही तिथे पाहता आणि समजता कि ते सत्य आहे. तिथेच जेथे ते आहे.

110 आता, ते आयशमन ने मारलेले रक्तसाक्षी होते जे महासंकटाच्या किंवा महासंकटाच्या अगोदरच्या काळात होते. आता, ते केवळ, त्या एकशे चव्वेचाळीस हजारांचे प्रतिरूप दर्शवितात, जे आपण सहाव्या आणि सातव्या शिक्क्यांच्या मधोमध पाहणार आहोत. पाहिले?

111 आणि सातवा शिक्का हा केवळ एकच गोष्ट आहे, बस्स, आणि तो, "स्वर्गामध्ये अर्ध्या तासांपर्यंत शांतता पसरली." हे आहे. आणि आता फक्त देवच ते प्रगट करू शकतो. हे चिन्हांकित सुद्धा केलेले नाहीये, कुठेच नाही. ते उद्या रात्री आहे. माझ्यासाठी प्रार्थना करा. पाहिले?

112 आता जसे आपण सहाव्या शिक्क्यामध्ये जातो, तसे आपल्या लक्षात येते. आता, आपण ह्या सहाव्या शिक्क्याकडे पाहत असताना स्वर्गीय पिता आपल्याला मदत करो. आता सहाव्या अध्यायातील हे 12वे वचन.

*त्याने…सहावा शिक्का फोडला, ते मी पाहिले; तेव्हा मोठा भूमीकंप झाला; सूर्य केसांच्या बनविलेल्या तरटासारखा काळा झाला व सगळा चंद्र रक्तासारखा झाला;*

*आणि अंजिराचे झाड मोठ्या वाऱ्याने हालले म्हणजे त्याची कच्ची अंजिरे जशी खाली पडतात तसे आकाशांतील तारे पृथ्वीवर पडले.*

*आणि एखादे पुस्तक गुंडाळावे तसे आकाश गुंडाळले जाऊन निघून गेले आणि सर्व डोंगर व बेटे आपापल्या ठिकाणावरून ढळली.*

*आणि पृथ्वीवरील राजे व मोठे अधिकारी, सरदार, श्रीमंत, व बलवान लोक, सर्व दास…व स्वतंत्र माणसे, गुहांत व डोंगरांवरील खडकांत लपली.*

113 तिथे लक्षात आले? त्यांच्याकडे पाहा, "बलवान मनुष्ये," पाहा. त्यांनी काय केले होते? "त्यांनी त्या वेश्येच्या व्यभिचाराचा द्राक्षरस प्यायला होता." पाहिले? हा तोच वर्ग आहे ज्यांनी तिच्यांतील द्राक्षरस प्यायला होता. पाहिले?

*आणि ते डोंगरांस व खडकांस म्हणाले, आम्हांवर पडून, राजासनावर जो बसला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हाला लपवा.*

*कारण त्याच्या क्रोधाचा मोठा दिवस आला आहे, आणि कोणाच्याने टिकाव धरवेल?*

114 काय प्रस्तावना आहे त्याची…आता पाहा स्वाराचे, स्वाराचे पशू, आणि उत्तर देणारे पशू, थांबविले आहेत. मग, आपण घेतले, आपण रक्तसाक्ष्यांना सिंहासनाखाली पाहतो. आता, हे त्या वेळेपासून, हे रक्तसाक्षी हे खरे परंपरानिष्ठ यहुदी होते जे ख्रिस्ती विश्वासामध्ये मरण पावले…किंवा धार्मिक विश्वासामध्ये—मध्ये कारण ते ख्रिस्ती असू शकत नव्हते.

115 लक्षात ठेवा देवाने त्यांचे डोळे आंधळे केले होते. आणि ते खूप जास्त वेळासाठी आंधळे राहणार आहेत, जोपर्यंत परराष्ट्रीय मंडळी मार्गांतून काढली जात नाही. कारण, देव ह्या दोन्ही लोकांबरोबर एकाच वेळी व्यवहार करत नाही, कारण ते त्याच्या वचनाच्या खूप विरोधी आहे.

116 लक्षात ठेवा, तो इस्राएलाबरोबर नेहमी एक राष्ट्र म्हणून व्यवहार करतो. ते इस्राएल राष्ट्र आहे.

117 परराष्ट्रीय, वैयक्तिक असे, “परराष्ट्रीयांतून घेतलेले लोक.” आणि हे असेच असणे, परराष्ट्रीय, असेच होणे...सर्व जगांतील लोकमधूनच घेतलेले असायला हवे, असे आता आहे आणि मग त्यांच्यामध्ये यहुदी येतात. पाहिले? अशाप्रकारे की, अरबी, आणि आयरिश, आणि भारतीय, आणि असे अनेक, हे सर्व जगांतील लोक आहेत ज्यांनी वधू हा गुच्छ तयार होतो. पाहिले?

118 पण, आता, जेव्हा ह्या सत्तराव्या सप्तकाच्या शेवटी इस्राएलबरोबर व्यवहार करण्याची वेळ येते, तो त्यांच्याशी एक राष्ट्र म्हणून व्यवहार करतो, परराष्ट्रीय संपले आहेत. ती घटका लवकरच येत आहे आणि कदाचित ही—हीच रात्रसुद्धा असू शकते, जेव्हा देव परराष्ट्रीयांपासून पूर्णपणे मागे फिरेल. अगदी बरोबर! त्याने तसे म्हटले आहे, “परराष्ट्रीयांची सद्दी संपेपर्यंत ते यरुशलेमेच्या भितींना पायाखाली तुडवतील.” होय महाशय!

119 आणि मग, “जो दुष्कर्म करणारा दुष्कर्म करीत राहो; नीतिमान अधिक नीतिमान होत राहो.” पाहिले?

120 मग वेदीवरील आसनावर अजून रक्त असणार नाही...वेदीवर रक्त असणार नाही. अर्पण काढून घेतले जाईल आणि तिथे धूर आणि विजा आणि न्यायाशिवाय अजून काहीच उरणार नाही. आणि तेच आहे जे आजच्या रात्री इथे सांडले जात आहे. पाहा, कोकऱ्याने त्याची मध्यस्थीची सेवा केलेली आहे. मध्यस्थीची सेवा सिंहासनावरून संपविली आहे. आणि ते अर्पण, जसे आपण त्याला, सोडवणारा जवळचा कुटुंबी, असे अगदी बरोबर प्रतिरूप दर्शविले आहे, तो रक्तबंबाळ कोकरा जो पुढे आला. एक कोकरा जो वधण्यात आला, एक रक्तबंबाळ असा, जो मारण्यात आला होता, ठेचण्यात आला होता, तो पुढे आला आणि त्याच्या हातांतून पुस्तक घेतले. तेच की दिवस संपलेले आहेत. आता तो, जे त्याने सोडविले, त्यांना मागण्यासाठी येत आहे. आमेन! ह्यामुळे माझ्या अंगावर शहारे येत आहेत!

121 आपल्याला आता दिसते, योहान म्हणाला, “मी पाहिले की जेव्हा त्याने सहावा शिक्का उघडला, तेव्हा तिथे महान भूमीकंप झाला.” त्यावेळी सर्व निसर्गामध्ये खंड पडला. पाहिले?

122 देव महान कृत्ये करत होता, जसे की आजाऱ्याला बरे करणे, आणि आंधळ्याचे डोळे उघडणे, आणि असे महान कार्ये करत होता.

123 परंतु आपल्याला इथे दिसते की निसर्गाने एक खंड घेतला, होय, संपूर्ण निसर्गाने. पाहा काय घडले, “तो—तो भूमीकंप; सूर्य अंधकारमय झाला, आणि चंद्राने त्याचा प्रकाश देणे नाकारले, आणि तारे हलून खाली पडले.” आणि, का, पाहा, सर्वकाही अगदी सहावा शिक्का उघडण्याच्या वेळीच घडले. तेव्हाच हे घडले, ते रक्तसाक्षी घोषित झाले, त्याच्या अगदी नंतर. ते रक्तसाक्षी संपले होते.

124 आता तुम्ही पाहा आपण त्या घटकेच्या अगदी खूपच जवळ आहो. आपण कोणत्याही क्षणी जाऊ शकतो, पाहा, कारण मंडळी अगदी जवळजवळ तयार आहे तिचे उड्डाण घेण्यासाठी. पण लक्षात ठेवा, जेव्हा ह्या गोष्टी घडतील, वधू तिथे नसणार. फक्त लक्षात ठेवा, वधू गेलेली असणार, तिला ह्यांतील कशातूनही जाण्याची गरज नाही. तो महासंकटाचा काळ आहे, मंडळीच्या शुद्धीकरणाचा, हे मंडळींवर ठेवले आहे की तिने त्यांच्यातून जावे, वधूसाठी नव्हे. तो त्याच्या प्रेयसीला मार्गातून बाहेर काढतो. होय महाशय! तिने स्वतःला सोडविले आहे. पाहा, हे अशाप्रकारचे आहे...हि त्याच्या स्वतःची निवड आहे, त्याच्या स्वतःची पसंती आहे, जसा कोणीही मनुष्य त्याच्या वधूला घेतो. पाहिले? आता, तो भूमीकंप...

125 आता आपण वचनाशी तुलना करूया. माझी—माझी इच्छा आहे...तुमच्याकडे पेन्सिल आणि कागद आहे काय? तुम्ही माझ्यासाठी एक काम करावे अशी माझी इच्छा आहे. जर तुम्हाला लिहायचे असेल तर हे लिहून घ्या, कारण जर तुम्ही ध्वनिफीत घेत नसाल तर. आता आपण...माझी इच्छा आहे की तुम्ही माझ्याबरोबर वाचा.

126 ह्या महान घटनेच्या वचनांशी तुलना करा जसे आपण हे महान गुपित किंवा रहस्य पाहू, जे उद्धाराच्या पुस्तकांतील सहाव्या शिक्क्याखाली होते. आता लक्षात ठेवा, हि दडलेली रहस्ये आहेत. आणि सहा शिक्के, पूर्ण मिळून एक मोठे पुस्तक आहे, केवळ सहा गुंडाळ्या एकत्र गुंडाळलेल्या आणि त्या सर्व मिळून उध्दाराचे पुस्तक बनते. ह्याच प्रकारे पूर्ण पृथ्वीचा उद्धार झाला आहे.

127 म्हणूनच योहान रडला कारण जर कोणीच ते पुस्तक घेऊ शकले नसते, तर पूर्ण निर्मिती, सर्वकाही नाश पावले असते. तिचे रूपांतर केवळ अणू आणि परमाणूंमध्ये झाले असते, आणि वैश्विक प्रकाश, आणि निर्मितीसुद्धा नाही, व्यक्ती वगैरे, काहीच नाही. कारण आदामाने त्या पुस्तकाचा हक्क गमावला होता. त्याने तो नाकारला जेव्हा त्याने त्याच्या पत्नीचे ऐकले, आणि तिने, देवाच्या वचनाऐवजी, सैतानाचे तर्कवितर्क ऐकले. पाहिले? ते नाकारले होते.

128 मग, ते सैतानाच्या घाणेरड्या हातांमध्ये जाऊ शकले नाही, ज्याने तिला मोहात पाडले होते, आणि म्हणून ते त्याच्या मूळ मालकाकडे परत गेले, तसेच जसे कोणतेही अमूर्त्य कृत्य गेले असते, पाहा. सरळ मूळ मालकाकडे परत जाते, आणि तो देव होता, तो निर्माणकर्ता, ज्याने ते तयार केले. आणि त्याच्या हातात ते आहे.

129 आणि त्याची किंमत आहे, आणि तोच उद्धार आहे. उद्धाराची काहीतरी किंमत आहे, आणि तिथे कोणीच नव्हते जो ती चुकवू शकत होता. त्यामुळे त्याने म्हटले, त्याचे स्वतःचे नियम केले, सोडवणाऱ्या जवळच्या कुटुंबियाबद्दल त्याचे स्वतःचे नियम. मग, त्यांना कोणीच सापडले नाही. प्रत्येक मनुष्य जो शारीरिक संबंधाद्वारे जन्मला होता, शारीरिक इच्छांद्वारे जन्मला होता; तो मूळ पापामध्ये होता, सैतान आणि हव्व, आणि त्यामुळे तो करू शकत नव्हता. त्याच्यामध्ये काहीच नाही. पवित्र पोप, पादरी, ब्रम्हज्ञानी डॉक्टर, तो कोणीही असो, कोणीही पात्र नव्हता. आणि तो एखादा दूत असू शकत नव्हता, कारण तो एक जवळचा नातेवाईक पुरुष असा असणे जरुरीचे होते. तो मनुष्य असणे गरजेचे होते.

130 मग देव स्वतः, कुमारीपासून जन्म घेऊन, मानवी शरीर घेऊन जवळचा नातेवाईक बनला, आणि त्याने स्वतःचे रक्त सांडले. ते कोणा यहूद्याचे रक्त नव्हते. ते कोणा परराष्ट्रीयाचे रक्त नव्हते. ते देवाचे रक्त होते. पाहिले? बायबल म्हणते, "आपण देवाच्या रक्ताने वाचले गेलो आहोत."

131 एक मूल बापाचे रक्त घेते. आपल्याला हे ठाऊक आहे. जे काही पुल्लिंगामध्ये असते ते हिमोग्लोबिन तयार करते. तर आपल्याला दिसते, जशी कोंबडी अंड्यावर बसते, ती अंड्यावर बसू शकते, पण जर तो कोंबडा, किंवा तो जोडीदार, जर तिच्याबरोबर संबंध आला नसेल, तर त्या अंड्यातून पिल्लू येणार नाही. ते सुपीक झाले नाही. स्त्री ही केवळ एक उबवणपात्र आहे जे अंड घेते. पण ते अंड येते...तो जीवनाचा जंतू पुरुषकडून येतो.

132 आणि इथे, तो पुरुष देव स्वतः होता. त्यामुळेच मी म्हणतो, कसे वर हे खाली आहे, आणि—आणि मोठे हे छोटे आहे. देव इतका महान होता की तो असा झाला, त्याने स्वतःला इतक्या छोट्या स्वरूपात आणले, की तो एका कुमारिकेच्या उदरामध्ये राहील इतका छोटा जंतू बनला. आणि त्याभोवती त्याने पेशी आणि रक्त विकसित केले.

आणि पृथ्वीवर जन्म घेऊन वाढला. आणि तशाप्रकारच्या सुरुवातीने, शुद्ध, कोणतीच कामेच्छा नाही.

133 आणि मग त्याने ते रक्त दिले कारण तो आपला जवळचा कुटुंबी बनला. आणि तो सोडवणारा निकटचा कुटुंबी होता. आणि त्याने फुकटात ते रक्त वाहिले. त्याला तसे देणे नव्हते. त्याने ते फुकटात दिले, सोडविण्यासाठी.

134 मग तो देवाच्या वेदीवर जातो, आणि तिथे थांबतो, जेव्हा देवाच्या हातामध्ये ते उध्दाराचे पुस्तक आहे. आणि तो रक्तबंबाळ कोकरा त्या अर्पणाच्या वेदीवर उभा राहतो. तिथे तो कोकरा आहे, उद्धार करण्यासाठी, मध्यस्थी करत आहे.

135 मग हे सांगण्यासाठी कोणाची कशी हिम्मत होते, की मरिया किंवा योसेफ किंवा कोणी दुसरा नाशवंत मनुष्य मध्यस्थ असू शकतो! ते रक्त तिथे असल्याशिवाय तुम्ही मध्यस्थी करू शकत नाही. होय, महाशय. "देव आणि मनुष्य ह्यामध्ये एकच मध्यस्थ आहे, आणि तो ख्रिस्त येशू आहे." वचन तसेच म्हणते. तिथे तो उभा आहे, आणि जोपर्यंत तो शेवटचा आत्मा सोडवला जात नाही, आणि मग तो पुढे येऊन त्याने जे सोडविले त्याची मागणी करील. ओह, किती—किती महान पिता तो आहे!

136 आता लक्षात घ्या, मी नेहमी असे शिकविले आहे, कि, "दोन किंवा तीन साक्षीदारांच्या मुखामध्ये, वचन सिद्ध होऊ दे,." आणि, वचन, जसे की तुम्ही एक वचन घेऊन काहीच सिद्ध करू शकत नाही जोपर्यंत काहीतरी दुसरे त्याच्याबरोबर जात नाही. पाहिले?

137 पाहा, मी एक वचन घेईन आणि म्हणेन, "यहुदा गेला आणि स्वतःला फास घेतला," दुसरे घेईन आणि म्हणेन, "तुम्ही जा आणि तसेच करा." पाहिले? पण, पाहा, ते दुसऱ्याबरोबर मिसळणार नाही.

138 आणि मी विचार केला, ह्या सहाव्या शिक्क्यामध्ये, जेव्हा पवित्र आत्म्याने ते पुढे आणून उघडले, आणि मी पाहिले ते काय आहे, मग मी विचार केला की हे चांगले असेल कि आजच्या रात्री ह्या वर्गाला थोडे काहीतरी वेगळे दिले तर. पाहिले? कारण, कदाचित हे खूप दमछाक करणारे होईल जर मी केवळ बोलत राहून तुम्ही ऐकत राहिले, म्हणून मी विचार केला आपण थोडे काहीतरी वेगळे करू.

139 आता लक्षात घ्या. हा महान कार्यक्रम त्या रहस्याच्या म्हणजे उद्धाराच्या पुस्तकाखाली शिक्कामोर्तब केला होता. आता तो त्या कोकऱ्याच्या हातात आहे, तो हे फोडणार आहे.

140 आता आपण मत्तय 24वा अध्याय पाहूया, कोकरा स्वतः बोलताना. आता, कोणालाही माहित आहे की ख्रिस्त हा संपूर्ण पुस्तकाचा लेखक आहे. पण हे त्याचे—त्याचे भाषण आहे इथे, किंवा त्याचे प्रवचन आहे त्याच्या लोकांसाठी, ठीक आहे, यहुदी लोकांसाठी.

141 आता माझी इच्छा आहे की तुम्ही तुमचे पुस्तक *असे* पकडा, मत्तय 24 आणि प्रकटीकरण 6, *अशा प्रकारे.* [भाऊ ब्रॅन्हम त्यांचे बायबल हे दोन अध्याय उघडून पकडतात—सम्पा.] आणि आपण इथे थोडीशी तुलना करूया.

142 आता, हे पाहा आता, आणि तुम्हाला समजेल कि हे कसे—कसे आहे. पाहा, तो कोकरा *इथे* काय दाखवत आहे, अगदी बरोबर चिन्हामध्ये त्याने *इथे* वचनात काय म्हटले. अगदी बरोबर करीत आहे, म्हणजे ते—ते ह्याला बरोबर करते. इथे…*इथे* तो त्याविषयी बोलत आहे, आणि *इथे* ते घडले आहे. पाहा ही अगदी परिपूर्ण पुष्टी आहे.

143 आता, आपण संत मत्तयचा 24वा अध्याय आणि प्रकटीकरण 6 पाहू, आणि मत्तयच्या 24व्या अध्यायाशी तुलना करू. आपल्या सर्वांना माहीत आहे की हाच अध्याय आहे ज्याकडे प्रत्येक विद्वान, प्रत्येकजण जातो, महासंकटाच्या काळाविषयी बोलताना. तो मत्तयच्या 24व्या अध्यातून येतो. आणि आता आपण...जर तसे आहे, आता आपण... कारण आपल्याला माहित आहे की हा सहावा शिक्का न्यायाचा शिक्का आहे. हा न्यायाचा शिक्का आहे, अगदी बरोबर जो तो आहे.

144 आता, पाहा, आपण ख्रिस्तविरोधकाची स्वारी पाहिली. पाहिले की मंडळी जाते; आता हे संपले आहे, वर जाते. मग आपण त्या यहूद्यांतील ते वेदिखालचे रक्तसाक्षी पाहतो. आता इथे न्याय येणे आहे त्या लोकांवर जे...

145 ह्या महासंकटाच्या न्यायामधून ते एकशे चव्वेचाळीस मुक्ती पावलेले यहुदी पुढे येतील. मी तुम्हाला सिद्ध करीन, ते परराष्ट्रीय नव्हे तर यहुदी आहेत. त्यांचा वधूशी काहीच संबंध नाही, काहोच नाही. वधू, आपण पाहिले कि वधू अगोदरच गेलेली असणार. तुम्ही हे दुसऱ्या कुठेच बसवू शकत नाही; प्रेषितांच्या कृत्यांतील 19व्या अध्यायापर्यंत पुन्हा परत येत नाही.

146 आता, लक्षात घ्या की सहावा शिक्का हा वचनातील न्यायाचा शिक्का आहे.

147 आता इथे, आपण चालू करूया आणि संत मत्तयचा 24वा अध्याय वाचूया. आता मला तुम्हाला इथे काहीतरी द्यायचे आहे जे मी इथे शोधले व मिळाले. बरे, आता संत मत्तयच्या 1 ते 3 अध्यायातून आपण प्रथम वाचणार आहोत.

> *मग येशू मंदिरातून बाहेर निघून चालला असता त्याचे शिष्य त्याला मंदिराच्या इमारती दाखवावयास जवळ आले.*
>
> *तेव्हा येशू त्यांस म्हणाला, हे सर्व तुम्हांला दिसते ना? मी तुम्हांला खचित सांगतो, येथे चिऱ्यावर असा एकही चिरा राहणार नाही की जो पाडला जाणार नाही.*
>
> *तो जैतुनांच्या डोंगरावर...बसला...असता शिष्य त्याच्याजवळ एकांती येऊन म्हणाले, ह्या गोष्टी केव्हा होतील? ...आणि आपल्या येण्याचे व ह्या युगाच्या समाप्तीचे चिन्ह काय, हे आम्हांस सांगा?*

148 आता इथे आपण थांबूया. खरे पाहता, ही तीन वचने, इसवीसन पूर्व 30 मध्ये चार एप्रिल रोजी, मंगळवारी दुपारी घडली. आणि पहिली दोन वचने, इसवीसन पूर्व 30 मध्ये चार एप्रिल रोजी, मंगळवारी दुपारी घडली. आणि तिसरे वचन त्याचदिवशी म्हणजे मंगळवारी संध्याकाळी घडले. पाहिले?

149 ते मंदिरात आले आणि त्यांनी त्याला ह्या गोष्टी विचारल्या. "*ह्याविषयी* काय? आणि *ह्याविषयी* काय? ह्या महान मंदिराकडे पहा! ते आश्चर्यजनक नाही काय?"

त्याने म्हटले, "तिथे चिऱ्यावर असा एकही चिरा उरणार नाही."

150 मग तो डोंगरावर गेला आणि खाली बसला, पाहा. की तिथे, तिथे तो चालू करतो; त्यावेळी दुपार आहे. आणि मग जेव्हा ते गेले, त्यांनी त्याला तिथे वर विचारले, म्हणाले, "आम्हाला काही गोष्टींविषयी जाणून घ्यायचे आहे."

151 आता लक्षात घ्या, इथे तीन प्रश्न आहेत जे यहुद्यांनी, त्याच्या शिष्यानी विचारले. तीन प्रश्न विचारले आहेत. आता लक्ष द्या. "काय," प्रथम, प्रथम, "काय...ह्या गोष्टी कधी होतील, कधी, 'तिथे चिऱ्यावर असा एकही चिरा उरणार नाही'?" "तुझ्या येण्याचे

चिन्ह काय असेल?" दुसरा प्रश्न. "आणि ह्या युगाच्या समाप्तीचे?" हे पाहिले? तिथे तीन प्रश्न आहेत.

152 आता, इथेच खूप लोकं चूक करितात. ते ह्या येथील गोष्टी कोणत्यातरी युगाशी जोडतात, जेव्हा तो तीन प्रश्नांची उत्तरे देत आहे, तुम्ही पाहा. ते...

153 आता पाहा, तिसरे वचन किती सुंदर आहे, पाहा, तिसऱ्या वचनांतील शेवटला वाक्प्रचार, "आणि काय असेल..." प्रथम, त्यांनी त्याला इथे जैतुनांच्या डोंगरावर एकांतात बोलाविले. "आम्हाला सांग, ह्या गोष्टी कधी होतील?" पहिला प्रश्न. "तुझ्या येण्याचे चिन्ह काय असेल?" दुसरा प्रश्न. "आणि ह्या युगाच्या समाप्तीचे?" तिसरा प्रश्न. पाहिले? तिथे तीन वेगवेगळे प्रश्न विचारले आहेत. आता, आता माझी इच्छा आहे कि तुम्ही मागे फिरवा आणि पाहा येशू त्यांना कशाप्रकारे ह्या गोष्टींविषयी सांगतो.

154 ओह, हे खूप सुंदर आहे! मी...अगदी मला असे करते...मला—मला—मला... तो कोणता शब्द होता जो आपण त्या रात्री वापरला? [मंडळी म्हणते, "उत्तेजना."—सम्पा.] ती उत्तेजना प्रकटीकरणातून मिळते! लक्षात घ्या.

155 आता आपण ह्या पुस्तकांतील पहिल्या शिक्क्याकडे वळूया, आणि ह्या पहिला शिक्क्याची तुलना, ह्या पहिल्या प्रश्नाबरोबर करू या.

156 आणि प्रत्येक प्रश्न, त्याची तुलना अगदी बरोबर करा, आणि पाहा कि ते दोन्ही हातात हात घालून चालत नाहीत का, अगदी त्याचप्रकारे जसे आपण ह्या दुसऱ्या गोष्टी म्हणजे मंडळ्यांचे समय आणि सर्वकाही उघडताना केले, अगदी बरोबर त्याचप्रकारे. मग, तिथे तो शिक्का आहे, अगदी परिपूर्णपणे उघडलेला असा. आता, लक्ष द्या. आता आपण प्रथम वाचणार आहोत, कारण मग..."मग त्याने त्यांना उत्तर दिले..." आणि—आणि मग आता तो—तो उत्तर देण्यास सुरुवात करणार आहे आणि आपल्याला त्याची तुलना शिक्क्यांबरोबर करायची आहे.

157 आता बघा. पहिला शिक्का हा प्रकटीकरण 6:1 आणि 2 आहे. आता आपण 6:1 आणि 2 वाचू.

> *आणि—आणि मी पाहिले...कोकऱ्याला जेव्हा त्याने त्या सात शिक्क्यांपैकी एक शिक्का फोडला, तेव्हा त्या चार प्राण्यांपैकी एक मेघगर्जनेसारख्या ध्वनीने ये आणि पाहा असे म्हणाला, ते मी ऐकले.*
>
> *मग मी पाहिले तो एक 'पांढरा घोडा' आणि त्याच्यावर बसलेला स्वार माझ्या दृष्टीस पडला; त्याच्याजवळ धनुष्य होते, मग त्याला मुगुट देण्यात आला; तो विजय मिळवीत मिळवीत आणखी विजयावर विजय मिळविण्यासाठी निघून गेला.*

158 हा स्वार कोण होता म्हणून आपण पाहिले? [मंडळी म्हणते, "ख्रिस्तविरोधक."—सम्पा.] ख्रिस्तविरोधक. आता, मत्तय 24, 4 आणि 5.

> *आणि येशूने त्यांस उत्तर दिले, तुम्हांस कोणी फसवू नये म्हणून सावध असा.*
>
> *कारण पुष्कळ जण माझ्या नावाने येऊन मी ख्रिस्त आहे असे म्हणतील व पुष्कळांस फसवितील.*

159 हे पाहिले? ख्रिस्तविरोधक. तिथे तुमचा शिक्का आहे. पाहिले? पाहिले? त्याने ह्याविषयी *इथे* म्हटले; आणि *इथे* त्यांनी एक शिक्का उघडला, आणि इथे तो होता, अगदी परिपूर्ण.

160 आता, तो दुसरा शिक्का, मत्तय 24:6, प्रकटीकरण 6:3 व 4. आता पाहा, मत्तय 24:6. आता मला पाहू द्या कि ते काय म्हणते.

*आणि तुम्ही लढायांविषयी ऐकाल व लढायांच्या आवया ऐकाल; घाबरून जाऊ नये म्हणून सांभाळा; कारण असे होणे अवश्य आहे:' परंतु तेवढ्यांत शेवट होत नाही.*

161 ठीक आहे, आपण दुसरा शिक्का घेऊया, प्रकटीकरण 6:3 आणि...दोन. पाहा तो आता काय म्हणत आहे.

*आणि जेव्हा त्याने दुसरा शिक्का फोडला, तेव्हा दुसरा प्राणी ये...पाहा असे म्हणाला ते मी ऐकले.*

*आणि तेव्हा दुसरा 'घोडा' निघाला; तो अग्निवर्ण होता आणि त्याच्यावर बसलेल्या स्वाराकडे पृथ्वीवरील शांतता हरण करण्याचे आणि लोकांकडून एकमेकांचा वध करविण्याचे काम सोपविले होते; त्याला मोठी तरवार देण्यात आली होती.*

162 पूर्णपणे, अगदी बरोबर! ओह, मला वचनाला, स्वतःहुन उत्तर देण्यास लावायला आवडते. तुम्हाला नाही का आवडत? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] पवित्र आत्म्याने ते सर्व लिहिले, पण तो हे प्रगट करू शकतो.

163 आता आपण तिसरा शिक्का लक्षात घेऊया. आता, हा दुष्काळ आहे. आता मत्तय 24:7 आणि 8. आपण मत्तय 7 आणि 8 कडे जाऊया.

*आणि राष्ट्रावर राष्ट्र व राज्यावर राज्य उठेल: आणि जागोजागी दुष्काळ... व भूमीकंप...होतील.*

*पण ह्या सर्व गोष्टी वेदनांचा प्रारंभ होत.*

164 पाहा, तुम्ही आता अगदी त्यावर येत आहात. आता, प्रकटीकरण, सहाव्या, आता आपण तिसरा शिक्का उघडणार आहोत. तो प्रकटीकरण 6:5 आणि 6 मध्ये सापडतो.

*आणि जेव्हा त्याने तिसरा शिक्का फोडला, तेव्हा मी—मी तिसरा प्राणी ये आणि पाहा, असे म्हणाला ते मी ऐकले. मग मी पाहिले तो एक काळा घोडा आणि त्याच्यावर बसलेला कोणीएक माझ्या दृष्टीस पडला; त्याच्या हातांत तराजू होते.*

*आणि जणू काय चार प्राण्यांच्या मधून निघालेली वाणी मी ऐकली, ती अशी...रुपयाला...शेरभर गहू, आणि रुपयाला तीन शेर जव; तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी करू नको.*

165 दुष्काळ! पाहा, अगदी तोच शिक्का, तीच गोष्ट येशूने सांगितली. ठीक आहे.

166 चौथा शिक्का, "भीतीदायक" आणि "मृत्यू.", मत्तय 24, लक्षात घ्या. आपण 8वे वचन वाचूया, 7वे आणि 8वे, मला वाटते, ती ह्या चौथ्या शिक्क्यावर आहेत, मला ती इथे मिळाली. ठीक आहे.

167 आता, मी इथे मागे काय वाचले? मी काहीतरी चुकीचे वाचले का? होय, माझ्याकडे ते खूण करून ठेवलेले होते. होय, तिथे आपण आहोत. आता आपण जात आहोत. आता आपण जाऊया. ठीक आहे, महाशय.

168 आता आपण इथे 7व्या वर चालू करूया, जे चौथ्या शिक्क्यावर आहे; आणि 6:7 आणि 8, दुसऱ्यावर, प्रकटीकरणामध्ये.

169 आता, मत्तय 24 मधील 7वे आणि 8वे वचन पाहूया. ठीक आहे, आता.

*आणि राष्ट्रावर राष्ट्र व राज्यावर राज्य उठेल; आणि जागोजागी दुष्काळ... व भूमीकंप...होतील.*

*पण ह्या सर्व गोष्टी वेदनांचा प्रारंभ होत.*

170 आता तो चौथा शिक्का, जसे आपण इथे वाचले, तो चौथा शिक्का होता, जो ह्या दुसरीकडे 7व्या आणि 8व्या मध्ये चालू होतो.

*आणि जेव्हा त्याने चौथा शिक्का फोडला, आणि चौथा प्राणी म्हणाला, ये आणि पाहा.*

*आणि मी पाहिले, तो एक फिकट रंगाचा घोडा...*

171 आता थांबा. मी हे चुकीचे लिहिले होते. हो. हो. आता फक्त एक मिनिट, आता, 7 आणि 8.

172 आता आपण मत्तय 24:7 आणि 8 पाहूया. आता आपण पाहूया. आपल्याला ते मिळेल. ते तिसऱ्याचे उघडणे आहे, नाही का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] मत्तय 24:7 आणि 8. क्षमा करा. आता, ते पावसाची सुरुवात करते...किंवा दुष्काळ, दुष्काळाची सुरुवात करते. ठीक आहे.

173 आता, ते "भीतीदायक" आणि "मृत्यू." होय, महाशय. आता आपण त्याकडे जात आहोत, 7 आणि 8. आता तो चौथा शिक्का आहे. आपण पाहूया कि आपल्याला चौथा शिक्का कुठे मिळतो. "आणि जेव्हा त्याने चौथा शिक्का उघडला..." होय, हा तो फिकट रंगाच्या घोड्याचा स्वार आहे, जो "मृत्यू" आहे, पाहा.

*आणि—आणि मी पाहिले, आणि एक फिकट रंगाचा घोडा आणि तो... फिकट रंगाचा घोडा: आणि जो त्यावर बसला होता त्याचे नाव मृत्यू होते, आणि अधोलोक त्याच्यामागे...चालला होता. आणि त्याला, पृथ्वीच्या चौथ्या भागावर, तारवारीने, दुष्काळाने, मरीने व पृथ्वीवरील श्वापदांकडून माणसांना जीवे मारण्याचा, अधिकार देण्यात आला होता.*

174 आता, पाहा, तो "मृत्यू" होता.

175 आता, तो पाचवा शिक्का, मत्तय 24:9–13. आपण पाहूया कि मी ह्यावेळी हे बरोबर घेतले आहे का. पाहा?

आणि *तेव्हा तुमचे हाल करण्याकरिता ते तुम्हांस धरून देतील, व तुम्हांस जीवे मारतील आणि माझ्या नावामुळे सर्व राष्ट्रे तुमचा द्वेष करितील.* आणि...

*आणि तेव्हा पुष्कळजण विश्वासघात करितील...पुष्कळजण अडखळतील आणि एकमेकांचा विश्वासघात करितील, आणि एकमेकांचा द्वेष करितील.*

*आणि पुष्कळ खोटे संदेष्टे उठतील, आणि...अनेकांस फसवितील.*

*आणि अनीती वाढल्यामुळे पुष्कळांची प्रीती थंडावेल.*

*परंतु जो...शेवटपर्यंत टिकून राहील तोच तरेल.*

176 आता, आपण आता पाचव्या शिक्क्यावर आहोत. आणि ते कालच्या रात्री पाहिले, पाहा. "ते तुम्हाला धरून देतील, एकमेकांचा विश्वासघात करितील," आणि असे पुढे.

177 आता इथे 6व्या शिक्क्याकडे पाहा, 6:9 ते 11. आता आपण त्याकडे येऊया, प्रकटीकरण 6:9 ते 11.

*आणि जेव्हा त्याने पाचवा शिक्का फोडला तेव्हा मी वेदीखाली आत्मे पाहिले; ते आत्मे देवाच्या वचनामुळे व त्यांनी जी साक्ष दिली होती तिच्यामुळे जीवे मारलेल्या लोकांचे होते.*

*आणि ते मोठ्याने ओरडून म्हणाले, हे स्वामी तू पवित्र...व सत्य आहेस. तू...कोठपर्यंत न्यायनिवाडा करणार नाहीस आणि पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांपासून आमच्या रक्ताचा सूड घेणार नाहीस?*

*आता, आणि त्या प्रत्येकांस एकएक शुभ्र झगा देण्यात आला आणि त्यांस असे सांगण्यात आले की, तुमच्या सोबतीचे दास व तुमचे बंधू...तुम्हांसारखे जीवे मारले जाणार, त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत, तुम्ही आणखी थोडा वेळ विश्रांती घ्या.*

178 आता, तुम्ही पाहा, इथे ह्या पाचव्या शिक्क्याखाली आपल्याला—आपल्याला हौतात्म्य दिसते.

179 आणि इथे 24:9...ते 13 मध्ये देखील आपल्याला दिसते की ते हौतात्म्य होते. "ते तुम्हाला धरून देतील आणि तुम्हाला जीवे मारतील," आणि असे पुढे. पाहा, तोच शिक्का उघडला जात आहे.

180 आता, सहाव्या शिक्क्यामध्ये, तोच ज्याकडे आता आपण येत आहोत, मत्तय 24:29 आणि 30. 24 आणि आपण 29 आणि—आणि 30 पाहूया. इथे आपण आहोत.

आता, आता आपण प्रकटीकरण 6:12 ते 17 देखील बघणार आहो.

181 ते बरोबर तेच आहे जे आपण आताच वाचले. आता हे ऐका, आता, येशूने मत्तय... 29, 24:29 आणि 30 मध्ये काय म्हटले.

*त्या दिवसांतील संकटांनंतर लागलेच...*

182 काय? जेव्हा...हे संकट, हे लहान संकट, त्याच्यांतून ते गेले, पाहा.

*...सूर्य अंधकारमय होईल, चंद्र प्रकाश देणार नाही, तारे आकाशांतून पडतील व आकाशाची बळे डळमळतील;*

*आणि तेव्हा मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आकाशांत प्रगट होईल; आणि मग पृथ्वीवरील सर्व जातीचे लोक शोक करतील, आणि ते मनुष्याच्या पुत्राला आकाशांतल्या मेघांवर आरूढ होऊन, पराक्रमाने व मोठ्या वैभवाने येताना पाहतील.*

183 आता, इथे प्रकटीकरणामध्ये वाचा, तो—तो सहावा शिक्का, तोच जो आता आपण पाहणार आहोत.

*आणि...त्याने सहावा शिक्का फोडला, ते मी पाहिले; तेव्हा मोठा भूमीकंप झाला; आणि सूर्य केसांच्या बनविलेल्या तरटासारखा काळा झाला* (पाहिले?) *व सगळा चंद्र रक्तासारखा झाला;*

*आणि अंजिराचे झाड मोठ्या वाऱ्याने हालले म्हणजे त्याची कच्ची फळे जशी खाली पडतात, तसे...आकाशांतील तारे पृथ्वीवर पडले.*

*आणि एखादे पुस्तक गुंडाळावे, तसे आकाश गुंडाळले जाऊन निघून गेले आणि सर्व डोंगर व बेटे आपापल्या...ठिकाणांवरून ढळली.*

*आणि पृथ्वीवरील राजे व मोठे अधिकारी, सरदार, श्रीमंत व बलवान लोक सर्व दास व सर्व स्वतंत्र माणसे, गुहांत व डोंगरांतील खडकांत लपली.*

*आणि ते डोंगरांस व खडकांस म्हणाले, आम्हांवर पडून राजासनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या क्रोधा—क्रोधापासून आम्हांस लपवा.*

*कारण त्याच्या क्रोधाचा मोठा दिवस आला आहे...कोणाच्याने टिकाव धरवेल?*

184 अगदी परिपूर्णपणे, लगेच मागे वळवा, पाहा इथे मत्तय 24:29 मध्ये येशूने काय म्हटले. ऐका. "नंतर," हि आइशमनची केस आणि पुढचे सर्व.

*त्या दिवसांतील संकटांनंतर लागलेच सूर्य अंधकारमय होईल...चंद्र प्रकाश देणार नाही, तारे आकाशांतून पडतील व आकाशाची बळे डळमळतील:*

आता पाहा

*तेव्हा मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आकाशांत प्रगट होईल, मग पृथ्वीवरील सर्व जातीचे लोक शोक करितील, आणि ते मनुष्याच्या पुत्राला आकाशातल्या मेघावर पराक्रमाने आणि मोठ्या वैभवाने येताना पाहतील.*

*आणि...मनुष्याचा पुत्र तुतारीचा मोठा नाद करून आपले दूत पृथ्तीभोवती पाठवून देईलेत पृथ्वीच्या चारही....कोपऱ्यातून.*

185 पाहा, अगदी बरोबर, जे येशूने मत्तय 24 मध्ये म्हटले, आणि इथे प्रकटीकरणकर्त्याने, सहावा शिक्का उघडला ह्यांची तुलना केली तर हे अगदी बरोबर आहे. आणि येशू महासंकटाच्या काळाविषयी बोलत होता. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर तीन वेळा ठोकतात—सम्पा.] पाहिले?

186 प्रथम त्याने विचारले, ह्या गोष्टी कधी होतील, कधी हे मंदिर तोडले जाईल. त्याने त्याचे उत्तर दिले. नंतर त्याने विचारले कधी अशी वेळ येईल...हुतात्म्यांचे युग येईल. आणि केव्हा *ह्या* गोष्टी होतील, केव्हा ख्रिस्तविरोधक उठेल, आणि केव्हा ख्रिस्तविरोधक मंदिराचा पाडाव करील.

187 दानिएल, कसे आपण मागे जाऊन दानिएलाला उचलू शकतो, जेव्हा त्याने म्हटले की, हा राजकुमार येणार आहे. तुम्ही वाचक हे जाणता. आणि त्याने काय केले पाहिजे? तो दररोजचे अर्पण बंद करील, आणि कायकाय गोष्टी त्या वेळी घडतील. म्हटले...

188 येशूने देखील, ह्याविषयी बोलताना, ते अधोरेखित केले. म्हटले, "जेव्हा तुम्ही, दानिएलाने सांगितलेला, ओसाडीचा अमंगळ पदार्थ, पवित्र स्थानामध्ये, उभा राहताना पाहाल." [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर तीन वेळा ठोकतात—सम्पा.] ते काय आहे? जेव्हा त्यांनी मंदिर जाळून खाली पडले तेव्हा ओमरची मशीद, मंदिराच्या जागी उभी राहिली. म्हटले, "जे डोंगरावर असतील...जे धाब्यावर असतील, त्यांनी आपल्या घरातून काही बाहेर काढण्याकरिता खाली उतरू नये, किंवा जो शेतामध्ये असेल त्याने माघारी येऊ नये. कारण त्यावेळी संकट येईल!" तुम्ही पाहिले? आणि ह्या सर्व गोष्टी घडून आल्यावर त्यांना आता खाली घेऊन, हा सहावा शिक्का उघडताना, त्या प्रगट केल्या.

189 आता माझी इच्छा आहे की तुम्ही हे लक्षात घ्यावे कि येशू...आता, उद्या रात्री मी ह्यावर बोलेन, येशूने सातव्या शिक्क्यावर शिकविणे गाळले. तो इथे नाहीये. पाहा, ह्यानंतर तो सरळ दाखल्यावर जातो. आणि योहानाने सातवा शिक्का गाळला. तो सातवा, शेवटचा, सातवा शिक्का, ती एक महान गोष्ट असणार आहे. तो लिहिला देखील नाही, पाहा. सातवा

शिक्का गाळला; त्या दोघांनीही. आणि प्रकटीकरणकर्ता, जेव्हा देवाने फक्त म्हटले तिथे... योहानाने म्हटले, "स्वर्गामध्ये केवळ शांतता होती." येशूने त्याविषयी कधी एक शब्दही बोलला नाही.

190 आता 12व्या वचनाकडे लक्ष द्या, बघा, इथे प्राणी नाही. हे 12वे वचन आहे, आपण आपल्या शिक्क्याकडे, तो उघडताना बघण्यासाठी, वळत आहोत. कोणताही प्राणी, किंवा जीवधारी जीव, असा इथे दाखवला नाही, जसा तो पाचव्या शिक्क्यामध्ये होता. का? हे, सुवार्तेच्या युगाच्या दुसऱ्या बाजूला घडले, जो महासंकटाचा काळ आहे. हा सहावा शिक्का तो महासंकटाचा काळ आहे. तेच घडते. वधू निघून गेली आहे. पाहिले? तिथे कोणताच जीवधारी जीव किंवा काहीच असे नाही ज्याविषयी सांगता येईल. तिथे केवळ...आता, देव मंडळीबरोबर अजून व्यवहार करीत नाही; ती निघून गेली आहे.

191 तो इस्राएलबरोबर व्यवहार करतो, पाहा. हि दुसरी बाजू आहे, हीच वेळ आहे जेव्हा इस्राएल स्वर्गाच्या राज्याचा संदेश स्वीकारते, जो प्रकटीकरण 11 मधील, त्या दोन संदेष्ट्यांकडून येतो. लक्षात ठेवा, इस्राएल हे एक राष्ट्र आहे, देवाचे सेवक असे राष्ट्र. आणि जेव्हा—जेव्हा—जेव्हा इस्राएल मध्ये आणले जाईल, तेव्हा ते एक—एक राष्ट्रीय प्रकरण असेल.

192 इस्राएल हे ते राज्याचे युग आहे, जिथे दाविद...दाविदाचा पुत्र, राजासनावर बसतो. हेच कारण आहे की ती स्त्री ओरडून म्हणाली, "तू दविदाचा पुत्र!" आणि दाविद हा तर...दाविदाचा पुत्र! देवाने दाविदाला त्याची शपथ दिली, की तो आपला पुत्र वाढविल, जो त्याचे राजसन घेईल. ते सर्वकाळचे राजसन असेल. पाहिले? त्याचा अंत नसेल. शलमोनाने ते, छायारूपात, मंदिरात दिले. आणि येशूने आताच त्यांना इथे म्हटले, की, "तिथे चिऱ्यावर असा एकही चिरा उरणार नाही." पण तो त्यांना इथे हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, की, तो परत येत आहे.

"तू परत कधी येशील?"

193 "मी परत येण्यापूर्वी ह्या गोष्टी घडतील." आणि इथे त्या आहेत!

आता आपण महासंकटाच्या काळात आहोत.

लक्षात घ्या, जेव्हा पृथ्वीवर राज्य स्थापित केले जाईल...

194 आता, हे कदाचित थोडेसे धक्कादायक असेल. आणि जर काही प्रश्न असेल तर तुम्ही—तुम्ही अजूनही मला विचारू शकता तुम्हाला सांगितल्या वर जर तुम्हाला तो प्रश्न पुढे मांडायचे असेल तर ठेवा जरी तुम्हाला माहीत नव्हते तर त्या विषयी जाणत नाही तरी ठेवा.

195 हजार वर्षांच्या काळात, इस्राएल हे एक राष्ट्र असे आहे, ते बारा वंश एक राष्ट्र असे.

196 पण वधू हि महालात आहे. ती आता राणी आहे. तिचे लग्न झाले आहे. आणि सर्व पृथ्वी, यरुशलेममध्ये ह्या शहरात येईल, आणि तिचा महिमा तिच्यामध्ये परत आणील. "आणि दरवाजे रात्री बंद केले जाणार नाहीत कारण तेथे रात्र नसणार." पाहिले? दरवाजे नेहमी उघडे असतील. "आणि पृथ्वीवरील राजे," प्रकटीकरण...:22, "त्याचा महिमा आणि सन्मान ह्या शहरात आणतील." पण वधू, कोकरासोबत आतमध्ये आहे. अरे, बापरे! तुम्ही ते तिथे पाहू शकता! नाही...वधू हि बाहेर द्राक्षमळ्यात मजुरी करीत असणार नाही. नाही, महाशय. ती वधू आहे. ती राजाची राणी आहे. ते दुसरे असतील जे तिथे बाहेर मजुरी करतील, राष्ट्र, वधू नव्हे. आमेन. ठीक आहे.

197 ह्या संदेशवाहकांकडे लक्ष द्या, हे प्रकटीकरण12 मधील दूत, हे दोन संदेष्टे, ते प्रचार करणार आहेत, “देवाचे राज्य जवळ आले आहे!” पाहिले? त्या राज्याची रचना होणे आहे. ती वेळ, दानीएलच्या सत्तराव्या सप्तकांतील, शेवटले तीन आणि एकांतील अर्धे वर्ष, हे यहुदी जे त्याचे लोक आहेत त्यांच्यासाठी आहेत. आता हे लक्षात ठेवा, की, हे सिद्ध करण्यासाठी की, हा दानिएलाच्या सत्तराव्या सप्तकांतील शेवटचा भाग आहे. त्यावर माझ्याकडे उद्यासाठी एक प्रश्न आहे. पाहिले?

198 आता, सत्तर सप्तके देण्यात आली होती, जी सात वर्षे आहेत. आणि सातव्या सप्तकाच्या मधोमध मसिहा, लोकांसाठी अर्पण म्हणून छेदण्यात येणार होता. आणि तिथे अजूनही एक निर्धार होता की साडेतीन वर्षे हि अजूनही इस्राएलसाठी निश्चित केली होती. मग, जेव्हा मसिहा छेदण्यात आला तेव्हा यहुदी हा आंधळा केला गेला की ज्यामुळे त्याला समजले नाही की तो मसिहा होता.

199 आणि, मग, जेव्हा मसिहा छेदला गेला, तेव्हा ते सुवार्ता आणि कृपेचे युग परराष्ट्रीयांकडे आले. आणि *ते* खाली आले, आणि देवाने एक *इथून* आणि एक *तिथून* असे खेचले, आणि *इथून* व *तिथून,* आणि त्यांना वेगळे असे दूतांखाली ठेवले; आणि *इथून* व *तिथून,* आणि *इथून* व *तिथून,* आणि त्यांना दूर असे वेगळे करून दूतांखाली ठेवले.

200 आणि त्याने पहिला दूत पाठविला, आणि त्याने संदेश प्रचार केला आणि एक तुतारी वाजली; आणि काही काळानंतर आपणाला ते समजले. आणि, त्यावेळी, ती तुतारी युद्ध जाहीर करत होती. तुतारी नेहमी युद्धाला दर्शविते. तो दूत, तो दूत पृथ्वीवर आला, त्या युगाचा दूत, लुथर सारखा, आणि दुसऱ्या कोणत्याही दूतासारखा ज्यांच्याविषयी आपण बोललो आहोत. तो काय करतो? तो येतो; आणि एक शिक्का उघडतो; प्रगट करतो; एक तुतारीचा नाद, जाहीर होतो, आणि मग ते दूर निघून जातात. आणि मग तो दूत मरण पावतो. तो ह्या समूहाला, जे आतमध्ये आहेत, त्यांना शिक्कामोर्तब करतो. आणि ज्यांनी तो नाकारला, त्यांच्यावर एक पिडा पाठवतो. पाहिले?

201 मग ते चालत राहते, मग ते समूह करितात, अजून एक समूह तयार करतात. आपण आत्ताच त्यांतून आलो आहोत. मग, इथे ते आणखी एका सामर्थ्याने बाहेर निघतात, पाहा, आणखी एक सामर्थ्य, मंडळीचे अजून एक युग, आणखी एक सेवकाई. आणि मग जेव्हा तो असे करतो, जेव्हा ख्रिस्तविरोधक त्याची सेवकाई घेऊन येतो, तेव्हा देव, तिच्याबरोबर त्याची एक सेवकाई आणतो. पाहा *विरुद्ध* हे “च्या विरोधात” असे आहे. ते बाजूबाजूला चालतात.

202 माझी इच्छा आहे की तुम्ही थोडे काहीतरी लक्षात घ्यावे. जेव्हा काईन पृथ्वीवर आला, जवळजवळ त्या वेळीच, हाबेल पृथ्वीवर आला. माझी इच्छा आहे की तुम्ही हे लक्षात घ्या, जवळजवळ त्याच वेळी, जेव्हा—जेव्हा ख्रिस्त पृथ्वीवर आला, यहुदाही आला. जेव्हा ख्रिस्त पृथ्वीवरून निघून गेला, जवळजवळ त्याच वेळी यहुदा पृथ्वीवरून निघून गेला. जेव्हा पवित्र आत्मा खाली आला, जवळजवळ त्याच वेळी ख्रिस्तविरोधकाचा आत्माही खाली आला. जेव्हा आता ह्या शेवटल्या दिवसांत, पवित्र आत्मा स्वतःला प्रगट करत आहे, जवळजवळ त्याच वेळी, ख्रिस्तविरोधकाचा आत्मा राजकारण आणि सर्वकाही आणून, स्वतःचे रंग दाखवीत आहे. आणि अगदी त्याच वेळेत जेव्हा ख्रिस्तविरोधक पूर्णपणे हालचलीमध्ये येत आहे; देव, ते सर्वकाही सोडविण्यासाठी स्वतःला पूर्णपणे हालचालीत आणीत आहे. पाहा, अगदी, एकत्र चालत आहेत. आणि, ते दोघे बाजूबाजूला आहेत. काईन आणि हाबेल! [भाऊ ब्रॅन्हम त्यांच्या हाताने एकदा टाळी वाजवितात—सम्पा.]

त्या तारवावरील, तो कावळा आणि ते कबुतर! यहुदा आणि येशू! आणि असे पुढे चालत आहे, तुम्ही पाहा. फक्त...

203 इथे मवाब आणि इस्राएल होते; ते दोघेही. मवाब हे काही अधर्मी राष्ट्र नव्हते, नाही महाशय. ते सुद्धा तेच अर्पण अर्पित होते, जे इस्राएल अर्पित होते. ते त्याच देवाकडे प्रार्थना करीत होते. अगदी बरोबर. मवाब हे...ते होते, जे लोटाच्या मुलींतील एक जी तिच्या पित्याबरोबर निजली, आणि तिला मूल झाले. आणि त्या मुलाला मवाब म्हटले. आणि त्याच्यांतून, मवाब वंश अस्तित्वात आला, मवाबी राष्ट्र.

आणि जेव्हा त्यांनी इस्राएल, म्हणजे त्यांचा सोडविलेला भाऊ, याला येताना पाहिले.

204 ते मूलभूत पाया घालणारे होते. ते एक मोठा संप्रदाय होते. इस्राएल मध्ये संप्रदाय नव्हता; ती जिथे कुठे जाई तिथे तंबूमध्ये राहत असे. परंतु मवाबाकडे मान्यवर, राजे आणि वगैरे सर्व होते. आणि त्यांच्याकडे तिथे वर बलाम होता; एक—एक खोटा संदेष्टा. आणि त्यांच्याकडे हे सर्वकाही होते. मग ते तिथे खाली, त्यांच्या छोट्या भावाला शाप देण्यासाठी आले, जो आपल्याला दिलेल्या वचनाकडे, वचनदत्त देशाकडे जाण्याच्या मार्गावर होता.

205 आणि तो त्यांच्याकडे गेला आणि त्यांना विचारले, "मी तुमच्या देशातून पार जाऊ शकतो का? जर माझ्या गाईंनी पाणी पिले, मी त्याची किंमत देईन. जर त्यांनी गवत खाल्ले, आम्ही त्याची किंमत देऊ."

206 त्याने म्हटले, "नाही. तुमच्याकडे इथे तसे संजीवन नाहीये. हे बरोबर आहे. तुमच्याकडे इथे तसे संजीवन नाहीये."

207 आणि मग पाहा त्याने काय केले. तो परत इजबेलीच्या रूपामध्ये आला, आणि त्या खोट्या संदेष्ट्याकरवी खाली आला, आणि देवाच्या मुलांना, चूक करण्यास लावले. आणि मवाबी स्त्रियांचे इस्राएलांशी लग्न करून—करून दिले आणि व्यभिचार करविला.

208 आणि त्याने तीच गोष्ट केली, त्याच युगामध्ये ज्यामध्ये आपण आहोत, वचनदत्त देशाकडील प्रवासात असताना. त्याने काय केले? खोटे संदेष्टे इथेही आले, आणि लग्न केले, आणि प्रोटेस्टंट मंडळीला मध्ये बोलाविले, आणि संप्रदाय स्थापन केला, अगदी तसेच जे त्यांनी अगोदर, तिथे केले होते. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर चार वेळा ठोकतात—सम्पा.]

209 पण जुने छोटे इस्राएल त्यावर पुढे चालत गेली. ती अरण्यामध्ये जास्त वेळ चालत राहिली, आणि त्या सर्व जुन्या सैनिकांना मरावे लागले, परंतु ती वचनदत्त देशात गेली. होय. होय. त्या सर्वांना, यार्देन पार करायच्या अगदी अगोदर, एकत्र सज्ज असे पाहा. हा–हा! मला ते आवडते. आता आपण, खाली त्या युगाकडे जात आहोत, अगदी आता, आता इथे. लक्ष द्या.

210 आता, आपल्याला दिसते की, तो समय, दानिएलाच्या सत्तर सप्तकांतील, शेवटले (जसे मी म्हणालो) साडे–तीन वर्षे.

211 आता, मला ते थोडे जवळून स्पष्ट करू द्या, कारण मी इथे कोणालातरी पाहिले जो नेहमी ते पाहत आहे, आणि मला—मला प्रयत्न करायचा आहे कि मी हे स्पष्टपणे सांगेन; एक शिक्षक म्हणून.

212 लक्षात घ्या जेव्हा सत्तरावे सप्तक येते. जेव्हा दानिएलाने, यहूद्यांच्या समाप्तीच्या वेळेचा दृष्टांत पाहिला, पण त्याने म्हटले, सत्तर सप्तके ठरविली आहेत. ती सात वर्षे

आहेत; त्याच्या मधोमध, मसिहा इथे असेल, किंवा, तो अर्पणासाठी छेदला जाईल. आता, अगदी तेच घडले.

213 मग, देवाने परराष्ट्रीयांशी व्यवहार केला जेव्हा त्यांनी त्याच्या नावासाठी बाहेर काढले. जशी, परराष्ट्रीय मंडळी बाहेर काढली, त्याने त्याची मंडळी वर घेतली.

214 आणि जेव्हा त्याने घेतली, ती मूर्ख कुमारी, जी मंडळीतील होती…वधू वर गेली. आणि मंडळीच, "बाहेरील अंधाऱ्या कोठडीत टाकण्यात आली, जिथे रडणे, आणि दात खाणे आहे." त्याच वेळी त्या लोकांवर महासंकट येते.

215 आणि जसे महासंकट येते, तिथे प्रकटीकरण 11 मधील, दोन संदेष्टे, त्यांना सुवार्ता प्रचार करण्यासाठी, आत येतात. आणि ते, एक हजार, एकशे…आणि साठ दिवस प्रचार करतात. पाहिले? बरे, एका महिन्याच्या तीस दिवसांप्रमाणे, जसे खऱ्या दिनदर्शिकेमध्ये असते, ते अगदी बरोबर साडे–तीन वर्षे आहेत. तो दानिएलाचा सत्तरावा भाग आहे, सत्तराव्या सप्तकाचा शेवटला भाग. पाहिले?

इथे देवाने इस्राएलाशी व्यवहार केला नाही. नाही महाशय.

216 जास्त वेळ झाला नसेल जेव्हा मला एका भावाने विचारले, तो म्हणाला, "मी जाऊ का…" एक—एक भाऊ ह्या मंडळीमधला, एक मौल्यवान, प्रिय भाऊ, म्हणाला, "मला—मला इस्राएलात जायचे आहे. मला वाटते की तिथे जागृती आहे."

217 कोणीतरी मला म्हटले, "भाऊ ब्रॅन्हम तुम्ही आताच इस्राएलात जायला हवे. त्यांना हे समजेल." पाहा, तुम्ही ते करू शकत नाही.

मी अगदी तिथे उभा राहिलो, आणि मी विचार केला.

218 त्या यहुदी लोकांनी म्हटले, "जर मी…बरे, जर हा, येशू तो मसिहा असेल," म्हटले, "त्याला एका संदेष्ट्याचे चिन्ह करताना मला पाहू दे. आम्ही आमच्या संदेष्ट्यांवर विश्वास करतो, कारण ते—ते तसेच असायला हवे."

219 "काय व्यवस्था आहे," मला वाटले. "आता मी जातो!" जेव्हा मी अगदी तिथेच, अगदी त्याच्या जवळ, अगदी…बरे, मी कैरो येथे होतो. आणि माझ्या हातात इस्राएलचे तिकीट होते. आणि मी म्हटले, "मी, मी जातो, बघतो की ते त्याविषयी विचारतात का, जर त्यांना एका संदेष्ट्याचे चिन्ह दिसते काय. पाहूया कि ते ख्रिस्ताला स्वीकारतात का."

220 स्टॉकहोल्म चर्चच्या, लेवी पेथरुस ह्याने, त्यांना दहा लाख बायबल पाठविली.

221 आणि ते यहुदी तिथे आले! तुम्ही छायाचित्र पाहिले आहे. माझ्याकडे ते इथे रिळीवर आहे, *मध्यरात्रीला तीन मिनिटे अवकाश.* आणि त्या यहुद्यांनी, संपूर्ण जगांतून आत येऊन तिथे जमण्यास सुरुवात केली.

222 जनरल ॲलनबाय ह्यांच्या वेळेला, इंग्लंडने तिथे गेल्यानंतर. मला वाटते हे, *महायुद्धांची उतरती कळा,* ह्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात आहे. आणि त्यांनी समर्पण केले, तुर्की लोकांनी समर्पण केले. मग त्याने ते इस्राएलला परत दिले. आणि तेव्हापासून ती एक राष्ट्र म्हणून वाढत आहे, आणि आता ती एक परिपूर्ण राष्ट्र आहे, जिचे स्वतःचे पैसे, चलन, झेंडा, सैन्य, आणि दुसरे सर्वकाही आहे. पाहिले?

223 आणि हे यहुदी, जेव्हा त्यांच्या घरी परत आले, तेव्हा…पहिली गोष्ट म्हणजे ते खाली इराणमध्ये गेले, ते घेण्यासाठी, त्यांनी विचारले…त्यांनी म्हटले…त्यांना ते परत इस्राएलाकडे, त्यांना त्यांचा देश परत द्यावा; त्यांचा देश पेलेस्टाईन त्यांना परत हवा, जिथे त्यांनी असायला हवे.

224 आणि, लक्षात घ्या, जोपर्यंत इस्त्राएल त्या प्रदेशातून बाहेर आहे, तोपर्यंत ती देवाच्या इच्छेबाहेर आहे; जसे अब्राहामाच्या बाबतीत होते, ज्याला तो देश दिला होता. आणि जेव्हा...

225 ते त्या विमानात चढणार नाहीत. त्यांनी तसे काही अगोदर कधीच पाहिले नाही. तिथे एक म्हातारा रब्बी खाली उतरून म्हणाला, "आमच्या संदेष्ट्याने आम्हाला सांगितले आहे, कि, जेव्हा इस्त्राएल घरी जातील, तेव्हा, ते एका 'गरुडाच्या पंखावर' बसून जातील" त्या विमानामध्ये, घरच्या मार्गावर.

226 ती, आता तिथे आहे, बांधीत आहे. ते अंजिराचे झाड पुनर्संचयित होत आहे! आमेन! तो दाविदाचा जुना सहा टोकांचा तारा फडकत आहे!

227 "परराष्ट्रीयांचे दिवस क्रमांकित होऊन, करवती खाली येत आहेत!" महासंकटाचा काळ अगदी हातावर आहे!

228 आणि अगदी इथेच उभी राहून, आणि शिक्के उघडले जात असताना, मंडळी तिचे उड्डाण हवेमध्ये घेण्यास तयार आहे!

229 आणि जसा महासंकटाचा काळ चालू होतो, देव खाली येऊन त्या एकशे चव्वेचाळीस हजारांना तेथून बाहेर काढील. आमेन! तिथे, ओह, हे परिपूर्ण आहे! तुम्ही बघता शिक्के ह्याला कुठे आणत आहेत, पाहा, कसे बाहेर आणत आहेत? आता, जर तुमच्या लक्षात आले असेल, हि तीच वेळ आहे जेव्हा देव, शेवटच्या साडेतीन वर्षांत, त्या एक लाख चव्वेचाळीस हजार यहूद्यांना, बोलावत आहे.

230 पाहा, त्याने त्यांच्याशी व्यवहार काहीच केला नाही. त्यांच्याकडे संदेष्टा आलेला नाही. ते संदेष्ट्याशिवाय काहीच ऐकणार नाहीत. तुम्ही त्यांना फसवत नाही आहात. म्हणजे, ते संदेष्ट्याकडून ऐकणार आहेत, होय महाशय, बस्स. देवाने त्यांना असे सुरुवातीलाच सांगितले आहे, आणि ते अगदी त्यावर टिकून आहेत.

231 त्याने म्हटले, "तुमचा प्रभू आणि देव, तुमच्यामध्ये, माझ्यासारखा एक संदेष्टा उभा करील." मोशेने ते सांगितले. आणि म्हटले, "तुम्ही त्याचे ऐका. आणि जो कोणी त्या संदेष्ट्याचे ऐकणार नाही, त्याचा आपल्या लोकांमधून उच्छेद केला जाईल." ते बरोबर आहे.

232 आणि, तुम्ही पाहा, त्यांचे डोळे आंधळे केले गेले नाहीतर त्यांनी त्याला ओळखले असते. आंधळे केले जाण्याव्यतिरिक्त, त्यांनी सैतानाला त्यांच्यावर येण्यास परवानगी दिली आणि ते म्हणाले, "तो एक ज्योतिषी, बालजबुब आहे. त्याचे रक्त आमच्यावर येऊ दे. आम्हाला माहित आहे त्याच्यात काही नाहीये." पाहिले?

233 आणि ते बिचारे लोक आंधळे केले गेले. हेच कारण आहे की, तो आइशमन समूह आणि दुसरे समूह हे तिथे मारले गेले. त्यांना मध्ये येण्याचा अधिकार होता; त्यांच्या स्वतःच्या पित्याला, त्यांना आंधळे करावे लागले, जेणेकरून त्याला आपल्याला घेता यावे.

234 वचनामधील, हि जवळजवळ, सर्वात करुणास्पद बाब आहे. ह्याचा केवळ विचार करा, ते यहुदी, त्यांच्या स्वतःच्या पित्याचे रक्त स्वतःवर घेऊन, त्यांचा स्वतःचा देव तिथे रक्तबंबाळ असा टांगलेला होता. पाहा, "तिथे त्यांनी त्याला खिळले," बायबलमध्ये सांगितले आहे. ते चार, महान शब्दांपैकी एक आहेत. "तिथे", यरुशलेम, जगांतील सर्वात पवित्र शहर. "त्यांनी", जगांतील सर्वात पवित्र लोक. "खिळले", जगांतील सर्वात क्रूर मरण. "त्याला," जगांतील सर्वात महत्वाची व्यक्ती. पाहिले? काय? धार्मिक लोक,

जगांतील सर्वात महान धर्म, जगांतील एकच खरा धर्म, असे ते लोक तिथे उभे राहून, त्याच देवाला खिळत होते, जो येईल असे त्यांच्या बायबलमध्ये सांगितले होते.

235 त्यांनी ते का पाहिले नाही? बायबल आपल्याला सांगते की देवाने त्यांना आंधळे केले अशासाठी कि त्यांनी पाहू नये. त्यांनी...तो म्हणाला, "तुमच्यांतील कोणीएक मला पापासाठी दोष लावू शकेल?" दुसऱ्या शब्दांत, "जे मी करावे, ह्याविषयी भाकीत करण्यात आले होते, अगदी बरोबर तेच मी केले नसेल, तर मला सांगा." "अविश्वास" हे *पाप* आहे. त्याने अगदी बरोबर तेच केले जे देवाने त्याला सांगितले पण, त्यांना ते पाहता आले नाही.

236 आता जेव्हा तुम्ही लोकांबरोबर बोलता, ते एखाद्या बदकाच्या पाठीवर पाणी टाकण्यासारखे आहे. मला काय म्हणायचे आहे हे तुम्हाला कळते काय? हे खूप दयनीय आहे, जेव्हा तुम्ही हि राष्ट्रे आणि लोकांना, ते जे काही करतात, ते पाहता, इतके ताठ आणि धार्मिक! पण काय पवित्र आत्मा आपल्याला ते सांगत नाही काय? "ते हूड, गर्वाने फुगलेली, देवावर प्रेम करण्याऐवजी सुखविलासाची आवड धरणारे, शांतताद्वेषी, चहाडखोर, व्यभिचारी, आणि चांगल्याबद्दल प्रेम न करणारी. सुभक्तीचे केवळ बाह्य स्वरूप दाखवून देवाचे सामर्थ्य नाकारणारी अशी ती असतील." म्हटले, "अशांपासून दूर राहा."

237 इथे आपण आहोत, ह्या संप्रदायांनी. ते पूर्णपणे गुंडाळले आहे. ते सर्व सामर्थ्य आणि महिमा घेतात, आणि त्याला प्रेषितांबरोबर जोडतात, आणि राहिलेले हजार वर्षाच्या काळासाठी ठेवतात. हे अगदी त्या मनुष्यासारखे आहे, जसे मी अगोदर म्हटले; एक मनुष्य जो नेहमी, त्याने जे केले त्याबद्दल, देवाला धन्यवाद देतो, तो काय करणार आहे त्याकडे पाहतो, आणि तो आता काय करत आहे त्यावर दुर्लक्ष करतो. तेच आहे. मनुष्य अजूनही तसाच आहे.

238 तिथे ते यहुदी होते जे तिथे उभे राहून म्हणत होते, "देवाचा महिमा होवो! का," संत योहानाच्या 6व्या अध्यायात, म्हणाले, "आमच्या वडिलांनी रानामध्ये मान्ना खाल्ला!"

आणि येशूने म्हटले, "त्यांतील प्रत्येकजण मेला आहे."

239 "त्यांनी रानामध्ये खडकांतून पाणी पिले आणि सर्वकाही."

240 त्याने म्हटले, "मीच तो खडक आहे." ते बरोबर आहे. आमेन. त्याने म्हटले, "परंतु मीच जीवनाची भाकर आहे जी देवाकडून स्वर्गांतून खाली आली आहे, त्या एदेनेतील जीवनाच्या झाडांतून. जर कोणी मनुष्य ही भाकर खाईल, तर तो मरणार नाही; मी त्याला शेवटल्या दिवसांत पुन्हा उठवेन." आणि तरीही ते हे बघू शकले नाहीत! ते बरोबर आहे.

241 तोच मसीहा तिथे उभा होता, त्यांच्या हृदयांतील प्रत्येक शब्द बोलत होता, आणि अशा सर्व गोष्टी, दाखवत होता की तो मसिहा आहे, अगदी तेच करत होता जे मसीहाने करायला हवे!

242 आणि ते तिथे उभे राहून, त्यांचे हात मागे बांधून म्हणत होते, "हू! हे असू शकत नाही. नाही, नाही. तो—तो—तो योग्य पद्धतीने आलेला नाही. पाहा, तो बेथलेमातून बाहेर आला आहे. आणि तो—तो काही नसून एक अनौरस मुलगा आहे. आणि तो सैतान आहे जो त्याच्यावर कार्य करीत आहे. आपल्याला—आपल्याला ठाऊक आहे तो वेडा आहे. तो मंद आहे. त्याला भूत लागले आहे." पाहिले? आता, त्याचे डोळे खरोखर आंधळे केले होते.

243 पण ते त्यांच्या संदेष्ट्याची वाट पाहत आहेत. आणि त्यांना ते मिळणार आहेत, त्यांना दोन मिळणार आहेत. हे बरोबर आहे.

244 आता लक्ष द्या, पुन्हा, आता सुद्धा जेव्हा हे यहुदी...मी तुम्हाला अजून एक चिन्ह देतो म्हणजे तुम्हाला समजेल कि ते यहुदी आहेत, जे ह्या इथे रॅपचरच्या दुसऱ्या बाजूला आहेत. पाहा काय घडत आहे. ते सुद्धा चिन्हांकित केलेले आहे...आपण ते पाहण्यासाठी जास्त वेळ घेणार नाही, कारण आपल्याला इथे जलद—जलद जाणे आहे. हे सुद्धा चिन्हांकित केले आहे..."याकोबाचे दुःख." असे जे म्हटले आहे त्यामध्ये. आता पाहा. ह्या यहूद्यांना इथे...लक्ष द्या. ओह, हे एक...

245 मी—मी—मी इथे थोडासा जास्त वेळ घेणार आहे, पाहा. जेव्हा मी असे काही गाळायला सुरुवात करतो तेव्हा त्यामुळे मी चिंताग्रस्त होतो. आणि...पाहिले? लक्ष द्या. माझी इच्छा आहे की तुम्ही हे पाहावे. आणि मी—मी—मी केवळ...बरे, मला खात्री आहे, देव तुम्हाला ते दाखवील. बघा.

246 याकोबाकडे जन्मसिद्ध अधिकार होता. काय हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] पण तो नक्कीच त्याबद्दल थोडा राजकारणी होता. पाहिले? तो खाली गेला आणि त्याने त्याच्या वडिलांना फसविले. त्याने त्याच्या भावाला फसविले. त्याने सर्वकाही केले. पण, तरीही, त्याला तो मिळाला, कारण एसावने तो विकला होता. पण मग जेव्हा तो, त्याच्या सासऱ्यासाठी काम करण्यासाठी, खाली गेला, तिथे त्याने, ती गुरे भरदार करण्यासाठी, त्या नामांकित काठ्या पाण्यामध्ये टाकल्या, आणि त्यांनी ठिबकेदार वासरे जन्माला घातली. आणि, ओह, तुम्हाला सर्वकाही माहित आहे, जे असे कायकाय केले, केवळ पैसे मिळविण्यासाठी. आता, लक्ष द्या, आता. त्याला त्याच्या लोकांमधून घालवून लावले होते.

247 आता, हे एका यहूद्याची प्रतिछाया आहे. तो एक पैसे–हिसकावणारा आहे. तो ते कसे मिळवितो ह्याची मी पर्वा करीत नाही, तो ते मिळविणार. ते मिळविण्यासाठी तो तुमची जिवंत असताना खाल काढील. आता, तुम्हाला हे माहित आहे. तो थोडासा राजकारणी आहे, बस्स. मुला, त्याच्या नादी लागू नको तो—तो तुला गुंडाळील, मुला. होय, महाशय. का? तो तसाच असायला हवा. तो एक अशा प्रकारचा आत्मा आहे जो प्रभूत्व करतो.

248 अगदी बरोबर त्या सुधारकांसारखे, ज्यांना हे वचन कळले नाही, कारण तो त्या मनुष्याचा आत्मा होता जो त्यांच्याकडे पाठविला होता.

249 ते गरुडाचे वय आहे ज्यांना ते वचन आणि त्याचे प्रकटीकरण मिळते. ज्यांना हे कळते त्यांनी आपले हात वर करा म्हणजे मी...हे चांगले आहे. ठीक आहे. पाहिले? हे चांगले आहे. आता, पाहा, जर तुम्ही ह्या शिक्क्यामध्ये पाहू शकला...जेव्हा ते उघडले जातील, तर तुम्ही अगदी बरोबर पाहू शकाल कि देव काय करत आहे, त्याने काय केले आहे, तो काय करणार आहे. इथे ते आहे, बरोबर.

250 आणि हेच कारण आहे की लोक तसे वागले, कारण तोच आत्मा आहे जो त्या युगासाठी त्यांच्यावर असेल असे भाकीत केले गेले होते. ते दुसरं काहीच करू शकले नाही.

251 मी योहान, पौल आणि त्यांचा विचार करतो, तो सिंहाचा आत्मा, तो एल–आय–ओ–एन, स्वत: वचन, तिथे उभा असलेला.

252 पौल अगदी त्या वचनावर उभा राहिला, आणि म्हणाला, "मला हे माहीत आहे, की तुमच्यांमध्ये खोटे भाऊ उठतील. आणि ते काय करतील, तुमच्यांमध्ये संप्रदाय आणि सर्वकाही, आणि ते काय करतील. आणि असे शेवटल्या दिवसांपर्यंत चालेल, आणि तो भयानक समय आहे." का? तो एक संदेष्टा होता. ते वचन तिथे त्याच्यामध्ये उभे

होते. कशाप्रकारे तिथे ह्याचा नाश होईल, म्हटले, “तुमच्यामध्ये खोटे मनुष्य उठतील, आणि अनेक गोष्टी बोलून, जे शिष्य आहेत अशा भावांना बहकवतील.” तो अगदी बरोबर ख्रिस्तविरोधक आहे. त्याने अगदी बरोबर तेच केले.

253 लक्षात घ्या ते महासंकटाच्या काळोख्या युगात गेल्यानंतर. ते काय होते? ते त्याविषयी काहीच करू शकत नव्हते. रोमकडे...त्याच्याकडे धार्मिक सत्ता होती, आणि त्याच्याकडे राजकारणाची सत्ता होती. ते काहीच करू शकत नव्हते, पण केवळ जिवंत राहण्यासाठी मजुरी करीत आणि स्वतःला अर्पण करण्यासाठी देत. तो बैल होता. तेच ते करू शकत होते. त्या प्रकारचा तो आत्मा त्यांच्यावर होता, देवाचा आत्मा, तो बैल.

254 मग, तिथे ते सुधारक आले, एका मनुष्याचे डोके, चतुर, ज्ञानी; मार्टिन लुथर, जॉन वेस्ली, आणि ते सर्व, केलविन, फिनी, नॉक्स, आणि ते दुसरे उरलेले सर्व. इथे ते पुढे आले, आणि जेव्हा ते आले, ते सुधारक होते. ते सुधारणा करत, लोकांना बाहेर काढण्यासाठी पुढे आले.

255 आणि पुन्हा तसेच मागे फिरले, अगदी त्याचप्रमाणे जसे त्यांनी अगोदर केले होते, आणि परत तिच्याशी विवाह केला, त्यांच्या सांप्रदायिक व्यवस्थेमध्ये, अगदी बरोबर. बायबलने तसे म्हटले. ती एक “वेश्या” होती आणि मग तिला “वेश्या,” झाल्या, तिच्या मुली, अगदी बरोबर.

256 आणि देवाने म्हटले, “मी—मी तिला पश्चातापासाठी संधी दिली, आणि तिने तो केला नाही. म्हणून मी तिला आणि तिच्या संततीला घेऊन, ते जिथून आले तिथे टाकीन.” ते अगदी बरोबर आहे. आता, हे, देवाने ते ह्याखाली म्हटले, पाहा, ह्या शिक्क्याखाली. आता, तिथे ती होती. आपल्याला दिसते की तो ते करतो, आणि तो ते करील. आणि ते, प्रत्येकजण तिथेच जात आहे.

257 परंतु, ज्यांची नावे जीवनी पुस्तकात लिहिली आहेत, त्यांना देव बोलाविल. ते तो आवाज ऐकतील. “माझी मेंढरे माझी वाणी ओळखतात,” येशूने म्हटले. एकच गोष्ट आपल्याला करायची आहे ती म्हणजे, मेंढराना बोलावणे आहे. बकऱ्यांना ते माहीत नाही. लक्षात घ्या. पण, तुम्ही पाहा, मेंढरांना–बोलावणे, “माझी मेंढरे माझी वाणी ओळखतात.” का? ती वाणी काय आहे? मला तुम्हाला सांगायचे आहे, एक वाणी म्हणजे काय आहे. एक वाणी ही एक—ही एक आत्मिक चिन्ह आहे.

258 त्याने मोशेला सांगितले, “जर त्यांनी पहिल्या चिन्हाची वाणी ऐकली नाही, तर ते दुसऱ्या चिन्हाची वाणी ऐकतील.”

259 “माझी मेंढरे माझी वाणी ओळखतात.” जेव्हा ह्या गोष्टी शेवटल्या दिवसांत घडतील, तेव्हा देवाची मेंढरे ते ओळखतील. होय महाशय. पाहिले? ते—ते ती ओळखतात. “माझी मेंढरे मला ओळखतात.” पाहिले? “ते परक्यांच्या मागे जाणार नाहीत.” त्या परक्यांच्या मागे जात नाहीत. ते त्या दिवसांतील प्रगट झालेले चिन्ह असायला हवे, आणि त्यांना ते दिसते. आता, आता लक्ष द्या.

260 आता, याकोब, जसा तो वर येतो, पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे का, त्याच्यामध्ये (कुठे) जाण्याची उत्कट इच्छा होती? परत मायदेशी.

261 ओह, अगदी तेच इस्राएलाने केले आहे! ते—ते...ते इस्राएल आहे. याकोब इस्राएल आहे. त्याचे नाव बदलण्यात आले, तुम्हाला माहित आहे. पाहिले? आणि तो...

262 तो तिथे गेला, आणि त्याच्याकडे असलेला सर्व पैसा आणला, आणि शक्य तितका, आणि जमेल त्या मार्गाने, त्याच्या जवळच्या नातेवाईकांकडून किंवा दुसऱ्या

कोणाकडून. फसवून, चोरून, खोटे बोलून, शक्य त्या मार्गाने त्याने तो आणला. पाहिले? त्याने आणला.

263 आणि मग जेव्हा तो परत घराच्या मार्गाला लागला, त्याला त्याच्या हृदयात घराची ओढ लागायला हवी. पण जसा त्याने आपला प्रवास चालू केला, तेव्हा त्याला आपल्या परतीच्या मार्गावर देव भेटला, आणि त्याचे नाव बदलण्यात आले. पाहिले? परंतु, ह्या वेळेत तो कष्टी होता, कारण त्याला भीती होती की एसाव त्याच्या मागे येत आहे. पाहिले.

264 आणि—आणि पाहा, पैसा पाहा, त्या पैशाचा प्रस्ताव. अगदी त्याचप्रमाणे, यहुदी रोमसोबत—सोबत त्यांचा करार करण्याचा प्रयत्न करील, पाहिले, त्यांच्या पैशाच्या प्रस्तावाने. हे लक्षात घ्या. कि एसावाला त्याच्या पैशाची गरज नव्हती; आणि तशीच रोमलासुद्धा नाही. संपूर्ण जगाची संपती, तिच्या हातांमध्ये आहे. पाहिले? पण ते साध्य झाले नाही.

265 पण आपल्याला आता दिसते की इस्राएल, त्या संकटाच्या वेळी, जेव्हा तो याकोब होता, त्याने त्या...काहीतरी वास्तविक होते त्याच्याशी संघर्ष केला. तिथे एक मनुष्य खाली आला. याकोबाने त्याच्याभोवती आपले हात बांधिले, आणि तो तिथे राहिला. आणि तो—तो मनुष्य म्हणाला, "मला आता जायला हवे, उजेड होत आहे." ओह, तो उजाडणारा दिवस! पाहिले? दिवस उजाडत होता.

266 पण याकोब म्हणाला, "मी—मी तुला सोडणार नाही. तू, तू जाऊ शकत नाही. मी तुझ्याबरोबरच राहणार." पाहिले? "मला इथे गोष्टी बदलून हव्या आहेत."

267 हेच ते एक लाख चव्वेचाळीस हजार आहेत, तो पैशाची योजना करणारा समूह, आणि अशा प्रकारच्या गोष्टी, जेव्हा त्यांना एक खरी पकडण्याजोगी गोष्ट दिसली. तिथे मोशे उभा आहे, आणि तिथे एलिया उभा आहे. आमेन! ते देवाबरोबर संघर्ष करतील, जोपर्यंत, इस्राएलाच्या वंशांतील एक लाख चव्वेचाळीस हजार तिथे बाहेर येत नाहीत तोपर्यंत.

268 ते महासंकटाच्या काळाच्या अगदी अगोदर आहे, पाहा, (ओह, किती रम्य), "याकोबाचे दु:ख."

269 हीच वेळ आहे जेव्हा ते एक लाख चव्वेचाळीस हजार बाहेर काढले गेले. ते, प्रचारक, ते दोघे संदेष्टे, ते बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाप्रमाणे प्रचार करत होते. "स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे, इस्राएला पश्चाताप कर!" कशाबद्दल पश्चाताप? "तुमच्या पापांबद्दल, अविश्वासाबद्दल, पश्चाताप करा, आणि देवाकडे परत फिरा!"

270 आता आपण इथे काहीतरी आठवू या. ह्या, निसर्गाला होणाऱ्या, महान गोष्टी, अगोदर घडल्या आहेत. इथे ह्या 12व्या वचनात, पाहा, "सूर्य, केसांच्या बनविलेल्या तरटासारखा काळा झाला." आता ह्याची तुलना करा.

271 आता, लक्षात घ्या, ते परराष्ट्रीयांच्या काळात घडत नाही. हे इस्राएलच्या वेळी आहे. मला तुम्हाला दाखवू द्या. आता, आठवा, मी म्हणालो, हे एक लाख चव्वेचाळीस हजारांना बोलावणे आहे. पाहिले? आता, हि वेळ, म्हणजे जेव्हा महासंकटाचा काळ, हा सुरु होत आहे. आणि महासंकटाच्या काळात काय घडते त्याविषयी हे सांगते.

272 आता निर्गम 10:21–23 मध्ये जाऊन पाहूया. आणि इथे पाहा जेव्हा...निर्गम हे अर्थात, जेव्हा इस्राएल बाहेर येत होती, बाहेर काढली जाणार होती, तेव्हा आहे. निर्गम, 10वा अध्याय, आणि 21वे, 23वे वचन, मी हि वचने लिहिताना इतका उत्तेजित होतो आणि ओरडतो, की कधीकधी मी ते लिहिताना गुंतागुंत करतो. ठीक आहे, निर्गम 10:21–23. ठीक आहे, आपण आता पाहूया, 21 आणि 23

*मग परमेश्वराने मोशेला सांगितले, आकाशाकडे आपला हात उगार म्हणजे मिसर देशावर अंधकार पडेल, इतका की तो हाताला लागेल.*

*तेव्हा मोशेने आपला हात आकाशाकडे उगारिला, आणि तीन दिवस सर्व देशभर निबिड अंधकार पसरला;* (पाहिले?)

*आता, तीन दिवस कोणी कोणाला दिसेना की कोणी आपले ठिकाण सोडून हालेना; पण...इस्राएल लोकांच्या सगळ्या वस्तींत उजेड होता.*

273 लक्ष द्या, अगदी त्यासारखेच, आता इथे या, "आणि सूर्य केसांच्या बनविलेल्या तरटासारखा काळा झाला." पाहा, तीच गोष्ट! ह्या निसर्गात घडणाऱ्या गोष्टी, ते काय होते? काय? जेव्हा जेव्हा निसर्गात अशा गोष्टी घडतात, त्यावेळी देव इस्राएलाला बोलावीत असतो. पाहिले? देव इस्राएलाला बाहेर बोलावतो. आता, "सूर्य, अगदी...केसाइतका काळा." आता, देव जवळजवळ इस्राएलला तेथून सोडवणारच होता, त्यांना शत्रूंच्या हातांतून बाहेर काढणार होता, त्यावेळी शत्रू इजिप्त हे शत्रू होते, ठीक आहे. आता, इथे तो त्यांना रोमी लोकांच्या हातांतून बाहेर आणीत आहे, ज्यांच्याशी त्यांनी त्यांचा करार केला होता. तीच गोष्ट होते. हा एक संसर्ग आहे, ती—ती एक वेळ आहे जेव्हा हा संसर्ग पसरेल.

274 ह्याने ह्या परराष्ट्रीयांच्या समूहाला संसर्ग लागेल. जर आपल्याकडे वेळ असती, तर मी तुम्हाला दाखविले असते की त्या परराष्ट्रीय मंडळीचे काय होईल.

275 बायबलमध्ये म्हटले आहे, कि, "तो मोठा साप, त्या स्त्रीवर (ते यहुदी, इस्राएल) संतापला (म्हणजे, रागावला), आणि त्याने आपल्या तोंडांतून जाडी आणि खूप लोकांचा जमाव, ओकून टाकीला, जे त्या स्त्रीच्या बीजांतील राहिलेल्यांशी लढाई करण्यास गेले." प्रकटीकरण 13. आता, तिथे पाहा, आपल्याकडे ते आहे. आणि हीच वेळ आहे जेव्हा इस्राएल तिला पाठविते...अर्थात, रोम, तिच्या सैनिकांना त्या स्त्रीच्या बीजांतील राहिलेल्यांच्या मागे पाठवते.

276 आता पाहा. पहिल्या वेळी, त्यांच्या शत्रूंच्या हाती, जेव्हा तो त्यांना सोडवून बाहेर काढत होता, सूर्य हा केसांच्या तरटासारखा काळा झाला. आता, हि दुसरी वेळ आहे, महासंकटाच्या काळाच्या शेवटी.

277 आता, दानिएल 12 मध्ये, जर आपल्याकडे वेळ असती तर आपण ते वाचू शकलो असतो. दानिएलच्या 12व्या—12व्या...वचनात, नाही 12व्या अध्यायामध्ये. दानिएल म्हणाला, "ज्या कोणाची नावे पुस्तकात लिहिलेली सापडली, ते सोडविले जातील." आता, लक्षात घ्या, दानिएल आता ह्या काळाविषयी बोलत आहे जेव्हा ह्या...हि गोष्ट घडणार आहे, जेव्हा इस्राएलाची सुटका होणार आहे, त्यांच्या सत्तराव्या सप्तकाच्या शेवटी. आणि तीच वेळ आहे जेव्हा त्यांची सुटका केली जाणार आहे. आता, पाहा, आपण जरा एका मिनिटासाठी दानिएल 12 मध्ये जाऊया.

*आणि त्या समयी तुझ्या लोकांचा* (पाहा, हे यहुदी आहेत) *कैवार घेणारा मोठा अधिपती जो मिखाएल तो उठेल; आणि कोणतेही राष्ट्र निर्माण झाल्यापासून कधीही आले नाही...असे संकट त्या समयी येईल...*

278 आता त्याची तुलना करा, मत्तय 24 शी, अगदी तेच येशूने म्हटले, "जगाच्या प्रारंभापासून आतापर्यंत कधी आले नाही असे मोठे संकट त्या काळी येईल." सहाव्या शिक्क्याकडे पाहा, पाहा, तीच गोष्ट, संकटाचा समय. लक्षात घ्या.

*...कोणतेही राष्ट्र निर्माण झाले त्या समयापासून: आणि त्या वेळी तुझे लोकं...* (आता, ह्या सत्तराव्या, सातव्या वर्षाच्या शेवटल्या भागात.) ...

*तुझ्या लोकांपैकी ज्यांची नावे वहीत लिहिलेली आढळतील ते सर्व त्या वेळी मुक्त होतील.*

279 ते पूर्वनियोजित केलेले, तुम्ही पाहा, ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात लिहिलेली होती, ते त्या वेळी मुक्त होतील.

*आणि भूमींतील मातीत निजलेल्यांचा मोठा समुदाय उठेल; कित्येक सर्वकाळचे जीवन मिळविण्यास आणि कित्येक अप्रतिष्ठा व सर्वकाळचा धिक्कार मिळविण्यास उठतील.*

*आता, आणि मग जे सुज्ञ असतील ते अंतराळीच्या प्रकाशासारखे झळकतील; आणि—आणि पुष्कळ लोकांस धार्मिकतेकडे वळविणारे लोकं युगानुयुग ताऱ्यांप्रमाणे चमकतील.*

280 तो, मग पुढे गेला, आणि दानिएलाला "ते पुस्तक बंद करण्यास" सांगितले कारण तो त्या समयापर्यंत त्याच्या कळपात विसावा घेईल.

281 आता, पाहा, तुम्ही जिवंत असा किंवा मरा, त्याने काहीही फरक पडत नाही. कसेही, तुम्ही वर येता. पाहिले? एका ख्रिस्ती व्यक्तीसाठी मरण हे काहीच नाही. तो तसाही मरत नाही. पाहिले?

282 आता, दानिएल 12, मध्ये म्हटले आहे कि, ज्यांची नावे त्या पुस्तकात लिहिलेली आढळली, तो प्रत्येकजण मुक्त होईल.

283 इथे, महासंकटानंतर, देव त्याच्या दुसऱ्या पुत्राला, सोडवण्याच्या बेतात आहे. पाहा, दुसऱ्या वेळी, इस्राएल, त्याचा...इस्राएल हा त्याचा पुत्र आहे. तुम्हाला ते माहित आहे. इस्राएल हा देवाचा पुत्र आहे, म्हणून तो त्याला महासंकाटाच्या काळामध्ये मुक्त करणार आहे, त्याचप्रकारे जसे त्याने तिथे इजिप्तमध्ये केले.

284 आता इथे पुन्हा, आपण थांबूया, आणि—आणि काहीतरी दुसरे आणुया, म्हणजे आपण ते घरात आणण्याअगोदर. आता इथे पाहा. हे दोन संदेष्टे, आता ते काय करणार आहेत ते पाहा, अगदी त्याचप्रकारे जसे मोशे आणि त्यांनी तिथे खाली केले होते. "आणि तिथे मला एक बोरू देण्यात आला..." आणि 11व्या अध्यायांतील 3रे वचन.

*आणि माझे दोन साक्षी ह्यांस मी अधिकार देईन आणि ते तरट पांघरून एक हजार दोनशे साठ दिवस संदेश सांगतील.*

*हि ती दोन जैतुनाची झाडे आहेत...*

285 तुम्हाला ते आठवते, आणि जेरुबाबेल, आणि ते सर्व, मंदिर पुन्हा उभारणार होते.

*...आणि पृथ्वीच्या प्रभूसमोर उभ्या असलेल्या त्या दोन समया.*

*...जर त्यांस कोणी मनुष्य...उपद्रव करू पाहिल, तर त्यांच्या मुखांतून अग्नी निघून,...*

286 लक्षात घ्या, ख्रिस्ताच्या मुखांतून वचनरूपी तरवार बाहेर येते.

*...त्यांच्या वैऱ्यांस खाऊन टाकतो; कोणी त्यांस उपद्रव करण्याची इच्छा धरल्यास त्याला ह्याचप्रकारे जीवे मारण्यात यावे.*

287 आता, आपल्याला माहित आहे, कि तो "अग्नी." 19व्या अध्यायात, जे ख्रिस्ताच्या येण्यासाबंधी आहे, त्यामध्ये "त्याच्या मुखांतून त्याची तरवार निघते," जी त्याचे वचन आहे. काय हे बरोबर आहे? ते वचन! ओह, जर तुम्हाला, उद्याच्या त्या शिक्क्यासाठी,

आता हे साहित्य समजले तर! पाहा, वचन अशी गोष्ट आहे कि ज्याने देव त्याच्या शत्रूला कापतो. पाहिले?

288 आता इथे पाहा. जेव्हा हे संदेष्टे, तिथे भविष्यवाणी करीत आहेत, ते…जर कोणी मनुष्याने त्यांचा दुरुपयोग केला, त्यांना उपद्रव केला: “त्यांच्या मुखांतून अग्नी बाहेर येतो,” पवित्र आत्म्याचा अग्नी, वचन. ते वचन म्हणजे देव आहे. वचन हे अग्नी आहे. वचन हे आत्मा आहे. पाहिले? “त्यांच्या मुखांतून बाहेर पडते.”

289 मोशेकडे पाहा. आपण पाहूया त्यांच्या मुखांतून काय बाहेर पडते. ते, इस्राएल, ते ज्या पद्धतीने तिथे वागत होते, ते—ते…मला म्हणायचे होते, इजिप्त, ते यहुदी लोकांचा दुरुपयोग करीत होते. मोशे…बरे, ते त्याना जाऊ देत नव्हते. फारोने जाऊ दिले नाही. देवाने मोशेच्या मुखामध्ये शब्द घातले. पाहा, ते देवाचे विचार होते जे मोशेच्या हृदयामध्ये जात होते; मग तो तिथे, ते व्यक्त करण्यास जातो, मग ते वचन बनते.त्याचे हात पुढे पसरले, आणि म्हणाला, “इथे माशा असो,” आणि तिथे माशा आल्या. इथे पाहा.

> *आणि जर कोणी मनुष्य त्यांस उपद्रव करील, त्यांच्या तोडांतून अग्नि निधून त्यांच्या वैऱ्यांस खाऊन टाकतो…*

290 पाहिले? तिथे ते आहे. त्यांना जे बोलायचे आहे ते, ते बोलू शकत होते आणि तसेच घडून येईल. आमेन!

> *…आणि जर कोणी मनुष्याने…त्यांना उपद्रव करण्याची इच्छा धरल्यास त्याला ह्याचप्रमाणे जीवे मारण्यात येईल.*

291 भावा, देव आता, प्रवेश करत आहे!

> *त्यांच्या संदेश सांगण्याच्या दिवसांत, पाउस पडू नये म्हणून आकाश बंद करावयाचा त्यांस अधिकार दिलेला आहे…*

292 एलिया, त्याला ते कसे करावे हे माहित आहे, त्याने तसे अगोदर केले आहे. आमेन! मोशेला माहित आहे ते कसे करावे, त्याने ते अगोदर केले आहे. हेच कारण आहे कि ते मागे ठेवण्यात आले होते. आता…आमेन!

293 मी आता एक खूप महत्वाचे सांगू शकलो असतो, पण मी उद्या रात्रीसाठी राखून ठेवणे अधिक चांगले—चांगले होईल. पाहिले? ठीक आहे.

> *…आणि पाण्याचे रक्त करण्याचा अधिकार त्यांस पाण्यावर आहे, आणि वाटेल तेव्हा पृथ्वीला सर्व पिडांनी…पीडित करण्याचा त्यांस अधिकार आहे.*

294 हे काय आहे? वचनाशिवाय काय ह्या गोष्टी आणू शकते? ते निसर्गाला त्याना वाटेल तसे करू शकतात. इथे ते आहे. तेच आहेत जे सहावा शिक्का आणतात. ते त्यावरील आच्छादन काढतात आणि तो उघडतात. निसर्गाला आड येणे, हे केवळ देवाच्या सामर्थ्यामध्ये आहे. पाहा, सहावा शिक्का हा पूर्णपणे निसर्गाला आड येण्यासाबंधी आहे. तुम्हाला ते आता समजत आहे काय? [मंडळी म्हणते, “आमेन,”—सम्पा.] तिथे तुमचा शिक्का आहे. ते कोण करते? ते संदेष्टे आहेत, रॅपचर, दुसऱ्या बाजूला. देवाच्या सामर्थ्याने, देवाच्या वचनाने, ते निसर्गाला दोष देतात. ते, त्यांच्या आज्ञेद्वारे, भूमिकंप आणू शकतात, चंद्राला रक्तमय करू शकतात, सूर्याला खाली पाठवू शकतात. आमेन!

295 तिथे तुम्ही आहा. तिथे तुम्ही आहा. पाहिले? पाहा कसे तिथे खाली मंडळ्यांच्या, युगामध्ये, शिक्के उघडले, कसे त्यांनी हुतात्मे दाखविले?

296 आणि आता, इथे हे दोन संदेष्टे आहेत जे देवाच्या वचनाबरोबर उभे राहून निसर्गाला त्यांना वाटेल ते करण्यासाठी उभे आहेत. आणि खरोखर कोण ते करत आहे ते ते दाखवितात. ते मोशे आणि एलिया आहेत, कारण तिथे त्यांच्या सेवकाईची पुन्हा नक्कल होत आहे, हे ते दोघे पुरुष आहेत. अरे बापरे! तुम्हाला हे आता समजत आहे काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] पाहा सहावा शिक्का काय आहे ते? हा ते दोन संदेष्टे आहेत. आता लक्ष दया. ह्याने तुमचा गळा दाटून येऊ देऊ नका. पण पहा, त्या शिक्क्याने काय उघडले, संदेष्टे! पाहिले? व्हिऊ! आमेन! तिथे तुम्ही आहा.

297 ओह, भावा, आपण गरुडाच्या दिवसात राहत आहोत, डोके ढगांमध्ये, वर करून!

298 त्यांनी सहावा शिक्का उघडला. त्यांच्याकडे ते करण्यासाठी सामर्थ आहे. आमेन! तिथे तुमचा सहावा शिक्का उघडत आहे. पाहिले?

299 आता, आपण लगेच इथे मागे पाहतो, आणि येशूने म्हटले कि असे घडेल. अगदी मागे पलीकडे जुन्या करारामध्ये, मागे यहज्केल मध्ये, मागे जुन्या संदेष्ट्यांमध्ये, त्यांनी असे घडेल ह्याविषयी बोलले.

300 आणि इथे तो सहावा शिक्का उघडला, आणि ते म्हणाले, "बरे, हि एक रहस्यमय गोष्ट आहे. हे कुणी केले?"

301 येथे तर त्याचे रहस्य आहे, दोन संदेष्टे, कारण बायबल येथे याविषयी असेच सांगते. तेच ते उघडू शकतील, आणि कोणत्याही वेळी ते...जे त्यांना वाटेल ते निसर्गात करु शकतील. आणि ते अगदी तेच कार्य करतील जे त्यांनी केली होती. कारण त्यांना माहीत आहे की त्याला कसे केले पाहीजे. आमेन! गौरव होवो!

302 जेव्हा मी ते पाहीले, मी माझ्या खुर्चीतून उठलो आणि चालू लागलो. खाली-वर असे त्या जमिनीवर मी विचार केला, "प्रभू, स्वर्गीय पित्या, मी तुझे किती आभार मानावे!"

303 हा सहावा शिक्का आहे, तेच ते आहे. तेच तो सहावा शिक्का उघडतात. आमेन! त्यांना पाहा, "जर कोणी मनुष्य त्यांना उपद्रव देईल, तर अग्नी त्यांच्या तोंडातून निघतो," वचन. त्याच्या मुखांतून निघते. पवित्र आत्मा प्रेषितांवर आला, तुम्ही पाहा. "त्यांच्या तोंडातून अग्नी निघतो."

304 आता लक्ष द्या. प्रकटीकरण 19 मध्ये पाहा. येथे आम्ही तिच गोष्ट पाहतो, "आणि एक मोठी तलवार त्यांच्या मुखांतून निघते." "तो शब्द आहे." समजले? ख्रिस्ताचे येणे "आणि त्याने त्याद्वारे त्याच्या शत्रुंना मारावे," म्हणून हे खरे आहे ना? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आता, तो आपल्या मार्गावर आहे. त्याला पाहा आता. ठिक आहे.

> *त्यांच्या संदेश सांगण्याच्या दिवसात पाऊस पडू नये म्हणून आकाश बंद करावयाचा त्यांस अधिकार दिलेला आहे...*

305 मुला, हे निसर्गात विघ्न आणणे होय! आता, पाहा, या व्यक्तीने एलियाने किती काळ आकाश बंद केले होते? [मंडळी म्हणते, "साडे तीन वर्ष"—सम्पा.] तसेच, अगदी बरोबर आहे. दानिएलचा सत्तरावा सप्तकाचा अंतिम भाग, सत्तरावा अजून किती आहे? ["साडे तीन वर्ष."] हे अगदी बरोबर आहे.

306 मोशेने काय केले होते? त्याने—त्याने——त्याने पाण्याचे रक्त केले होते. त्याने अशाप्रकारचे चमत्कार केले होते; हे अगदी तंतोतंत जसे भाकित केले होते येथे सहाव्या शिक्क्याखाली. आणि येथे ते आहेत प्रकटीकरण 11वा अध्याय, त्याच गोष्टी ते करतात. आमेन!

307 शास्त्रवचनात तीन वेगवेगळ्या ठिकाणी अशीच गोष्ट आढळते आणि ते एकमेकांत एकदम पूर्णत: जुळतात. हेच सहाव्या शिक्क्याचे उघडणे आहे. अगदी बरोबर तसेच आहे. आमेन! गौरव असो! आता लक्ष द्या

> *त्यांच्या संदेश* सांगण्याच्या दिवसांत पाऊस पडू नये. म्हणून आकाश बंद *करावयाचा त्यांस अधिकार दिलेला आहे...पाण्याचे रक्त करण्याचा... अधिकार त्यांस पाण्यावर आहे, आणि वाटेल तेव्हा पृथ्वीला सर्व...पीडांनी पीडित करण्यासहीत त्यांस अधिकार आहे.*

308 बापरे! असेच होणार. आता येऊया आम्ही येथे जेथे *पी*डा आहेत, पाहा. संर्पूण निसर्ग हा सापडतो या सहाव्या *पी*डेमध्ये...किंवा सहावा शिक्का उघडडतो तेव्हा हे अगदी बरोबर आहे जे घडणार आहे. आता पाहा...

309 येथे देव आपला पुत्र इस्त्राएलला मुक्त करण्यासाठी आहे, जेव्हा तो खाली तेथे ह्या प्रकारे संकटात होता. त्यान तेथे मोशेला पाठविले आणि इस्त्राएलला तारले. काय हे बरोबर हे ना? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आणि त्याने त्याच गोष्टी केल्या. त्याने एलियाला अहाबाकडे पाठविले, आणि सात हजार बाहेर आले. हे खरे आहे ना? ["आमेन."] तो त्यांना पुन्हा संकटाच्या काळात तेथे पाठवितो आणि एक लाख चव्वेचाळीस हजारांना बोलावितो.

310 आता पाहा, तुम्ही. लक्ष द्या, 6व्या अध्यायाच्यामध्ये, किंवा 6वी पीडा...शिक्का. क्षमा असावी, सहावा शिक्का आणि सातवा शिक्का. प्रकटीकरणाचा 7वा अध्याय अंक गणिताच्या पध्दतीने एकमद सुव्यवस्थित आहे.

311 ज्याप्रमाणे अमेरिकेचा नंबर तेरा आहे, तेरा राज्यांनी त्याची सुरुवात झाली, तेरा तारे झेंड्यावर, तेरा पट्टया, तेरा वसाहती. सर्व काही तेरा, तेरा. आणि प्रकटीकरणाच्या 13व्या अध्यायात ती दिसते. हे खरे आहे. ती तेरा आहे आणि ती एक स्त्री आहे.

312 आता, जेव्हा तो आपल्या एकुलत्या पुत्राला सोडविण्यासाठी होता, जो त्याचा एकुलता एक पुत्र होता. याकोब तर त्याचा पुत्र होता, परंतु हा तर त्याचा एकुलता पुत्र आहे, मत्तय 27, पाहूया त्याने तेच काय केले होते. मत्तय 27वा अध्याय. आता, लक्षात ठेवा, की त्याच्या पुत्राला मारहाण करण्यात आली, आणि त्याला सतावले गेले, आणि त्यांनी त्याची थट्टा केली, शुभ शुक्रवारच्या दुपारी. जेव्हा त्याला क्रुसावर लटकवणार होते! मला वाटते, मत्तय 27वा अध्याय, आणि 45वे वचन,

> *मग दुपारी सहाव्या तासापासून नवव्या तासापर्यंत देशभर अंधार पडला.*

313 आता लक्ष द्या की येथे त्याने मागिल समयात असेच सांगितले होते.

> *त्याने सहावा शिक्का फोडला...ते मी पाहिले, तेव्हा मोठा भूमिकंप झाला; सूर्य केसांच्या बनविलेल्या तरटासारखा काळा झाला व सगळा चंद्र—चंद्र रक्तासारखा झाला.*

314 अंधकार, अंधार! मिसरात; अंधकार, अंधार!

315 त्या अगोदर की परमेश्वर येशूला मरणातून जिवंत करावे, देव येशूला क्रुसावर मुक्त करीत होता. प्रथम अंधार झाला, सूर्य भर दिवसा खाली निघून गेला, आणि तारे चमकलेही नाहीत. मग दोन दिवसांनंतर, तो त्याला एक सामर्थ्यवान विजयासहीत उठविण्यात जात होता.

316 मिसर देशात सूर्य, आणि चंद्र, आणि तारे हे प्रकाशहीन झाल्यानंतर, त्याने इस्त्राएलला अभिवचनाच्या भूमीसाठी सोडविले.

317 आणि येथेही अशाच संकटाच्या काळात होते, आणि तेव्हा येथे तो दोन संदेष्टे उभे राहतात. त्यांना परमेश्वराच्या वचनावर नियंत्रणाचा अधिकार दिलेला आहे. ते फक्त तेच बोलू शकतात. जे देवाने वचनाने दिले आहे.

318 आता, पाहा ते देव नाहीयेत. ते...तर मरणारे आहेत. ते लहान देव आहेत, कारण येशूने हे सांगितले होते, की ते देव आहेत. त्याने सांगितले होते, "ज्यांच्याजवळ परमेश्वराचे वचन येते," परंतु पाहा, संदेष्टाच असा असतो ज्याच्याजवळ परमेश्वराचे वचन येते. आणि जेव्हा तो ते बोलतो, तेव्हा ते घडून येते. असेच होते.

319 आणि, येथे त्याला देवाकडून अधिकार मिळाला आहे, की जेव्हा जेव्हा त्याला वाटेल तेव्हा तेव्हा पृथ्वीवर तो विपत्ती आणू शकतो (बापरे!), आकाश बंद करील! आणि तो तसे करील. गोष्ट काय आहे? तो एक लाख चव्वेचाळीस हजारांना मुक्ती देण्यास जात आहे. तो त्यांना मुक्तीच्या पुस्तकांतून घेण्यास जात आहे आणि हे सहाव्या शिक्क्यात मुक्तीच्या शिक्क्याली होते. हेच आहे, माझ्या प्रिय मित्रा. हाच आहे सहावा शिक्का; जो एवढा रहस्यमय राहीला आहे.

320 या आपण आता...आमच्याकडे अजून दहा मिनीटे आहेत. या आपण अजून थोडेसे घेऊया. पाहा, माझ्याकडे दोन ते तीन पाने अजून आहेत. बरे, माझ्याकडे...तुम्ही फक्त *येथे* पाहू शकता. मला वाटते जवळजवळ आणि त्या एका विषयी, मला वाटते माझ्याकडे 15पाने अजून शिल्लक आहेत. जेथे मी जाऊ शकतो. ओह, त्याविषयी खुप काही आहे. बापरे! तुम्ही फक्त एका ठिकाणातून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकता! परंतु मला भीती आहे. की मी असे करण्याद्वारे ते पसरले जाईल. आणि तुम्हाला मी गोंधळात घालीन. आणि मला नाही...मी ते पकडून राहू शकत नाही जसे मला पकडून राहीले पाहीजे.

321 यशयामध्ये, आपण ते पाहूया. यशया संदेष्ट्याने पाहीले होते सहावा शिक्का उघडलेला, आणि तो त्याविषयी बोलला, हा शिक्का महत्त्वाचा आहे, किंवा नाही, समजले?

322 बरे, संपूर्ण गोष्टी, मुक्तीची संपूर्ण योजना, मुक्तीचे संपूर्ण पुस्तक, ह्या शिक्क्याखाली मांडलेली आहेत.

323 आता लक्षात ठेवा, आम्ही हे पाहीले की येशूने ते पाहिले होते. समजले? काय हे सत्य आहे? येशूने ते पाहिले होते. आणि आता आम्हाला आढळते की दुसऱ्यांनी ही पाहिले आहे. आम्हाला आढळते ते दर्शकामध्ये म्हणजे याकोबामध्ये. आम्हाला ते सापडते ते दर्शक स्वरुपात जेव्हा मिसरातून ते बाहेर आले. आम्ही सुध्दा दर्शकाच्या स्वरुपात वधस्तंभावर पाहतो.

324 आता आम्ही मागे यशयाकडे जाऊ या. माझ्याकडे पुष्कळ संदेष्ट्यांविषयी आहे जे मी येथे लिहीलेले आहे...मला तो यशयाचा वृत्तांत आवडतो. आम्ही यशयाकडे येथे मागे जाऊया, यशयाचा 13वा अध्याय. मला...

325 तुम्ही जाणता की यशयाचे पुस्तक हे संपूर्ण बायबल आहे. तुम्हाला हे माहित आहे काय? पाहा, यशयाने सुरुवात उत्पत्तीपासून केलेली आहे. पुस्तकाच्या मध्यात तो योहानाला आणतो, आणि एकदम शेवटी जो हजार वर्षाचा काळ घेऊन येतो. आणि बायबलमध्ये 66 पुस्तक आहेत, आणि यशयामध्ये 66 अध्याय आहेत. ती संपूर्णतः ज्ञानाचा कोश आपल्या स्वतःमध्ये आहे.

326 लक्ष द्या, आता, यशयाचा—चा 13 वा अध्याय. 6व्या वचनाने सुरुवात करुया.

*आक्रोश करा, परमेश्वराचा दिवस समीप आला आहे. सर्वसमर्थाकडून हा एक विनाशच येत आहे.*

327 आता पाहा, हा सहावा शिक्का येथे उघडतो पाहा. येथे अगोदरच्या काळात, येशूच्या येण्याच्यापूर्वी सातशे तेरा वर्षेअगोदर यशयाने हा शिक्का पाहीला. आणि येशूला येथे राहून दोन हजार वर्षे होऊन गेली आहेत, ते जवळजवळ सात होतील. जवळ जवळ सत्तावीसशे वर्षांपूर्वी यशयाने. हा शिक्का तेथे टांगताना पाहीला. ठीक आहे.

*ह्यामुळे सर्वांचे बाहू गळले आहेत, प्रत्येकाचे हृदय विरघळले आहे.*

328 येशूने काय म्हटले? “आणि म्हणून अन्याय पुष्कळ वाढेल, आणि पुष्कळांचे प्रेम थंड होईल.” “आणि मनुष्यांची हृदये भयाने घाबरी होतील, समुद्राच्या गर्जनेने.” पाहा. मनुष्यांची हृदये कमजोर होतील.

*ते अगदी घाबरले आहेत; त्यांस पेटके व वेदना घेरीत आहेत; प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे ते वेणा देत आहेत. एकमेकांकडे टकमक पाहत आहेत; त्यांची मुखे काळवंडली आहेत.*

329 आता तुम्ही ह्यावर ध्यान द्या, “त्यांची मुखे काळवंडली आहेत.” आम्ही एका मिनिटात तेथे त्याचा अभ्यास करण्यास ज्यात आहोत. पाहा. मी ते धरुन राहीन.

*पाहा, रोष व तीव्र क्रोध यांनी दु:खकर झालेला असा परमेश्वराचा दिवस येत आहे. तो देश उजाड करुन सोडील. त्यांतील पातक्यांचा संहार करील.*

330 “देश” त्या विषयीचे हे सर्व आहे; जे काही तुम्ही पाहत आहा. लक्ष द्या.

*आकाशांतील तारे व नक्षत्रे आपला प्रकाश देणार नाहीत. सूर्य उदय पावताच काळा ठिक्कर पडेल, चंद्र आपला प्रकाश देणार नाही.*

*मी जगाचे त्यांच्या दुष्टतेबद्दल व पातक्यांचे त्यांच्या अन्यायाबद्दल पारिपत्य करिन, गर्विष्ठांचा दिमाख बंद करीन, जुलम्यांचा तोरा उतरवीन.*

331 मला—मला माहीत नाही की त्याचे शब्द लेखन कसे करावे, तोरा…[मंडळी म्हणते, “तोरा”—सम्पा.] मी तो शब्द नाही सांगू शकत.

*…गर्विष्ठांचा दिमाख बंद करीन, जुलम्यांचा तोरा उतरवीन.*

332 पाहा, येथे, अगदी तसेच, यशयाने त्या गोष्टी पाहिल्या ज्याविषयी येशू बोलला. त्या सात शिक्क्याला प्रगट करतात. जेव्हा तो देशाला शुद्ध करीत आहे. संकटाच्या समयात तो संकटाचा समय आहे, तो सहावा शिक्का आहे. होय तो एक संदेष्टा आहे. आणि देवाचे वचन त्याला समजण्यात आले आहे. हे सत्ताविसशे वर्षांपूर्वी.

333 खरेच! मी ही गोष्ट सांगू इच्छितो. यशया येथे म्हणतो, “प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे ती वेणा देत आहे.” संपूर्ण सृष्टी, जग वेणा देत आहे. हे सर्व कण्हणणे आणि प्रसुती वेदना कशाविषयी आहे? जशी एक—एक—एक स्त्री आई बनणार असते, पृथ्वी स्वतः आणि निसर्ग मुक्तीसाठी कण्हत आहेत.

334 का; हे शहर घ्या, आपण आपल्या स्वतःचे शहरच घ्या, जेथे, दुसऱ्या शहरांप्रमाणे दारुचे अड्डे, आणि वेश्यालय, आणि अश्लीलता, आणि घाणही आहेत, जसे इतर कोणत्या शहरात!

335 मी का विश्वास करतो कारण हजारों वर्षांपूर्वी, जेव्हा हे जग सुंदर होते, तो त्याला तसेच पाहतो. जेव्हा ओहिओ नदी येथे खाली आली, तेव्हा त्यावेळी पाण्याचा उलटा प्रवाह आणि पूर येत नव्हते. दरीमध्ये काही पाप नव्हते. म्हशी येथे भटकत होत्या, आणि—

आणि ते पुरातन चेरोकी त्यांना चारित असत. आणि आपले जीवन सभ्यतेला धरुन असत तेथे कोणताही, त्रास नव्हता.

336 परंतु, मनुष्य आत आला, येथे तेथून पाप आत आले. जेव्हा पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यांची संख्या वाढू लागली, तेव्हा पाप आणि हिंसाचार ही वाढला. हे खरे आहे की मनुष्यच कायम, कारणीभूत आहे. का असे, मला वाटते हा एक कलंक आहे!

337 मी एके दिवशी, माझ्या मातृभूमीत, तेथे ॲरिझोनामध्ये उभा होतो. जेव्हा मी—मी लहान मुलगा होतो, तेव्हा मी ग्रोनिमो आणि को–चॉईस, आणि त्या प्राचीन अपाचीविषयी वाचले. कारण, मी त्यांना प्रचार केला. चांगले लोक! आणि त्यांच्यातील काही चांगले लोक ज्यांना तुम्ही भेटायची इच्छा कराल, तर ते अपाची इन्डियन.

338 आणि मग त्यानंतर टोम्ब स्टोनला गेलो, तेथे त्यांनी प्राचीन काळांतील वस्तु तसेच युध्दाची शस्त्रे इत्यादी ठेवली होती. आणि मी पाहीले...तुम्हाला माहीत आहे ते नेहमी ग्रिओनिमो यांना ते विश्वास घातकी लोकांमध्ये वर्गीकरण करतात. माझ्यासाठी तर ते खरे अमेरिकेचे होते. नि:संशय! ते तर केवळ आपल्या हक्कांसाठी लढत होते, जसे कोणीही करतो. तो आपल्या देशात प्रदुषण पाहू इच्छित नव्हता. आणि पाहा काय आहे. त्याचे संतान, त्याच्या मुली वेश्या आणि दूसरे सर्व असेच बनवून टाकल्या. आणि गोरा माणूस तेथे आत आला. गोरा माणूस हरामखोर आहे.

339 रेड इंडियन हे पुरातन मतवादी होते. तो—तो जतन करणारा होता. तो बाहेर जाई आणि म्हशीची शिकार करीत आणि त्यांची सर्व जमात सर्वकाही राहीलेले ही खात असत. ते त्यांची कातडी कपडे आणि तंबूसाठी वापरत आणि अन्य सर्वांसाठी वापरत. आणि गोरा मनुष्य त्याला निशान बनवून आला, काय ही गोष्ट, काळीमा फासणारी नाहीए का!

340 मी वर्तमान पत्रात एक लेख वाचला, ज्यात, सांगितले होते की आफ्रिकेमध्ये एक जंगली शिकारीचा खेळ चालतो! त्यांना तेथे अर्थर गॉडफ्रे आणि काही व्यक्ती मिळाले, ते तेथे त्या हत्ती आणि दुसरे वनपशूंना निशाणा बनवित, आणि ते हेलीकॉप्टरद्वारे आणि त्या प्रकारच्या वाहनांद्वारे. ते हत्तींना आणि वनपशूंची शिकार करीत होते. त्या लेखात एका वयस्कर हत्तीणीचे चित्र होते त्यात ती मरण्याचा प्रयत्न करित होती आणि अश्रू वाहत होते. आणि दोन मोठे हत्ती तिला उठविण्याचा प्रयत्न करीत होते, यासाठी की ते तिला ठेऊ शकतील. का...ते पाप आहे. हा काही खेळ नाहीए.

341 जेव्हा मी तेथे बाहेर मैदानात जेथे मी शिकार आणि अशाप्रकारे करित उभा होतो, आणि पाहिले की कुठून ते गोरे शिकारी बाहेर निघून आले होते, आणि ते हरिणीला गोळ्यांनी मारतात आणि त्यांचा मागचा भाग कापून टाकतात. आणि कधीकधी ते आठ ते दहा हरिणी ठार मारत, व तेथेच पडलेले सोडून जात. आणि हरिणीचे पिल्ले इकडे–तिकडे धावत फिरत, आणि आपल्या आईला शोधण्याचा प्रयत्न करीत. आणि तुमचे म्हणणे काय हा खेळ आहे? हा तर खून आहे, माझ्या मते.

342 मला आशा आहे, की जितपर्यंत मी जिवंत राहीन, कॅनडाला त्या विश्वासघातकी अमेरिकींना बाहेर काढण्यासाठी कधीच काही मार्ग मिळणार नाही. हे सत्य आहे. ते सर्वाधिक नीच प्रकारचे खेळणारे आहेत जे मी जीवनात कधी असे पाहिले.

343 आता, सर्वच असे नाहीत, तेथे काही सभ्य, खरे पुरुषही आहेत, परंतु ते ही असे सापडतात जे हजारात जणू कोणी एक असावा.

344 जे काही ते पाहतात त्यावर ते गोळी चालवितात, ते जेथे वाटते तेथे गोळी चालवितात. हे खरे आहे. तो खून करणारा आहे. हे खरे आहे. तो दयारहीत आहे. आणि हंगाम नसतानाही, पशुंवर गोळी चालवितो.

345 मी तेथे वरती अलास्कामध्ये, त्या गाईडांमधील एका गाईड बरोबर होतो. त्याने सांगितले, "मी उचलले...मी आता तेथे वर जाईन. आणि आम्ही त्या मोठ्या...मोठ्या सांबाराचा कळप पाहू ते, सांबार नाहीए. परंतु तेथे हरणी पडली होती, जिच्या शिंगामध्ये 50 नंबरच्या मशीन गनच्या गोळ्या झाडल्या होत्या, जेथे अमेरिकी यान चालकांनी अलास्कामध्ये, त्या हरणीच्या कळपावर मशिनगन मधून गोळ्या झाडल्या होत्या." हा तर शुध्द खुन आहे.

346 त्यांना माहीत होते की जेव्हा ते म्हैशीला मारत, ते त्या रेड इंडियन लोकांना पकडू शकत होते. ते तर भुकेने मेले असते. ह्याच कारणामुळे चोचाईस जमातीला, त्याच्या सर्व राजकुमारांना, त्याच्या मुलांना, त्याच्या लोकांना आणि सर्वांना आत्मसमर्पण करावे लागत असे, कारण ते भुखेने मरत होते. बफेलो बिल आणि सपाट मैदानातील रहिवाशी, आधुनिक शस्त्रासह तेथे गेले. आणि त्यांनी दुपारी त्यांच्या सर्व म्हैशी, चाळीस–पन्नास म्हैशी मारुन टाकल्या. ते जाणतात की, जेव्हा जेव्हा ते कंटाळले, ते रेड इंडियनपासून मुक्त होत होते. ओह, बापरे! एक कलंक त्या झेंड्याला, ज्याप्रकारे ते रेड इंडियनच्या बरोबर ज्या वाईट पध्दतीने वागणूक दिली. तुम्ही त्याच स्थितीत आहात.

347 परंतु आठवण ठेवा, बायबल म्हणते, "ती वेळ आली आहे की देव त्यांचा नाश करील जे पृथ्वीची नासधूस करतात." आणि संपूर्ण जग!

348 त्या दरींकडे पाहा, एके दिवशी मी तेथे उभा होतो, फिनिक्सच्या दरीत खाली पाहत होतो. मी वरती दक्षिण पर्वतावर पोहचलो. मी आणि माझी पत्नी तेथे वरती बसलेले, आणि मी खाली फिनिक्सवर दृष्टी टाकली. आणि मी म्हटले, "काय हे भयंकर नाहीए का?"

ती म्हणाली, "काय भयंकर? तुला काय म्हणायचे आहे?"

349 मी म्हणालो, "तेथे ह्या दरीमध्ये जेथे दिड लाख, किंवा एक लाख चाळीस हजार लोक किंवा असू शकतात, किती अधिक पाप, व्यभिचार आणि—आणि मद्यपान आणि शाप देणे आणि प्रभूचे नाव व्यर्थ घेणे आहे!"

350 मी म्हणालो, "पाचशे वर्षांपूर्वी किंवा एक हजार वर्षांपूर्वी, तेथे काहीही नव्हते तर तेथे निवडुंग आणि मेसक्यूट उगवत होती आणि ते लहान चारणारे नदीच्या रेतीत खाली–वर धावत फिरत होते." आणि मी म्हणालो, "परमेश्वराने त्याला त्याचप्रमाणे बनवले होते."

351 परंतु मनुष्य आत आला. त्याने काय केले? त्याने ती भूमी घाणीने पूर्ण भिजवली. रस्ते पित्ताने भरलेले आहेत. झाकलेली गटारे...आणि नद्या घाणीने दूषित झाल्या आहेत. ते करु शकत नाही...का, तुमच्यासाठी हे उचित आहे की तुम्ही त्या पाण्यातील पाणी पिण्यासही घेऊ नका. त्या पाण्याने तुम्हाला काहीही होऊ शकते. समजले? तुम्ही त्याकडे दृष्टी लावा. केवळ येथेच नाही. परंतु, जगात सर्वकाही दुषित झाले आहे!

352 आणि जग सृष्टी, (परमेश्वर दया करो!) संपूर्ण जग...प्रसवण्याच्या पीडेत आहे, यशयाने म्हटले, जग पीडेतून जात आहे, तीला प्रसूती वेदना होती आहे. मामला काय आहे? ती...हजार वर्षांच्या काळासाठी नविन सृष्टीला जन्म देण्यासाठी पीडा सहन करीत आहे जेथे सर्व...?...एक नविन पृथ्वी जन्म देण्यासाठी पीडा सहन करीत आहे, नविन लोकांसाठी जे पाप करणार नाही आणि तिला दुषित करणार नाही. हे खरे आहे ती प्रसुतीवेदनेत आहे. हेच कारण आहे...की आपण ही ख्रिस्तातून वधू उत्पन्न करण्यासाठी

प्रसूतीवेदनेत कण्हत आहोत. सर्व सृष्टी प्रसूतिवेदना सहन करीत आहे आणि कण्हत आहे. पाहा, तेथे काहीतरी घडणार आहे.

353 आणि ह्या सहाव्या पीडेपासून तिची सुटका होते. भावांनो, भूकंप, स्फोट करतील, आणि तारे हादरतील आणि ज्वालामुखी होतील. आणि पृथ्वी स्वतःला नविन करील. पृथ्वीच्या मध्यभागातून नविन लाव्हारस फुटून बाहेर येईल. आणि तिचा चारही बाजूंनी चुरा होईल, जेव्हा ती पलिकडे स्वतःभोवती फिरेल.

354 आणि मी तुम्हाला सांगतो, एके सकाळी जेव्हा येशू आणि त्याची वधू परत पृथ्वीवर येतात, तेथे परमेश्वराचा स्वर्ग असेल. ओह, माझ्या प्रभू, युध्दाचे प्राचीन योध्दे आपले मित्र आणि प्रियजनांसह. तेथून खाली जातील. आणि स्वर्गदूतांच्या सेनेच्या गीतांनी हवा भरुन जाईल. "ओह माझ्या भल्या आणि विश्वासू दासा, तू हे खूप चांगले केले. तू आपल्या धन्याचा आनंदात सहभागी हो. जो तुझ्यासाठी तयार करण्यात आला आहे, जसा तुला तो पूर्वकाळी मिळायला हवा होता. जेव्हा हव्वेने पापात चेंडू फिरविण्यास सुरुवात केली." आमेन! होय.

355 सहावा शिक्का काही गोष्ट करणार आहे. होय, महाशय; खरेच, संपूर्ण सृष्टी हजार वर्षांच्या काळासाठी, कण्हत आहे आणि वेदना भोगीत आहे!

356 आता, जो ह्या समयी घाणीने पूर्णपणे भरला आहे! मला वाटते, की फार समय झाला नाही, जेव्हा मी येथे प्रचार केला, ह्या आराधनालयात. *हे जग घसरत आहे.* हा संदेश प्रचार केला होता. ते अगदी बरोबर आहे. पाहा जगात काय घसरत आहे. पाहा, प्रत्येक गोष्ट ही घसरत आहे. निश्चितच, तसेच आहे. तिला—तिला घसरण आहेच. होय, महाशय.

357 तिच्या रचनेकडे, पाहा! मला तुम्हाला ह्याचे कारण दाखवू द्या की पृथ्वीला असे करणे आहे. पृथ्वीच्या रचनेतून लोखंड, आणि पितळ, आणि पृथ्वीचे अन्य धातू, तिच्यांतून युध्द, आणि उद्ययोगांसाठी काढून घेतले गेले आहेत, की तीचा ऱ्हास होत आहे...बरे पाहा ह्या दुसऱ्या दिवसांपर्यंत येथे देशातील ह्या भागात आपल्याकडे कधीच भूकंप झाला नाही. परंतु सेंट लूईस तसेच दुसऱ्या क्षेत्रात पृथ्वी अतिशय नाजूक होत चालली आहे. त्यांनी तिच्यांतून सर्वगोष्टी काढून घेतल्या आहेत. समजले?

358 येथील राजकारण, तिची प्रणाली इतकी भ्रष्ट झाली आहे, की तेथे त्यांच्यात क्वचितच कोणी प्रामाणिक आढळेल, त्यांची नैतिकता इतकी खालावली आहे, त्यांच्यात ती मुळीच राहीली नाही. हेच सर्व आहे. समजले? निश्चितच. त्यांचा धर्म भ्रष्ट आहे. होय, महाशय.

359 हा सहाव्या शिक्क्याचा समय आहे, की फार लवकरच, उघडला जाईल. आणि जेव्हा तो उघडतो, तेव्हा हे समाप्त होते ओह, माझ्या प्रभू! वधू गेलेली असते, ती गेलेली असते...राणी तिचे स्थान घेण्यासाठी गेलेली आहे, जेव्हा हे घडत आहे, तिचा राजाशी विवाह झालेला आहे, आणि इस्त्राएलातील जे शेष त्यांच्यावर शिक्का मारला जातो आणि ते जाण्यासाठी तयार होतात, आणि तेव्हा सृष्टीचा विनाश होतो. ओह, काय समय आहे!

360 जेव्हा सहावा शिक्का उघडला आहे, त्याच्या शेवटच्या वचनाकडे लक्ष द्या. जे वचनाच्या प्रचारांवर हसले होते, जीवंत देवाच्या सिध्द झालेल्या वचनावर, जेव्हा ते संदेष्टे तेथे उभे होते आणि चमत्कार करीत होते, सुर्याला थांबवित होते, आणि इतर सर्व गोष्टी त्या काळात करीत होते. पाहा, "ते खडकांना आणि पर्वतांना ओरडून सांगू लागले की आम्हाला लपवा," की त्यांनी त्यांना त्या वचनाने लपवावे ज्यावर ते हसले होते, कारण ते त्याला येताना पाहात होते. "आम्हास कोकऱ्याच्या क्रोधापासून लपव." तो वचन आहे. समजले? ते वचनावर हसले होते. आणि येथे वचन देहधारी झाले होते.

आणि त्यांनी त्याची थट्टा केली होती, त्याच्यावर हसले होते, त्याची मजा केली होती. देहधारी वचन आले होते.

361 त्यांनी पश्चाताप का केला नाही? ते करु शकले नाहीत. तेव्हापर्यंत फार उशीर झाला होता. म्हणून त्यांना शिक्षा माहीत होती. त्यांनी ते ऐकले. ते अशा सभेमध्ये बसले होते आणि त्याविषयी जाणले होते. आणि त्यांना त्या संदेष्ट्यांच्या कार्याविषयी माहीत होते, ज्याविषयी भविष्यवाणी केली होती. आणि ते त्या कार्यांना त्यांच्यापुढे होताना पाहत होते. ज्या गोष्टी त्यांनी नाकारल्या होत्या. त्यांनी अंतिम समयाच्या दयेला झिडकारले होते.

362 आणि जेव्हा तुम्ही दयेचा अव्हेर करता, तेव्हा तुमच्यासाठी काहीच नाही, परंतु फक्त न्याय बाकी उरतो. जेव्हा तुम्ही दयेला लाथाडता; जरा त्याविषयी विचार करा.

363 आणि तेथे ते होते, त्यांच्यासाठी परत जाण्यासाठी कोणतेच स्थान नव्हते. आणि येथे बायबल सांगते, "आणि ते…डोंगरांस व खडकांस म्हणाले, 'आम्हांवर पडून राजासनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हास लपवा.'" त्यांनी पश्चाताप करण्याचा प्रयत्न केला, परंतु पाहा कोकरा त्याच्या लोकांचा दावा करण्यासाठी आला होता. आणि त्यांनी खडकांकडे आणि डोंगरांकडे प्रार्थना केली, परंतु त्यांच्या प्रार्थनांना खूप उशीर झाला होता.

364 माझ्या भावा, बहिणींनो, परमेश्वराचे चांगुलपण आणि दया, लोकांसाठी वाढली आहे. जेव्हा इस्त्राएलला जवळजवळ दोन हजार वर्षे आंधळे करण्यात आले होते, ह्यासाठी, आपल्याला पश्चाताप करण्याची संधी मिळावी. काय तुम्ही त्या दयेचा अव्हेर केला आहे? काय तुम्ही केला आहे? काय तुम्ही तिला नाकारले आहे?

365 काहीही असो, तुम्ही कोण आहात? तुम्ही कोठून आला? तुम्ही कोठे जाणार आहात? तुम्ही हे डॉक्टरला विचारु शकत नाही, तुम्ही ते जगातील कोणासही विचारु शकत नाही, आणि तेथे कोणतेही पुस्तक नाही जे तुम्ही वाचू शकता. ते तुम्हाला सांगू शकेल की तुम्ही कोण आहात, तुम्ही कोठून आला आणि तुम्ही कोठे जाणार, परंतु हे पुस्तक तुम्हाला ते सांगू शकते.

366 आता, तुम्हाला माहीत आहे, की तुमच्या स्थानावर कोकऱ्याच्या रक्ताशिवाय कार्य करणे, तुम्हाला कोठे नेत आहे. म्हणून, जर—जर परमेश्वराने तुमच्यासाठी ते केले आहे तर एक लहान गोष्ट तुम्ही करु शकता ती म्हणजे जे त्याने केले आहे त्याचा स्विकार करणे. तेच सर्व तो आम्हास करण्यास सांगत आहे.

367 आणि जर ह्या आधारावर मी आणखी पुढे जातो तर उद्या रात्रीच्या सभेत मला ठीक त्या पीडांवर यावे लागेल. आणि आता मी तसे करु शकत नाही. मी आता आणखी पुढे जाऊ शकत नाही. मी येथे खाली वधस्तंभाची खूण केली आहे. "येथे थांब," पाहा. आता मला—मला उद्यापर्यंत वाट पाहावी लागेल.

आता आपण आपली मस्तके काही क्षणांसाठी झुकवूया.

368 माझ्या बहुमुल्य मित्रा, जर तू परमेश्वराचे प्रेम ज्याविषयी मी बोलत आहे, त्याचा स्विकार केला नसेल. जर तू…ह्याकडे आता बारकाईने लक्ष दिले नसेल, जर तू त्याच्या प्रेमाचा आणि दयेचा स्विकार केला नसेल, तर तुला त्या न्याय आणि क्रोधापुढे उभे राहावे लागेल.

369 आता, आज रात्री, तुम्ही, त्याच स्थानावर उभे आहात. जेथे आदाम आणि हव्वा एदेन बागेत उभे होते. तुम्हाला अधिकार आहे. तुम्हाला स्वेच्छा आहे. तुम्ही जीवनाच्या झाडाकडे जाऊ शकता, किंवा तुम्ही न्यायाची योजना घेऊ शकता. परंतु, आज, जेव्हा

तुम्ही संवेदनशील आहात, तुमच्या योग्य मानसिक स्थितीत आणि स्विकार करु शकता, जर तुम्ही ते केले नसेल, तर तुम्ही ते का करीत नाही.

370 काय येथे असे लोक आहेत, ज्यांनी ते केले नाही? जर तसे असेल, तर तुम्ही तुमचे हात वर कराल का, म्हणा, “भाऊ ब्रॅन्हम माझ्यासाठी प्रार्थना करा. मला आता ते करायचे आहे. माझी इच्छा नाही की हे माझ्यावर यावे.” आता मित्रांनो, लक्षात ठेवा... परमेश्वर तुम्हास आशीर्वादीत करो. माझ्या...

371 ह्या माझ्या कल्पना नाहीत. मी—मी...हे ते नाही जे मी विचार करीत होतो, हे पूर्णपणे माझ्याकडून आहे. पवित्र आत्मा हे जाणतो, म्हणून माझी सहायता करा. आणि आता वाट पाहा, जर प्रभूची इच्छा असेल, तर मी उद्या रात्री, ते रहस्य तुम्हाला दाखवू इच्छितो जे सर्व समयासाठी पुढे जात आहे. मला ह्याविषयी संशय आहे की तुम्ही ते पाहीले आहे किंवा नाही, की जे—जे घडले आहे. येथे तुमच्यासमोर काही गोष्ट ठेवली आहे. आणि मी प्रत्येक रात्री ह्या गोष्टीकडे दृष्टी लावली आहे, की कोणी उठेल आणि म्हणेल, “मी हे पाहात आहे.” समजले?

372 मी तुम्हाला सांगतो की, कृपया, तुम्ही हे नाकारु नका; जर तुम्ही एक ख्रिस्ती नाही, जर तुम्ही—तुम्ही रक्ताखाली नाही, जर तुम्ही नविन जन्म पावलेले नाहीत, तर पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हा.

373 जर तुम्ही येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घेण्याद्वारे की तुम्ही त्याच्या मृत्युत गाडले जाणे आणि पुनरुत्थानाच्या साक्षीने त्याचा स्विकार झाला आहे. ह्याची जाहीररित्या कबूली दिली नसेल, तर तुमच्यासाठी पाणी तयार आहे. ते वाट पाहत आहे. येथे झगे तयार आहेत, आणि सर्वकाही तयार आहे.

374 ख्रिस्त तुम्हाला स्विकारण्यासाठी आपल्या हातांना पसरुन उभा आहे. आता पासून एका तासाच्या आत, ती दया तुमच्यासाठी वाढवली जाणार नाही. तुम्ही कदाचित ती शेवटच्या वेळी ती नाकारली असेल, ती कधीच पुन्हा तुमच्या हृदयाला स्पर्श करणार नाही. जेव्हा तुम्ही ती ग्रहण करु शकता, जेव्हा तुम्ही ती स्विकारु शकता, तर तुम्ही त्याचा स्विकार का करीत नाही? आता...

375 मी एक परंपरागत, नियमित मार्ग जाणतो, की लोकांना वेदीजवळ बोलावणे. आपण ते करतो आणि ते पूर्णतः योग्य आहे. परंतु आता ह्यासमयी वेदीच्या चारही बाजूला इतकी गर्दी आहे, की आपण हे करु शकत नाही.

376 परंतु मला हे सांगायला आवडेल, प्रेषितांच्या दिवसात ते म्हणत, “जितक्यांनी विश्वास ठेवला, त्यांनी बाप्तिस्मा घेतला.” समजले? जर तुम्ही हे करु शकता, तर खरोखरीच, तुमच्या खोल अंतःकरणात विश्वास ठेवा. येथे हेच करायचे आहे. ही—ही काही भावना नाही, तरी भावना त्याच्या सोबत असतातच. ठीक जसे मी म्हणालो, धुम्रपान करणे आणि दारु पिणे हे पाप नाही, परंतु पापाचे गुणधर्म आहेत. ते दर्शवितात तुम्ही विश्वास ठेवत नाही. समजले? परंतु जे तुम्ही तुमच्या हृदयात खरेपणाने विश्वास करता आणि तुम्ही ह्या आधारावर जाणता, की तुम्ही कोठे बसलेले आहात, तुम्ही तुमच्या संपूर्ण हृदयाने ते स्विकारता. काहीतरी तेथे घडणार आहे. ते घडणार आहे.

377 तेव्हा तुम्ही त्याच्या साक्षीच्या रुपात उभे राहू शकता की काही घडले मग पाण्याकडे चालून जा, म्हणा, “मी मंडळीला दाखवू इच्छितो, मी सिध्द करु इच्छितो, मी माझी साक्ष उभी करु इच्छितो, की मी वधूबरोबर माझे स्थान घेईन. मी आता येथे बाप्तिस्मा घेण्यासाठी उभा राहीलो.”

378 मला ठाऊक आहे, कि आजरात्री, तेथे कित्येक स्त्रीया चांगल्या स्त्रीया आहेत, परंतु मी एकीलाच बघण्यासाठी अत्यंत एकाकी आहे. त्यांच्यातील एक माझी पत्नी आहे तीच माझ्याबरोबर घरी जाते. सुरुवातीला, ती माझी पत्नी नव्हती. परंतु ती माझी पत्नी कशी झाली, माझे नाव घेण्याद्वारे ती माझी पत्नी झाली.

379 तो येत आहे. तेथे खूप स्त्रीया, मंडळ्या जगामध्ये आहेत, परंतु तो त्याच्या पत्नीसाठी येत आहे. ती त्याच्या नावाद्वारे बोलावली जाते. "जे ख्रिस्तामध्ये आहेत, त्यांना देव त्याच्याबरोबर आणील." आपण त्यामध्ये कसे येतो? "आपणा सर्वांचा एकाच आत्म्याद्वारे एक शरीरामध्ये बाप्तिस्मा झालेला आहे."

380 आता जेव्हा आम्ही प्रार्थना करतो, तुम्ही सुध्दा प्रार्थना करा. आत किंवा बाहेर, तेथे खूप लोकांचा समुह खोल्यामध्ये आहे, काही बाहेरच्या बाजूला, सभोवती बाहेर रस्त्यांवर उभे आहेत. परंतु आम्ही...तुम्हाला येथे वेदीकडे बोलवू शकत नाही. परंतु, तुम्ही तुमच्या हृदयाला वेदी करा. आणि तुमच्या अंतःकरणात म्हणा, "प्रभू येशू, मी ह्यावर विश्वास ठेवतो. मी आज रात्री येथे बाहेर ह्या रात्रीच्या हवेत उभा आहे. मी ह्या लहानशा खोलीत गुदमरलो आहे. मी येथे लोकांच्यामध्ये बसलेलो आहे. माझी—माझी—माझी—माझी—माझी इच्छा नाही...मी हे गमावू शकत नाही. मी ही जोखीम घेऊ शकत नाही."

381 जसे मी तुम्हाला काल रात्री सांगितले होते, सर्व गोष्टींनी मला खूप मदत केली आणि प्रभू जाणतो की मी सत्य सांगत आहे. जसे पौलाने म्हटले होते. "मी खोटे बोलत नाही." तो दृष्टांत किंवा जे काही तो होता, मी तेथे उभे राहिलो, ते पाहिले आणि त्या लोकांना जे गेलेले आहेत त्यांना हाताळले, अगदी इतके वास्तविक जितका मी येथे उभा आहे. माझ्या बिचाऱ्या भावा किंवा बहिणींनो ते चुकवू नका, तसे करु नका. मी जाणतो की तुम्ही प्रचार ऐकला आहे, तुम्ही *हे* ऐकले आहे. *ते* आणि गोष्टी, ते सर्व, परंतु...जरा लक्षपूर्वक ऐका. माझ्यासाठी हे...मला ठाऊक आहे, हे सत्य आहे, पाहा. पाहा, मी—मी ह्यापेक्षा हे अधिक स्पष्ट करु शकत नाही. ते चुकवू नका. ते सर्व तुमचे आहे.

आता आपण प्रार्थना करुया.

382 प्रभू येशू, येथे माझ्यासमोर रुमालांचे एक बॉक्स आहे जे आजारी लोकांना दर्शवित आहे. जसे मी त्यांच्यावर हात ठेवून प्रार्थना करतो, कारण बायबल सांगते, "त्यांनी रुमाल आणि फडकी पौलाच्या अंगावरुन. आणून रोग्यांवर घातली, दुष्ट आत्मे लोकांतून निघून गेले, आणि मोठे चमत्कार केले गेले."

383 कारण, त्यांनी पौलाला पाहीले होते, त्यांना माहीत होते की देवाचा आत्मा त्याच्यामध्ये होता. त्यांना ठाऊक होती की तो—तो एक विचित्र मनुष्य होता, की, तो ज्या गोष्टी बोलत होता, त्या वचनाविषयी होत्या. तो जाऊन यहुदी मंडळीचा प्राचीन यहुदी शब्द घेत असे आणि त्यास जीवंत बनवीत असे. आणि त्यास ख्रिस्तात बसवीत असे. त्यांना ठाऊक होते की परमेश्वर त्या मनुष्यात होता, तेव्हा त्यांनी पाहिले की परमेश्वर त्याच्याद्वारे विचित्र आणि सामर्थ्याच्या कृत्याने कार्य करीत होता, तो होणाऱ्या गोष्टी सांगत होता आणि त्या तशाच घडत होत्या, आणि त्यांना ठाऊक होते की तो परमेश्वराचा सेवक आहे.

384 प्रभू, मी प्रार्थना करितो की तू ह्या लोकांचा त्यांनी तुझ्या वचनाला दिलेल्या आदराबद्दल सन्मान करशील आणि त्यांना येशूसाठी बरे करशील. प्रभू, येथे बाहेर प्रेक्षकांमध्ये, तेथे लोक बसलेले आहेत, जसे पेंटेकॉस्टच्या दिवशी लोक प्रेषित पेत्राचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होते. तो कसे परत वचनामध्ये गेला, आणि त्याला वचन मिळाले!

आणि त्याने म्हटले, “योएल संदेष्टा म्हणाला, अंतिम दिवसात ह्या गोष्टी होतील. आणि हे तेच आहे.” आणि तीन हजार लोकांनी त्यावर विश्वास ठेवला आणि बाप्तिस्मा घेतला.

385 आणि, पित्या, आज आम्ही येथे तुझ्या कृपेने उभे आहोत. आणि हे म्हणून नव्हे की—की आम्ही कोणी विशेष प्रकारचे लोक आहोत, हे ह्यासाठी की (जसे सिंहाच्या, बैलाच्या किंवा मनुष्याच्या दिवसात होते) हा गरुडाचा समय आहे. हा ह्या समयाचा अभिषेक आहे. हा तो समय आहे, ज्यात आपण राहात आहोत. हो ह्या निश्चित समयाकरिता पवित्र आत्म्याचे कार्य आहे, हे सिध्द करण्यासाठी की येशू मेलेला नाही. ज्या गोष्टीविषयी त्याने सांगितले की तो ह्या सांज समयाच्या प्रकाशाच्यावेळी करील, आणि येथे आपण त्याला त्या गोष्टी करताना पाहात आहोत. आपण त्या महान अग्निस्तंभाला ज्याने इस्त्राएलच्या संततीला मार्गदर्शन केले होते; जो पौलाला त्या रस्त्यावर भेटला, वैज्ञानिक संशोधनाखाली येताना पाहीले आणि त्यांनी त्याचा फोटो काढला.

386 आणि आम्हाला ठाऊक आहे, हा तोच अग्नीस्तंभ आहे ज्याने रानात मोशेला मार्ग दाखवला, त्याच अग्नीस्तंभाद्वारे त्याने बायबलची कित्येक पुस्तके लिहीली, कारण त्याला वचनाने अभिषेक केला होता.

387 तो अग्नीस्तंभ, दिमीष्काच्या रस्त्यावर पौलावर उतरला आणि त्याने बायबलची कित्येक पुस्तके लिहीली, ज्यास परमेश्वराचा शब्द संबोधले गेले,

388 आणि आता, प्रभू, आम्ही त्याच अग्नीस्तंभाला, वचनाद्वारे सिध्द होताना, आणि वैज्ञानिक संशोधनाद्वारे, प्रभूचे वचन प्रकट करताना पाहात आहोत.

389 प्रभू परमेश्वरा, लोकं लवकरच भानावर येवोत, लवकर! ज्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहीलेली आहेत, जेव्हा हा प्रकाश त्यांच्या मार्गात चमकेल, तेव्हा ते त्यास पाहोत जसे ती छोटी, व बदनाम स्त्री त्या दिवशी विहीरीकडे आली, तिने पटकन ओळखले, आणि तीला ठाऊक होते की ते वचन होते.

390 आणि, आता, पित्या, मी प्रार्थना करितो की ह्या समयी, जितके लोक तुला आपल्या हृदयात स्विकारतील, त्यांच्या हृदयात ह्याच समयी ही गोष्ट कायम स्थिर करतील, की ते पापाबरोबर मेले आहेत; ते उठतील आणि जाहीर कबूलीसाठी, येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्म्यासाठी तयारी करतील, ह्यासाठी की त्याच्या पापांची क्षमा व्हावी, हे दाखवावे की ते विश्वास करतात की देवाने त्यांना क्षमा केली आहे, आणि त्यांनी येशू ख्रिस्ताचे नाव घेतले आहे.

391 मग, पित्या, पवित्र आत्म्याचे तेल त्यांच्यावर ओत, की ते प्रभू परमेश्वराच्या सेवेत रुजू व्हावे, ह्यासाठी की त्यांनी ह्या अंतिम, वाईट दिवसात परमेश्वराचे कार्यकर्ता व्हावे, कारण आपल्याला ठाऊक आहे की आपल्याकडे फार कमी समय आहे. आणि मंडळी कोणत्याही समयी निघून जाईल.

392 आणि कोकरा, कधीही, पवित्र स्थान, किंवा बलिदानाचे राजासन ते देवाचे राजासन जेथे बलिदान ठेवलेले आहे, सोडेल आणि तेव्हा ते समाप्त होईल, तेथे जगासाठी आणखी आशा राहणार नाही; ती समाप्त होईल. तेव्हा ती क्षेत्रात, भूकंपाच्या मोठ्या उद्रेकात जात आणि तीला मोठे हादरे बसतील जसे ते पुनरुत्थानाच्यावेळी झाले होते. आणि—आणि, ते—ते...

393 जसे ख्रिस्त कबरेतून उठला, ते पवित्र जन उठले होते, तीच गोष्ट घडेल. प्रभू, ते कुठल्याही मिनीटास होऊ शकेल. आम्ही तो आनंदी दिवस येण्याची वाट पाहत आहेत.

394 आता पित्या, तुझ्या लेकरांना आपल्या हाताखाली घे, तुझ्या लहान मेंढरांना तुझ्या छातीशी घे. हे प्रदान कर. आणि त्यांचे वचनाने पोषण कर, जोपर्यंत त्यांना तुझ्या सेवेसाठी सामर्थ्य प्राप्त होत नाही. प्रभू, आम्ही त्यांना आता तुझ्या हातात समर्पित करतो. प्रार्थनांचे उत्तर दे.

395 पित्या, तू मार्कच्या 11व्या अध्यायात म्हटले आहेस, "जेव्हा तुम्ही प्रार्थना करता, प्रार्थना करुन जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच हे असा विश्वास धरा, म्हणजे ते तुम्हाला मिळेल."

396 आणि माझे संपूर्ण हृदय त्याला देतो जो ह्या गोष्टी इतक्या वर्षांपासून मला प्रकट करीत आहे, आणि हे शिक्के मागील आठवड्यात प्रकट केले, प्रभू परमेश्वरा, मी तुझ्यावर विश्वास करतो, की हा तो समय आहे, जेव्हा तुझे येणे निकट आहे. आम्ही विचार करतो त्यापेक्षा अधिक निकट आहे.

397 कृपया, माझ्या प्रार्थनेचे उत्तर मिळू दे. त्या प्रत्येकाला देवाचे संतान म्हणो, जो ऐकण्याच्या अंतरावर आहे, किंवा जेथे ही टेप ऐकत आहे, ह्याच वेळी...मी त्यांचा ते प्रकट केलेले वचन जाणतात ह्या आधारावर, देवाच्या राज्यासाठी दावा करतो. पित्या, संध्याकाळचा प्रकाश त्यांच्यावर उजेडू दे. मी त्यांना येशूच्या नावात तुला समर्पित करतो. आमेन.

398 आता, सर्व जे आत किंवा बाहेर आहेत, जे विश्वास करतात, आणि त्यांनी—त्यांनी कधीच तुझा जाहीररित्या स्विकार केला नाही, की ते पापात मेले आहे; आणि त्यांना—त्यांनी देवाची दया हवी आहे. आणि तू त्यांना येशू ख्रिस्तामध्ये ग्रहण केले आहे; जलाशय...ते त्यांना यशू ख्रिस्तामध्ये ग्रहण केले आहे. जलाशय...ते त्यांना बाप्तिस्मा देण्यास तयार असतील, जे आज किंवा उद्या, किंवा आता ह्या समयी किंवा कोणत्याही वेळी बाप्तिस्मा घेऊ इच्छितात.

399 काय तुम्ही सहाव्या शिक्क्याचा आनंद अनुभवला? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आता तुम्ही पाहता की तो कुठे उघडला आहे? ["आमेन."] काय तुम्ही पाहता की तो कुठे उघडला आहे? ["आमेन."] काय तुम्ही त्यावर विश्वास केला आहे? ["आमेन."]

400 असे म्हटले आहे, "कोणी आमच्या वार्तेवर विश्वास ठेवला आहे? आणि कोणास परमेश्वराचा भूज प्रगट झाला आहे?" समजले? वार्तेवर विश्वास ठेवा, म्हणजे प्रभूचा भूज प्रगट होतो. भूज, देवाचे वचन प्रगट झाले आहे.

401 आता प्रभूची इच्छा असली, उद्या सकाळी मी त्या प्रश्नांची उत्तर देण्याचा होईल तितका प्रयत्न करीन. मी त्यावर प्रार्थना करण्यासाठी आज उरलेली रात्र किंवा त्याचा अधिक समय घालवीन. मी रात्री एक ते तीन तास जागा होतो. मी काल रात्री एक वाजेपर्यंत पलंगावर गेलो नव्हतो, आणि तीन वाजता देखील मी अभ्यास करीत होतो. पाहा? समजले?

402 मला ह्यासाठी उत्तर द्यावे लागेल. ते खरे आहे. आपण कोणत्याही गोष्टीची, कोणत्याही मूर्खतेच्या, किंवा कोणताही अनुमान किंवा अर्धवट विश्वास ह्याच्या अति जवळ आहोत. मला हे प्रथम पहावे लागेल. आणि मग जेव्हा मी ते पाहतो, ते वचनातसुध्दा असले पाहिजे. आणि आजपर्यंत, देवाच्या कृपेने ते पूर्णतः वचनाशी जुळत आहे. मी ते—ते सर्व योग्यरितीने जुळलेले आहे.

403 ते **प्रभू परमेश्वर असे म्हणत** आहे असे असले पाहिजे. कारण, ते असे नाही माझ्या ज्ञानामुळे मी म्हणतो, परंतु प्रभूचा शब्द **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** असे आहे. तेथे वचन आहे, आणि मी ते घेतो जसे त्याने मला दिले आहे, आणि ते एकत्र करतो आणि तुम्हाला दाखवतो. तर, तुम्ही स्वतःही जाणता, कि हे **प्रभू परमेश्वर म्हणत** आहे, असे वचन आहे, समजले?

404 वचन येथे, असेच सांगते. आणि तेव्हा त्याने मला जे प्रकटीकरण दिले आहे, ते आपल्यातील कोणी एकाने विचार केला होता त्याच्या अगदी विरुध्द होते. ते त्याच्या विरुध्द आहे, जो मी विचार केला होता, कारण मी वचनात ह्या प्रकारे कधीच गेलो नव्हतो. परंतु आता, आपण पाहतो, कि ते हळूहळू सरकत एकदुसऱ्याशी जुळत आहे. आणि हे काय आहे? ते **प्रभू म्हणत आहे** असे वचन आहे. समजले? ते अगदी तसेच आहे. ह्या समयात तेथे एक स्थान उघडले आहे, पकडत आहे, आणि तेव्हा प्रभू येतो आणि ते अशाप्रकारे पुढे ढकलतो. म्हणून, तुम्ही पाहता ते तसे आहे. तो—तो प्रभू आहे. ओह, मी त्याच्यावर प्रेम करतो! मी माझ्या संपूर्ण हृदयाने त्याच्यावर प्रेम करतो.

405 आता, तुम्ही लक्षात ठेवा…आपण वेदीवर जाऊ शकत नाही. खूपजणांनी आपले हात वर केले आहे. आता, पहा, ते एक तुमच्याबरोबर व्यक्तीगत प्रकरण आहे. ते असे आहे की तुम्हाला हवे ते करा. समजले?

406 तो समय इतका निकट आहे की तुम्ही तातडीचा प्रयत्न करु शकता, की ओढले जाऊ नये. पाहा, फक्त आत जाण्याचा तातडीने प्रयत्न करा, "प्रभू, मला बाहेर राहू देऊ नको. मला बाहेर सोडू नको. द्वार बंद होत आहे; जर मी आत प्रवेश करु शकेन!" समजले?

407 परमेश्वर एक दिवस द्वार बंद करील. त्याने तसे नोहाच्या दिवसात केले, आणि त्यांनी दार ठोठावले. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर खूप वेळा ठोठावतात-—सम्पा] हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते "आमेन."]

408 आता लक्षात ठेवा, बायबल म्हणते, की "सातव्या प्रहरात." ते बरोबर आहे? [मंडळी म्हणते "आमेन."-—सम्पा] काहीजण पहिल्या प्रहरी दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या, सातव्या प्रहरी झोपी गेले. परंतु, सातव्या प्रहरी, तेथे घोषणा झाली, एक हाक "वर आला आहे! त्याला सामोऱ्या चला."

409 मुर्ख कुमारिका म्हणाल्या, "मला आता त्यातील काही तेल द्या."

410 वधू म्हणते, "माझ्याकडे फक्त मला पुरेल इतकेच आहे, जर तुम्हाला पाहिजे, तर तुम्ही जाऊन त्यासाठी प्रार्थना करा."

411 काय आता तुम्ही त्या झोपी गेलेल्या कुमारींना पाहु शकता? एपिस्कोपेलियन, प्रेसबीटेरीयन, लुथरन तशा त्या सर्वांवर पाहा की ते काय करण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि त्यांच्याबरोबर समस्या ही आहे की, ते पवित्र आत्मा मिळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी अनन्य भाषा बोलण्याचा प्रयत्न करतात.

412 आणि त्यांच्यातील कित्येक जण अनन्य भाषा बोलतात, आणि मंडळीत प्रार्थनेकरिता येण्यास लाज बाळगतात; माझ्याकडून ही अपेक्षा करतात की मी त्यांच्या घरी येऊन त्यांच्यासाठी प्रार्थना करावी. काय तुम्ही ह्यालाच पवित्र आत्मा म्हणतात काय? ते अन्य भाषेत बोलणे आहे, परंतु पवित्र आत्मा नाही. समजले?

413 आता, मी विश्वास करतो की पवित्र आत्मा अनन्य भाषेत बोलतो. तुम्हाला ठाऊक आहे मी त्यावर विश्वास ठेवतो. पहा, परंतु त्याची दुसरी बाजूही आहे. होय महाशय. आत्म्याची फळे हे सिध्द करतात की ते काय आहे. समजले?

414 आता लक्ष द्या, तेव्हा, जेव्हा ती येते तो—तो अंतिम समय. आणि तेथे, जेव्हा ते आत येतात, तेव्हा ते जातात आणि म्हणतात, "मी विश्वास करतो की मला हे मिळाले आहे. होय, माझा विश्वास आहे की मला ते मिळाले आहे. आम्हाला ते मिळत आहे."

415 पाहा, हे उचित आहे की मी—मी—मी तसे सांगू नये, कारण ते कदाचित गोंधळ निर्माण करील. जेव्हा मी त्या दिवशी म्हणालो, रॅपचर, कसे होणार आहे, मी—मी... जर तुम्ही म्हणता की तुम्ही—तुम्ही त्याचा स्विकार करता. ठीक आहे. [मंडळी म्हणते "आमेन."—सम्पा] पाहा. लक्ष द्या. ठीक आहे. ते तुमच्यावर आहे.

416 पाहा, जेव्हा मुर्ख कुमारीने, विचार केला की तिने परत येण्यासाठी प्रार्थना केली आहे, वधू गेलेली असते. वधू गेली, आणि तिला ते कळले नाही, जसे एक चोर रात्री येतो. तेव्हा ते दार ठोठावण्यास सुरुवात करतात. आणि काय घडले? काय घडून गेले? ते महासंकटाच्या काळात टाकले गेले. बायबल म्हणते, "तेथे रडणे, विलाप करणे आणि दात खाणे होईल." हे सत्य आहे काय?

417 भावांनो, बहिणींनो, मला ठाऊक नाही हे कधी होणार आहे. परंतु, माझ्या—माझ्यासाठी तर हे होऊ शकते, मला...मला वाटते की हा माझा विचार आहे. समजले? माझा—माझा—माझा विश्वास आहे की हे फार जवळ आहे. मी—मी...प्रत्येक दिवशी माझी, इच्छा आहे की...मी जितके होईल तितका नम्रतेने चालण्याचा प्रयत्न करीत आहे. समजले? आणि आता जेव्हा तुम्ही जाणता...जेव्हा...

418 आज काहीतरी घडले, आणि मी काहीतरी वर येताना पाहीले. मी—मी...पाहा, मी आणखी श्वास घेऊ शकलो नाही. तेथे तो उभा होता, तो लहान प्रकाश तेथे उभा होता. आणि येथे तो होता. मला ठाऊक आहे हे सत्य आहे.

419 मी विचार केला, "ओह, परमेश्वरा, मी—मी ते सांगू शकलो नाही. मी ते सांगू शकत नाही. मी ते सांगू शकत नाही." मी खोलीच्या बाहेर निघून आलो, बाहेर गेलो, वर आणि खाली गेलो, भावा, मी विचार केला, "माझ्या देवा! मी काय करु शकतो? ओह!" समजले? आणि मला—मला मासळी पकडण्यास किंवा काहीतरी करण्यास जायचे आहे; मी...तुम्हाला...हे सांगू शकत नाही. समजले?

420 म्हणून, आपल्याकडे एक चांगला समय आहे, आपल्याकडे नाही का? प्रभूची स्तुती असो! आमेन! समजले? आपण—आपण एका अद्भूत समयात आहोत, पाहा, कारण माझे हृदय आनंदाने आणि हर्षाने भरुन वाहत आहे.

421 परंतु, जेव्हा, मी ह्या जगाचा आणि त्या हजारो लोकांचा विचार करतो की जे नाश पावले आहेत, अंधःकाराच्या छायेखाली आहेत, तेव्हा तुमचे अंतःकरण रक्तबंबाळ होते, "तुम्ही काय करु शकता? तुम्ही काय करु शकता?" तुम्ही फक्त अनुभव करिता की पवित्र आत्मा तुमच्या हृदयात रडत आहे. जसे ते आमच्या प्रभूच्यामध्ये झाले होते, जेव्हा त्याने यरुशलेमेकडे, त्याच्या स्वकीयांकडे पाहिले, म्हणाला, "यरुशलेमे, यरुशलेमे, जशी कोंबडी आपली पिले पंखाखाली एकवटते, तसे तुझ्या मुलाबाळांना एकवटायची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती." तुम्हाला असा अनुभव येतो की पवित्र आत्मा बोलत आहे. "मी तुम्हाला किती वेळा तरी एकवटावे अशी इच्छा होती, परंतु तुमची इच्छा नव्हती." समजले?

422 मित्रांनो, आपण येथे काही घटनेवर आहोत. ते काहीही असो, परमेश्वराला ठाऊक आहे. ते कधी घडणार आहे ते कोणालाही, कोणालाही ठाऊक नाही. ते एक रहस्य आहे. कोणालाही ठाऊक नाही की ते कधी घडणार आहे.

423 परंतु येशूने आपल्याला सांगितले आहे, “जेव्हा तुम्ही ह्या गोष्टी, ह्या सर्व गोष्टी.” ठीक मी ह्याची तुलना सहाव्या शिक्क्याशी केली, जे येशूने मत्तय 24मध्ये म्हटले आहे. आता समरण करा की त्याने काय सांगितले, “जेव्हा तुम्ही ह्या गोष्टी घडताना पाहाल, तेव्हा तो जवळ दाराशीच आहे असे समजा.” त्यानंतरचे वचन पाहा, 30 वे—30 वे आणि 31 वचने पुढे खाली, 32वे, 33वे वचने.

424 त्याने म्हटले, “आणि तो आपल्या दूतास आकाशाच्या चारही कोपऱ्यात, चारही वाऱ्यांना त्याच्या निवडलेल्यास जमा करण्यासाठी पाठवील.” हे बरोबर आहे?

म्हटले, “आता...”

425 आता लक्षात ठेवा, तो ठीक तेथेच थांबला. सहाव्या शिक्क्यानंतर, तो कधीच पुढे गेला नाही. त्याने सातव्या शिक्क्याबद्दल कधीच काही सांगितले नाही. त्याने पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा आणि सहावा शिक्का सांगितला परंतु तो तेथे थांबला, त्याने सातव्या शिक्क्याविषयी कधीच काही उल्लेख केला नाही.

426 आता त्याने सांगितल्या नंतरच्या गोष्टीकडे लक्ष द्या, “आता दृष्टांताकडे लक्ष लावा.” समजले? मग त्याने दृष्टांत सांगण्यास आरंभ केला. त्याने म्हटले, “ह्या गोष्टी होतील.”

427 तो त्याच्या तीन प्रश्नांना उत्तर देत होता. “ही...चिन्हे केव्हा घडतील? आणि तुझ्या येण्याचे चिन्ह काय असेल? युगाच्या समाप्तिचे चिन्ह काय असेल?”

428 आणि तेथे सहाव्या शिक्क्यात जगाचा अंत आहे. आणि सातव्या दूताचा कर्णा वाजेल...“त्याने हात स्वर्गाकडे वर केले, आणि जो युगानुयुग जीवंत आहे त्याची शपथ वाहून म्हटले, आणखी अवकाश लागणार नाही.” पृथ्वी नविन पृथ्वीला जन्म देत आहे. हे समाप्त झाले.

429 आणि येथे आपण बिलकुल दाराशी आहोत. आहे, मी भीतीने थरथरत आहे. “आणि प्रभू मी काय केले पाहिजे? मी आणखी काय—काय करु शकतो?” समजले? आणि, मग जरा ते स्थान आणि त्या बहुमुल्य लोकांना पाहण्याचा विचार करा! मी तेथे उभा राहून स्वतःकडे पाहत होतो. आणि मी विचार केला, “देवा, का ते—ते हे चुकवू शकत नाही. मला—मला—मला त्यांना ढकलले पाहीजे. मला श्रोत्यांमध्ये गेले पाहीजे आणि त्यांना ढकलले पाहिजे. तुम्ही ते करु शकत नाही.” तुम्ही...

430 “आणि माझ्या पित्याने आकर्षिल्याशिवाय कोणीही मनुष्य मजकडे येऊ शकत नाही.” परंतु आमच्याकडे येथे एक सांत्वन आहे, “ज्यांना पित्याने मला दिलेले आहे, ते सर्व माझ्याकडे येतील.”

431 परंतु त्यांच्यातील शेष, त्या संस्थासहीत ज्यावर ते अवलंबून आहेत, त्याचे असे होईल की, “तो पृथ्वीवर राहणाऱ्या त्या सर्व लोकांना फसवील, ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली नाहीत, जेव्हा कोकरा युगाच्या स्थापनेपासून वधला गेला होता.” ओह, बापरे! म्हणून, तुम्ही पाहा, ही दु:खदायक गोष्ट आहे.

432 तुम्ही फक्त एकच गोष्ट करु शकता, की तुम्ही वचनाबरोबर राहा. पाहा, जे काही तो करण्यास सांगतो. ते करा. समजले? तो जे काही करण्यास सांगतो; ते करा.

433 आणि तुम्ही तेथे हा, आणि म्हणा, “ओह, बापरे! ते हे करतात. मग...ओह!” हे फक्त...

434 तुम्हाला हे कळत नाही, की किती मानसिक तणाव असतो! आता मला हे सांगायचे आहे. मला वाटते की टेप बंद झाले आहेत. खूप लोक सांगतात. “भाऊ ब्रॅन्हम, ह्या प्रकारच्या सेवकाई बरोबर...” (मला लक्ष द्यावे लागेल, कारण लोक त्या टेप घेऊन

जातात आणि त्याचे तुकडे करण्याचा प्रयत्न करतात.) म्हणून जेव्हा ते म्हणतात, “भाऊ ब्रॅन्हम, कदाचित, आमच्याकडे सेवकाई असती तर,” तुम्हाला ठाऊक नाही की तुम्ही काय सांगत आहात. भावा–बहिणींनो, तुम्हाला, प्रामाणिकपणे तुम्हाला ठाऊक नाही की ह्याबरोबर काय काय जाते. ओह, बापरे! आणि जेव्हा लोक तुम्ही जे सांगता, त्यावर विसंबतात, ती काय जबाबदारी असते! लक्षात ठेवा, जर तुम्ही त्यांना चुकीचे सांगता, परमेश्वर त्याच्या रक्ताचा झाडा तुमच्याकडून घेईल. तेव्हा तुम्ही ह्याविषयी विचार करा. ती खूप भयंकर गोष्ट आहे.

435 म्हणून, प्रेमाने राहा, येशूला तुमच्या पूर्ण हृदयाने प्रेम करा...साधे राहा. कधीही चुकीचा अर्थ काढू नका. देवासमोर फक्त साधे राहा. कारण, जितके अधिक तुम्ही त्याचा चुकीचा अर्थ काढाल तेवढे अधिक तुम्ही देवापासून दूर व्हाल. समजले? फक्त त्याच्यावर विश्‍वास ठेवा.

म्हणा, “आता, तो कधी येईल.”

436 जर तो आज येतो, तर ठीक आहे, जर तो आता पासून वीस वर्षांनी येणार आहे, तरीही ठीक आहे. मी तसाच त्याच्यामागे जात राहीन, जसा आता मी जात आहे. “प्रभू, जर तू माझा कुठेही उपयोग करु शकतो, प्रभू मी येथे आहे.” जर आजपासून शंभर वर्षांनी येणार आहे. जर माझे पणतू–पणतू–पणतू–पणतू–पोतवंड अजूनही त्याचे येणे पाहण्यासाठी जीवंत असतील...“प्रभू, मला ठाऊक नाही की केव्हा ते होणार आहे, परंतु मला आज तुझ्याबरोबर योग्यरितीने चालू दे.” समजले? मी—मी इच्छितो...कारण, मी—मी त्या दिवशी उठेन, त्याचप्रकारे जसे मी कोठेतरी एक छोटीशी झोप घेतो.

437 तेथे त्या गौरवी स्थानात, त्या देवाच्या राज्यात तेथे येत असता, जेथे सर्व वृध्द तरुण असतील, जेथे शुभ्र वस्त्र त्यांनी अगोदरच घातलेले असतील! पुरुष आणि स्त्रीया बदलले आहेत. एका सुंदर कलाकृतीत एक—एक सुंदर पुरुष आणि एक—एक सुंदर स्त्री! तेथे त्या संपूर्ण सुंदरतेमध्ये आणि सुंदर पुरुष आणि सुंदर स्त्रीच्या प्रतिमेत उभे आहेत! आणि कधीच वृध्द होऊ शकत नाही, कधीच पापी होऊ शकत नाही, कधीच कशाचाही द्वेष, मत्सर किंवा काहीही नाही! ओह, माझ्या प्रभू!

438 मला वाटते की आता टेप बंद झाल्या आहेत. आणि माझ्या—माझ्याकडे तीन किंवा चार मिनीटे आहेत. मला तुमच्याशी बोलायचे आहे. काय असे करणे ठीक होईल? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा] आता हे फक्त व्यक्तीगत आहे, पाहा. कारण, उद्या. मी—मी...ते इतके जबरदस्त असेल! पाहा, मी विचार करतो, हेच उचित आहे की ते आता सांगू जे मी सांगणार आहे. मी...हे आता फक्त आपल्यासाठी आहे. मी...

439 तुम्हाला ठाऊक आहे, की माझी—माझी एक पत्नी आहे जिच्यावर मी प्रेम करतो आणि ती मेडा आहे. आणि माझ्या पहिल्या पत्नीच्या प्रेमामुळे मी तिच्याशी लग्न केले. आणि आता मी तिची होईल तितकी काळजी घेतो, मी—मी तिच्याबरोबर लग्न केले नसते जर तसे करण्यास मला देवाने सांगितले नसते. आणि तुम्हाला त्याची गोष्ट माहीत आहे कशी ती प्रार्थनेत गेली, आणि कशी मी केली. आणि तेव्हा त्याने मला मी काय करावे ते सांगितले, आणि “जा, तिच्याशी लग्न कर,” आणि ते करण्याची योग्य वेळ सांगितिली. ती एक प्रेमळ स्त्री आहे आणि ती आज रात्री माझ्यासाठी प्रार्थना करीत आहे. आणि आता आठ वाजले आहेत. ती कदाचित घरी आता प्रार्थना करीत असेल.

440 आता लक्ष द्या. एके दिवशी ती मला म्हणाली, ती म्हणाली, “बील,” तीने म्हटले, “मी तुला एक स्वर्गाविषयी प्रश्‍न विचारु इच्छिते.”

मी म्हणालो, “ठीक आहे, मेडा, तो काय आहे?”

ती म्हणाली, “तुला ठाऊक आहे की माझे तुझ्यावर प्रेम आहे.”

441 आणि मी म्हणालो, “होय,” येथे हे घडल्यानंतरची ही गोष्ट आहे.

ती म्हणाली, “तुला ठाऊक आहे की होपचेही तुझ्यावर प्रेम होते.”

मी म्हणालो, “होय.”

442 आणि ती म्हणाली, “आता” ती म्हणाली, “मला वाटत नाही की मी द्वेष करु.” तिने विचारले, “परंतु होप तुमची पत्नी होती.” आणि तिने म्हटले, “आता जेव्हा आपण स्वर्गात जाणार...आणि तू म्हणाला की तू तेथे तिला पाहिले.”

443 मी म्हटले, “ती तेथे होती. मी तिला पाहिले. मी तेथे तिला दोनदा पाहिले.” ती तेथे आहे. ती माझ्या येण्याची वाट पाहत आहे. तसेच...तसेच शेरॉन. मी तिला पाहिले, तसेच जसे मी तुझ्याकडे पाहात आहे. मी तिला तेथे पाहिले. आणि मी म्हणालो...

444 तीने विचारले, “ठीक आहे, आता जेव्हा आपण तेथे जाऊ, तर कोण तुझी पत्नी असेल?”

445 मी म्हणालो, “तुम्ही दोघीही. तेथे कोणीही नसणार, पाहा, तरी तुम्ही दोघेही असाल.”

तीने म्हटले, “मी ते समजू शकत नाही.”

446 मी म्हणालो, “आता, प्रिये, खाली बस, मला तुला काही समजवू दे.” मी म्हटले, “आता, मला माहीत आहे की तू माझ्यावर प्रेम करते, आणि तुला माहीत आहे मी तुझ्यावर किती प्रेम करतो आणि आदर सन्मान करतो. आता, उदाहरणार्थ, काय होईल जर मी चांगले कपडे घालून खाली शहरात गेलो आणि कोणी वेश्या, जी खरोखरी सुंदर आहे येते आणि तिचे हात माझ्या सभोवती घालते आणि म्हणते, ‘ओह, भाऊ ब्रॅन्हम, मी तुझ्यावर निश्चित प्रेम करते,’ तिचे हात माझ्या सभोवती घालण्यास आणि मला आलींगन देण्यास सुरुवात करते. तुला काय वाटेल?”

तीने म्हटले, “मला वाटत नाही की ते मला अधिक आवडेल.”

447 आणि मी म्हणालो, “मला तुला काहीतरी विचारायचे आहे...तू सर्वात अधिक कोणावर प्रेम करते, जर ही वास्तविक निर्णय घेण्याची गोष्ट आहे. माझ्यावर किंवा येशू ख्रिस्तावर?” आता, ही फक्त कौटुंबिक चर्चा आहे.

448 आणि ती म्हणाली, “प्रभू येशूवर.” म्हणाली, “होय, बील मी तुझ्यावर इतके प्रेम करते, मी त्याचा अगोदर त्याग करण्याऐवजी, मी तुझा त्याग करीन.”

449 मी म्हटले, “प्रिये मी तुझा आभारी आहे. हे तुझे बोलणे ऐकून मला आनंद झाला आहे.” मी म्हणालो, “आता, काय होईल जर तीच स्त्री येशूकडे येईल आणि तिच हात त्याच्याभोवती घालील, म्हणेल, ‘येशू मी तुझ्यावर प्रेम करते,’ तू तिच्याविषयी काय विचार करशील?”

तीने म्हटले, “मी त्यामुळे आनंदित होईन.”

450 पाहा, ते फिलिओ प्रेमातुन अगापी प्रेमात बदलले. पाहा, ते उच्च दर्जाचे प्रेम आहे. समजले? आणि तेथे पती आणि पत्नी अशी गोष्ट नाही...आणि मुलांना वाढविणे ते सर्व समाप्त होईल. नर आणि मादी लिंग समाप्त होईल. तेथे सर्व ग्रंथी...त्या एकाच प्रकारच्या असतील. समजले? तेथे लिंग ग्रंथी नसतील. समजले, तेथे त्यातली कोणतीही ग्रंथी नसेल. पाहा तेथे लिंग ग्रंथी नसणार समजले? तुम्ही फक्त...होय, महाशय तुम्ही लिंगग्रंथी शिवाय विचार करा. आम्ही पृथ्वीवर संतान उत्पन्न करावे म्हणून त्या ग्रंथी आपल्यात

घातल्या आहे, तुम्हाला समजले? परंतु, तेथे त्यातली कुठलीच नसणार. तेथे पुरुष किंवा स्त्री मधील कुठलीच ग्रंथी नसणार. नाही.

451 परंतु तेथे देवाच्या कलाकृतीची उच्चता असेल. ते अगदी बरोबर आहे. परंतु आपण खरोखर खरेपणात असू. तेथे फिलियो प्रेम बिलकुल नसेल, तेथे सर्व अगापी प्रेम असेल. समजले? म्हणून, तेथे पत्नी ह्यापेक्षा अधिक नसेल की ती तुमच्यासाठी कोणती प्रेमळ गोष्ट असेल, जी तुमची आहे, आणि ती तुम्ही एक दुसऱ्याचे आहात. तेथे असे काही नसणार... नाही, नाही, तेथे असे नसणार...पाहा, तेथे फिलिओ भाग बिलकुल नसणार. पाहा, तेथे द्वेष सारखी कुठलीही गोष्ट नसणार, कशाविषयी द्वेष नसणार, तेथे अशा प्रकारची कुठलीही गोष्ट नसणार. तुम्हाला तेथे अशी गोष्ट कधीच कळणार नाही. समजले? आणि फक्त तेथे प्रिय तरुण पुरुष आणि तरुण स्त्री राहण्यासाठी असतील.

आणि तेव्हा, नंतर, ती म्हणाली, "बिल आता ते मला समजले."

मी म्हणालो, "होय."

452 मी तुम्हाला एक लहान घडलेली गोष्ट सांगू इच्छितो, हे एक स्वप्न होते. मी झोपलेलो होतो. आणि हे मी सर्वांसमोर कधीच सांगितले नाही. मी ते काही लोकांना सांगितले आहे माझ्या माहितीसाठी परंतु ह्या मार्गावर सार्वजनिक रुपात नाही,

453 मी—मी एक दिवस त्याच्या जवळजवळ एका महिन्यांनंतर एक स्वप्न बघितले, की उभा होतो आणि तो महान समय पाहात होतो...तो न्याय नव्हता. मला वाटत नाही की मंडळी (माझा अर्थ, वधू) न्यायात जाईल परंतु, मी तेथे होतो जेव्हा मुकूट दिले जात होते. आणि *तेथे* एक मोठे—मोठे सिंहासन मांडलेले होते. आणि येशू आणि हिशोब ठेवणारा स्वर्गदूत आणि सर्व *तेथे* उभे होते. आणि हस्तीदंत सदृश्य पांढरे सिंहासनावरुन पायऱ्या खाली उतरत होत्या, आणि *ते* सर्व बाजूंनी पायऱ्या बाजूला होते, हे यासाठी की तेथे मोठा समुदाय उभा होता, ते बघु शकतील की काय घडत होते.

454 आणि मी मागे एका बाजूला उभा होतो. आणि मी तेथे उभा होतो, मला कल्पना नव्हती की मला ह्या पायऱ्यावर चालावे लागेल. मी तेथे उभा होतो...

455 तो हिशोब ठेवणारा स्वर्गदूत कोणाचे नाव पुकारत होता, आणि मला कळत होते, मी ते नाव ओळखत होतो मी पाहिले, आणि तेथे मागून एक भाऊ एका बहिणीबरोबर चालत तसाच तेथे चालत आला. हिशोब ठेवणारा स्वर्गदूत तेथे ख्रिस्ताच्या बाजूला उभा होता. (हे एक स्वप्न आहे.) मी ते पाहात होतो. आणि त्यांची नावे तेथे, जीवनाच्या पुस्तकात सापडत होता, आणि तो त्यांच्याकडे पाहत असे आणि म्हणे, "शाब्बाश माझ्या भल्या आणि विश्वासू दासा, आता आत प्रवेश कर."

456 मी मागे पाहीले, जेथे ते जात होते. तेथे एक नविन पृथ्वी आणि आनंद होता. आणि त्याने म्हटले, "प्रभूच्या आनंदात सहभागी व्हा, हे—हे तुमच्यासाठी जगाच्या स्थापनेअगोदर आहे." समजले? आणि ओह, मी विचार...केला. ते तेथून तेथे जात होते, आणि एकमेकांस भेटत होते आणि आनंद करीत होते. आणि पर्वत आणि महान मोठ्या जागेवर जात होते.

457 परंतु, मी विचार केला, "ओह, ते अद्भूत नाही का! महिमा! हालेलुयाह!" बस वर–खाली उड्या मारणे.

458 तेव्हा मी दूसरे नाव पुकारताना ऐकले. मला वाटले, "ओह, मी त्याला ओळखतो. मी त्याला ओळखतो. तेथे, तेथे तो जातो." मी त्याच्यावर अशाप्रकारे दृष्टी लावून होतो.

"प्रभूच्या आनंदात सहभागी हो, माझ्या भल्या आणि..."

"ओह," मी म्हणालो, "प्रभूची स्तूती! प्रभूची स्तूती!"

असे म्हणाला, उदाहरणार्थ, ते असे म्हणाले, "ऑर्मन नेव्हिल," पाहा.

459 आणि मग मी म्हणालो, "तो जुना भाऊ नेव्हिल आहे. तेथे तो आहे." समजले? आणि येथे तो गर्दीतून येतो, वर जातो.

460 आता तो म्हणतो, "प्रभूच्या आनंदात सहभागी व्हा, जो तुमच्यासाठी जगाच्या स्थापनेपूर्वी सिध्द केला होता. आत प्रवेश करा." आणि भाऊ नेविल बदलतात, आणि परत जाण्यास सुरुवात करतात, बस किंचाळत आणि स्तुती करत होते.

461 मुला, मी फक्त ओरडलो आणि म्हणालो, "परमेश्वराला गौरव असो!" येथे उभा राहून माझ्या भावांना जाताना पाहणे, हा एक अद्भूत समय होता.

462 आणि नोंद ठेवणारा स्वर्गदूत तेथे उभा होता, आणि म्हणाला, "विलीयम ब्रॅन्हम."

463 मी कधीच विचार केला नव्हता की मला तेथे चालावे लागेल. म्हणून तेव्हा मी घाबरलो होतो. मी विचार केला, "ओह, बापरे! मला आता ते करावे लागणार का?" म्हणून मी चालत तेथे खाली गेलो. आणि सर्वजण मला शाबासकी देत होते…[भाऊ ब्रॅन्हम स्वतःच्या पाठीवर खूप वेळा, थाप मारुन दाखवतात—सम्पा.] "हाय, भाऊ ब्रॅन्हम! भाऊ ब्रॅन्हम, परमेश्वर तुला आशीर्वादित करो!" मला शाबासकी देत होते, जसे मी त्या मोठ्या लोकांच्या समुहातून जात होतो. आणि ते सर्व येत होते आणि तशाप्रकारे मला शाबासकी देत होते. [भाऊ ब्रॅन्हम त्यांना स्वतःला खूप वेळा शाबासकी देऊन दाखवतात.] "भावा, परमेश्वर तुला आशीर्वादीत करो! भावा, परमेश्वर तुला आशीर्वादीत करो!"

464 मी जात होतो. मी म्हणालो, "आभारी. आभारी. आभारी." जसे सभेतून किंवा कोणत्या स्थानाकडून बाहेर येणे, तुम्हाला माहीत आहे.

465 आणि मी त्या भव्य विशाल हस्तीदंत शिडीवरुन जाणार होतो. मी तेथे चालण्यास सुरुवात केली आणि जसे मी पहिले पाऊल टाकले, मी थांबलो. आणि मी विचार केला… मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले. मला वाटले, "मी त्याला ह्याप्रकारे नीट पाहू इच्छितो." आणि मी थांबलो.

466 माझे हात *असे* केले होते. मला वाटले काहीतरी *येथे* माझ्या हाताखाली आली. तो दुसऱ्या कोणाचा हात होता. मी सभोवती पाहिले, आणि तेथे होप उभी होती, तिचे मोठे काळेभोर डोळे, आणि दाट केस तिच्या पाठीवर रेंगाळत होते, शुभ्र झगा घातलेला होता; माझ्याकडे पाहात होती. मी म्हणालो, "होप!"

467 मला वाटले, काहीतरी *हे* हातावर पडले. सभोवती पाहिले, आणि तेथे मेडा होती; तिचे काळे डोळे वर पाहात होते, आणि तिचे काळे केस खाली लोंबकळत होते, शुभ्र झगा घातला होता. आणि मी म्हणालो, "मेडा!"

468 आणि त्यांनी एक दुसऱ्याकडे पाहीले, तुम्हाला माहीत आहे, अशाप्रकारे त्यांना…मी त्यांना बाहूत घेतले आणि आम्ही आमच्या स्वर्गीय घरी चालत गेलो.

469 मी जागा झालो. ओह, मी जागा झालो. आणि मी—मी उठलो आणि खुर्चीवर बसलो, आणि तुम्हाला माहीत आहे, रडलो. मी विचार केला, "हे परमेश्वरा, मी आशा करितो की ते तसेच होवो." दोघीही माझ्या जीवनात सहचारिणी होत्या, आणि लेकरे वाढविली, आणि अशा गोष्टी; आणि येथे आपण, नविन जगात प्रवेश करीत आहोत, जेथे परिपूर्णता आणि सर्व गोष्टी. नाही, काहीच नाही…

470 ओह, ही खरोखरीच अद्भूत गोष्ट असणार! ती चुकवू नका. तुम्ही ती गमावू नका. परमेश्वराच्या कृपेने, तुम्ही ते सर्व करा, जे करु शकता; आणि मग बाकी तुमची काळजी घेणे परमेश्वराच्या हाती आहे मग.

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करितो.
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले
कलवरी…

471 आपल्या पूर्ण हृदयाने आपण ते पुन्हा गाऊया. आता आपले डोळे परमेश्वराकडे लावूया.

मी त्याच्यावर प्रेम करतो.

472 [भाऊ ब्रॅन्हम मंच सोडतात आणि एका स्त्रीसाठी प्रार्थना करतात, मंडळी पुन्हा एकदा गाणे गाते. *मी त्याच्यावर प्रेम करतो*—सम्पा.]

…मी त्याच्यावर प्रेम करतो
कारण त्याने प्रथम मजवर प्रेम केले,
आणि माझे तारण विकत घेतले,
त्या कलवरी झाडावर.

473 आता, ठीक आहे. त्या स्त्रीला आशा नव्हती की ती ह्या सभेमध्ये जीवंत राहील. ते बरोबर आहे. तेथे ती दोन्ही हात वर करुन परमेश्वराची स्तुती करीत आहे. तेच कारण आहे की मी येथे खूप वेळ रेंगाळीत होते. मी तुम्हाला सांगितले नाही की मी काय करतो. मी मेडा आणि त्यांच्याविषयी बोलत होतो. आणि ते मी काय आहे ते पाहण्यासाठी दृष्टी लावून होतो. मी पाहिले की तो प्रकाश गोल गोल मागे पुढे फिरत होता. आणि तो गेला आणि तिच्यावर जाऊन थांबला. मी विचार केला, “तेच ते आहे.” ओह, हे अद्भूत नाही का? [मंडळी आनंदीत होते—सम्पा.]

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो.
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले.
आणि माझे तारण विकत घेतले.
त्या कलवरी झाडावर.

474 आता आपल्या हृदयाने, [भाऊ ब्रॅन्हम गुणगुणण्यास सुरुवात करतात *मी त्याच्यावर प्रेम करतो*—सम्पा] फक्त त्याचा चांगुलपणा आणि दयेविषयी विचार करा.

…मी त्याच्यावर प्रेम करतो. (आमेन!)
…त्याने मजवर प्रथम प्रेम केले…

475 आता पाहा हे किती चांगले आहे? आमेन! तेच आहे. आता…? जा आणि बरी हो. आमेन! परमेश्वराची कृपा बरे करण्यासाठी तुजवर झाली आहे. आमेन.

…कलवरी झाडावर.

ओह, परमेश्वराला गौरव असो!

मी त्याच्यावर प्रेम करतो…

ठीक आहे, तुमचा पाळक.

मी…

476 [कोणीतरी म्हणाले, "भाऊ ब्रॅन्हम, उद्या साडे नऊ ला सुरुवात करुया?"—सम्पा] नऊ ते साडे नऊ. नऊ वाजता, त्याच्यामध्ये. ["नाश्त्यानंतर? नऊ वाजता?"] तुम्ही नऊ वाजता सुरुवात करा. मी साडे नऊला सुरुवात करीन.

***सहावा शिक्का*** MAR63-0323

(The Sixth Seal)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रॅन्हम यांनी शनिवारी संध्याकाळी, 23 मार्च, 1963 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रॅन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org